# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ

मुकुंदनगर, गुलटेकडी, पुणे – 411 037

नेहरू सामाजिक शास्त्रे विद्यास्थान अंतर्गत इतिहास विभाग

एम्. फिल्. चा प्रबंध

## ''सांगली शिक्षण संस्थेचे सांगली जिल्ह्याच्या विकासातील योगदान''


संशोधक विद्यार्थिंनी

कु. मुल्ला हसिना शमशुद्दिन

एम्. ए., बी. एड्. (इतिहास)

मार्गदर्शक

प्रा. डॉ. स्वराली चंद्रकांत कुलकर्णी

एम्. ए., पी. एच. डी., सेट (इतिहास)



मे 2017

# – मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र –

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पदव्युत्तर इतिहास विभाग, नेहरू सामाजिक शास्त्रे विदयास्थान अंतर्गत इतिहास विषयाच्या विद्यानिष्णांत (एम. फिल) या पदवीसाठी **मुल्ला हसिना शमशुद्दिन** यांनी ''**सांगली शिक्षण संस्थेचे सांगली जिल्ह्याच्या विकासातील योगदान**'' या विषयातील शोध निबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे. सदर शोध प्रबंधात त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत. सदर माहिती त्यांनी इतरत्र कोठेही वापरलेली नाही.

ठिकाण : मार्गदर्शक

दिनांक :

प्रा. डॉ. कुलकर्णी स्वराली चंद्रकात

# – प्रतिज्ञापत्र –

मी असे घोषित करते की, ''सांगली शिक्षण संस्थेचे सांगली जिल्ह्याच्या विकासातील योगदान'' हा माझा स्वतः चा लघुशोध प्रबंध असून मी हा लघुशोध प्रबंध भारतात किंवा भारताबाहेरील कोणत्याही विद्यापीठाला सादर केलेला नाही. सदर लघुशोध प्रबंधामध्ये नमूद केलेली माहिती आणि संशोधनात्मक विधाने ही मी स्वतः अभ्यासून घेतली आहेत.

**संशोधकाचे नाव**

**दिनांक :**

**मुल्ला हसिना शमशुद्दिन**

# ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या नेहरू सामाजिक शास्त्रे विद्यास्थान अंतर्गत इतिहास या विषयातील एम. फिल. प्रबंध 'सांगली शिक्षण संस्थेचे सांगली जिल्ह्याच्या विकासातील योगदान' हा प्रबंध विद्यानिष्णांत (एम. फिल.) पदवीसाठी सादर करीत आहे. सांगली शिक्षण संस्थेने शताब्दि पूर्ण केली असल्यामुळे, सांगली शहराला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. सांगली शिक्षण संस्थेने सांगली जिल्हयाच्या विकासासाठी मोठे योगदान दिले आहे, त्यामुळे सांगली शिक्षण संस्था महाराष्ट्राच्या कानाकोप–यात जाऊन पोहचावी, प्रकाशात यावी या हेतूने हा विषय एम. फिल. साठी निवडलेला आहे.

माझे मार्गदर्शक आदरणीय प्रा. डॉ. कुलकर्णी स्वराली चंद्रकांत यांनी मला विषयाच्या निवडीपासून संपूर्ण प्रबंध पूर्ण होईपर्यंत बहुमोल मार्गदर्शन केले. त्यांच्यामुळेच हा प्रबंध लिहिण्यास प्रेरणा मिळाली, त्यांचे मानावे तेवढे आभार थोडेच आहेत. त्यांच्या स्नेहपूर्वक सहकार्यामुळे हा प्रबंध पूर्ण होऊ शकला. त्यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले, याबद्दल त्यांचे आभार मानण्याऐवजी ऋणात राहण्यात आनंद वाटतो.

माझ्या संशोधन कार्यात टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे आदरणीय प्रा. डॉ. कुलकर्णी बी. डी. (अधिष्ठाता, सामाजिकशास्त्र विभाग, पुणे) यांनी बहुमोल सहकार्य केले, त्याबद्दल त्यांची ऋणी आहे. इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. वाघमारे नलिनी यांनी मार्गदर्शन केले व वेळोवेळी सूचना केल्या त्याबद्दल आभारी आहे. सर्व कार्यालयीन सेवक यांचीही आभारी आहे. शिक्षक व सेवक वर्गाने माहिती दिल्याबद्दल या सर्वांचे आभार.

संशोधनासाठी मुंबई पुराभिलेखागार विभागातील संचालक अधिकारी व कार्यालयीन प्रमुख सौ. साळुंखे मॅडम यांनी मला परवानगी देऊन कागदपत्रे मिळवून देण्यासाठी मदत केली त्याबद्दल त्यांचे आभार. मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई येथील डॉ. खोबरेकर सर व इतर अधिका–यांनी मला सहकार्य केल्याबद्दल आभार मानते. पुणे येथील पेशवे दप्तर व कोल्हापूर येथील पुराभिलेखा–गारामधील संचालक, कार्यालयीन कर्मचारी यांनी मला सहकार्य केल्याबद्दल आभार मानते.

सांगली येथील नगरवाचनालय, पुणे येथील टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे ग्रंथालय, कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाचे बॅरिस्टर खर्डेकर ग्रंथालय, पुणे विद्यापीठ पुणे येथील जयकर ग्रंथालय, छत्रपती शिवाजी कॉलेज, महात्मा गांधी विद्यामंदिर व उच्च माध्यमिक विद्यामंदिर, विटा तसेच विटा हायस्कूल, सांगली ग्रंथालय या ठिकाणाहून जी माहिती उपलब्ध झाली, त्याबद्दल ग्रंथपाल व सेवकांचे आभार. सांगली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, नितिन खाडिलकर, मराठे सर सर्वच संचालक मंडळानी हा प्रबंध करण्यास परवानगी दिल्याने त्याचेही विशेष आभार.

या विषयाच्या संशोधन कार्यासाठी महात्मा गांधी, विद्यामंदिरचे मुख्याध्यापक – दि. रा. देशपांडे, पर्यवेक्षिका – सौ. जयश्री कवठेकर मॅडम समन्वयक – राजोपाध्ये सर, या शाळेतील श्री.

साठ्ये सर, श्री. गंगातीरकर सर, श्री. वसवाडे सर, श्री. सहस्त्रबुध्दे सर, ज्युनिअरचा सर्व स्टाफ, या शाळेचे लिपीक, शिक्षकेतर कर्मचारी, या शाळेच्या ग्रंथपाल सौ. वेट्टम ऊर्फ माने मॅडम यांनी सांगली शिक्षण संस्थेचा इतिहास ग्रंथ व दहा खंडातील शतपदी उपलब्ध करून देऊन सहकार्य केले त्याबद्दल त्यांचे आभार व सांगली शिक्षण संस्थेचे सिटी हायस्कूलचे माजी ग्रंथपाल विजय बक्षी सर यांनी नियतकालिके, वर्तमानपत्रे, सांगली शिक्षण संस्थेची कात्रणे, पुस्तके उपलब्ध करून दिली. सांगली जिल्ह्याची माहिती व सांगली शिक्षण संस्थेचा उल्लेख वर्तमान पत्रात आला की, फोन करून वारंवार माहिती दिली व लिहिलेल्या प्रबंधाचे वाचन करून मार्गदर्शन केले. या बद्दल आभार तसेच शोधप्रबंधाचे अतिशय सुक्ष्मपणे वाचन करून व्याकरण दृष्ट्या दुरूस्त्या सुचविल्याबद्दल प्रा. डॉ. मानसी जगदाळे, प्रभारी प्राचार्या, आदर्श कॉलेज विटा, दशरथ जगदाळे, स्पोकन इंग्लिश शिक्षक, विटा प्रा. डॉ. शकुंतला जाधव, जीवन प्रबोधिनी कन्या महाविद्यालय, विटा, मोहन पिसाळ सर, वैभव शिक्षण संस्था, विटा, ग्रंथपाल फासे मॅडम, जीवन प्रबोधिनी कन्या महाविद्यालय, विटा, यांचे मनः पूर्वक आभार.

माझी आदरणीय आई जैतुनबी, आजी शहाजनबी, माझे मामा, मामी, बहिण अनारकली, शकिला रूबिदा व भाऊजी महंमद, असिफ शेख, खलील (गुड्डू) अन्सार मुनिर, शिकलगार माझे भाचे सादनोमान, शोएब, ताहिरून अबुहर्रेरा, निलोफर, सफिया, माझे सहकारी व मित्र, मैत्रिणी धनश्री गुरव, धनश्री आई, भाऊ निलेश पुणे, भाग्यश्री, वैशाली, स्वरांजली, सीमा कुलकर्णी, अभय शुक्ला, प्रज्ञा दासरवार (पुणे), वर्षा, अंकुश (पुणे), सुनिल, सुरेखा, सुमित्रा उदय शहा, (विटा),रवी चंदनशिवे भूड. महेश, राजू, धनाजी व भारती जाधव, (आळसुंद) सुरेंद्र दुपटे, सुकेशनी दुपटे (सांगली) अलका गाडगीळ व प्रकाश अकोलकर, (अंधेरी) या सर्वांच्या प्रोत्साहनामुळे व प्रेमामुळेच हा प्रबंध पूर्ण होऊ शकला त्याबद्दल त्या सर्वांचे विशेष आभार.

या प्रबंधाचे टंकलेखन अचूक व सुबक करून त्यास मोहक रूप देऊन या शोधप्रबंधाचे काम वेळेत पूर्ण करून दिल्याबद्दल 'समर्थ इन्फोटेक'चे प्रोप्रा. घनःश्याम जोगळेकर व नम्रता धेंडे यांचे आभार मानते.

याशिवाय प्रत्यक्ष–अप्रत्यक्षरित्या ज्यांनी मला सहकार्य केले, त्या सर्वांचे मनः पूर्वक आभार !

**अभ्यासक**

**मुल्ला हसिना शमशुद्दिन**

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| प्रकरण 1 ले संशोधन विषयाची ओळख | पृष्ठ क्र. |
| 1.1 प्रस्तावना | 1–3 |
| 1.2 भूमिका | |
| 1.3 संशाधनाचे महत्त्व | |
| 1.4 उद्दिष्टे | |
| 1.5 गृहितके | |
| 1.6 संशाधनाची व्याप्ती व मर्यादा | |
| प्रकरण 2 रे – संशोधन विषयाशी संबधित साहित्याचा आढावा | 4–6 |
| प्रकरण 3 रे – संशोधनाची कार्यपद्वती | 7–9 |
| प्रकरण 4 थे – माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थ निर्वचन | 10–80 |
| सांगली जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी व भौगोलिक स्थान | |
| 4.1.1 सांगलीचे भौगोलिक स्थान | |
| 4.1.2 सांगली नावाची उत्पत्ती | |
| 4.1.3 सांगली प्रांताचा ऐतिहासिक आढावा | |
| 4.1.4 मध्ययुगीन इतिहास व सांगली | |
| 4.1.5 पेशवे व पटवर्धन घराणे | |
| 4.1.6 सांगली स्वतंत्र संस्थान | |
| 4.1.7 सांगली जिल्ह्याची निर्मिती | |

**4.2 सांगली शिक्षण संस्थेच्या संस्थापकाचे कार्य**

4.2.1 कै. धोंडोपंत विठ्ठल सखदेव

4.2.2 श्री. ब्रह्मीभूत, गुरूनाथ गोविंद तोरो

4.2.3 कै. श्री. विनायकराव सदाशिव जोशी

4.2.4 रा. राजाराम रावजी चिकोडीकर, संस्थापकांची भूमिका व कार्य

4.2.5 आजीव सभासद

**4.3 सांगली शिक्षण संस्थेची स्थापना तिच्या विविध शाखा व त्यांचा विस्तार**

**4.4 सांगली शिक्षण संस्थेचे सामाजिक, आर्थिक ,शैक्षणिक, साहित्यिक, सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान**

4.4.1 सांगली शिक्षण संस्था सामाजिक क्षेत्रातील योगदान

4.4.2 सांगली शिक्षण संस्थेचे शैक्षणिक कार्यातील योगदान

4.4.3 सांगली शिक्षण संस्थेचे सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान

4.4.4 सांगली शिक्षण संस्थेचे साहित्यिक क्षेत्रातील योगदान

4.4.5 विशेष उल्लेखनीय कार्य

**प्रकरण 5 वे उपसंहार** 81 -95

**5.1 निष्कर्ष व शिफारस**

**संदर्भसूचि**

**परिशिष्ट** 96–116

# प्रकरण 1 ले
# संशोधन विषयाची ओळख

## 1.1 प्रस्तावना

कोणत्याही घटनेचा अभ्यास सुरु करताना त्याच्या मुळाशी शोधत गेलो तरच त्याचा खरा इतिहास सापडतो. सांगली शिक्षण संस्था ही सांगली जिल्हयातील एक नावाजलेली शिक्षण संस्था आहे.एवढाच इतिहास माहित करुन न घेता सांगली चा प्राचीन काळापासूनचा इतिहास मध्ययुगीन इतिहास तिची जडणघडण प्राचीन काळापासून कोणत्या घराण्याची सत्ता हाती. मध्ययुगीन काळातील घराणी पटवर्धन घराणे व सांगली यांचा कसा संबध आला पटवर्धन घराणे संस्थानिक म्हणून नावारुपाला कसे आले, त्याकाळातील परिस्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

पटवर्धन संस्थानिक व इंग्रजाचे संबध, सांगली खालसा धोरण, शैक्षणिक धोरण, इंग्रज सरकार जे शिक्षण देते ते राष्ट्राविषयी प्रेम निर्माण करणारे शिक्षण देत नाही मोठया नगराच्या ठिकाणीच हायस्कूल असते तेंव्हा ग्रामीण भागामधील मुलांना शिक्षण मिळाले पाहीजे त्याला राष्टाचे शिक्षण मिळाले पाहिजे व तो सर्वगुण संपन्न बनला पाहीजे याचा विचार मनात सुरु असताना महाराष्ट्रामध्ये एक घटना घडली.

16 ऑक्टोंबर 1905 रोजी लॉर्ड कर्झनने बंगालच्या फाळणीचा निर्णय जाहीर केला आणि बंगालमध्ये आगडोंब उसळला. याच घटनेने लोकमान्य टिळकांनी 'केसरीतून' बंगालच्या असंतोषावर भाष्य केले. त्यांच्यावर खटला भरण्यात आला. त्यांना 22 जुलै 1908 रोजी 6 वर्षाची काळ्या पाण्याची शिक्षा ठोठावून टिळकांना मंडलेच्या तुरूगांत रवानगी केली. काळ्या पाण्याची शिक्षा संपल्यानंतर त्याचे तीव्र पडसाद देशात उमटले. टिळक काळ्या पाण्यावर गेले. त्यांच्याकरीता आपण एक दिवस तरी काम थांबविणे आपले कर्तव्य आहे. ही हजारो/लाखो गिरणी कामगारांची भावना होती. शिक्षा संपल्यानंतर टिळक मंडालेच्या तुरूंगातून सुटले या घटनेचा आनंद सांगलीतील तरूणांनी अनोख्या पध्दतीने साजरा केला. कै. धोंडोपंत विठ्ठल सखदेव, कै. विनायक सदाशिव जोशी, पूज्य ब्र. गुरूनाथजी गोविंद तोरो, कै. राजाराम रामचंद्र चिकोडीकर यांनी 4 डिसेंबर 1914 रोजी 'सिटी स्कूल' ची स्थापना केली. त्यावेळी 'एक विद्यार्थी आणि संस्थापक हेच चार शिक्षक' असे शाळेचे रूप होते. टिळकापासून स्फूर्ती घेतलेल्या साध्या पध्दतीने शाळेची सुरूवात झाली.

संस्थापकांची जिद्द मोठी होती आणि ध्येय विशाल होते. चारित्र्यसंपन्न, देशाभिमान, शरीरश्रमांची आवड असलेला स्वावलंबी विद्यार्थी त्यांना घडवायचा होता. त्यासाठी शालेय शिक्षणाबरोबर व्यायाम, खेळ, नैतिक शिक्षण, हस्त व्यवसाय, विद्यार्थी सहकार भांडार, संगीत, समाजसेवा अशासारख्या पूरक विषयाची जोड देऊन विद्यार्थीजीवन समृध्द व समाजोपयोगी करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न या संस्थापकांनी केला आहे.

19 सप्टेंबर 1919 मध्ये 'सांगली एज्युकेशन सोसायटी' ची स्थापना झाली. पुढे तिचे 'सांगली शिक्षण संस्था' असे नामकरण झाले आणि 'सिटी स्कूल'चे 'सिटी हायस्कूल' असे नामांतर झाले. आज या संस्थेचा लौकिक राष्ट्रीय शिक्षण देणारी संस्था असा आहे. 1921 पासून या शाळेत वेगवेगळे व्यवसायिक शिक्षण सुरू झाले. पूरग्रस्तनिधी, अंधनिधी, साहित्य संमेलन, शस्त्रक्रियेसाठी आर्थिक मदत, ध्वजनिधीसाठी संस्थेने भरीव निधी दिला आहे. सांगली शिक्षण संस्थेने आजपर्यंत रौप्य, त्रितपोमहोत्सव, सुवर्ण, हीरक, अमृतमहोत्सव, शताब्दी साजरी करून तिने आज दुस–या शतकात जन्म घेतला आहे. शताब्दी साजरी होत असताना या कालावधीमध्ये मराठी पाठ्यपुस्तकातील लेखकांचे साहित्यसंमेलन, सायकल रॅली, महालेझीम, रक्तदान शिबीर, वृक्षारोपण, चित्रकला स्पर्धा, काही व्याख्याने, गीतगायन असे विविध उपक्रम संस्थेंने केले आहेत.

## १.२ भूमिका :

टिळकांपासून स्पूर्ती घेऊन साध्या पद्धतीने शाळेची सुरुवात केली. पण या काळातील परिस्थीतचा अभ्यास करणे महत्वाचे वाटते.परकियाची सत्ता, पहिल्या महायुध्दाची सुरुवात, प्लेगच्या साथीचा आजार, समाज अनेक जाती–धर्मात,पंथात विभागलेल्या अस्पृश्यता समाजात मानली जात होती. समाज अशिक्षित, अंधश्रध्दाळू, स्त्रियांच्या बाबतीत चूल व मूल याला महत्व देणारा अशा समस्या समोर असताना सांगली शिक्षण संस्था निर्माण करणार–या संस्थापकांची जिद्द, चिकाटी, परिस्थितीशी तडजोड या घटना जाणून घेण्याचा प्रयत्न करावासा वाटतो. या संस्थेने स्वातंत्रपूर्व व स्वातंत्र्योत्तर असा ऐतिहासिक टप्पा पार केला आहे. या शंभर वर्षातील संस्थेची शैक्षणिक सामाजिक,क्षेत्रातील वाटचाल संस्थेची स्थापना झाली. त्यावेळी वर्गातील एक विद्यार्थी व शतपदीच्या काळातील विद्यार्थ्यांची संख्या, संचालक मंडळ, मुख्याध्यापक, संस्थेचा विस्तार तोही गुणात्मक व संख्यात्मक आढावा घेणे अत्यंत महत्वाचे वाटते.या शंभर वर्षामध्ये अनेक समस्या उभ्या राहिल्या, पण त्याचा कोणताही अडथळा न मानता त्यावरील उपाय शोधण्याचा प्रयत्न,शाळासाठी जागा,इमारत,खेळण्यासाठी मैदान विनाअनुदानित शाळा, कॉलेजचा प्रश्न समाजातील प्रश्न या घटनाचा अभ्यास करुन समजून घेण्याचा प्रयत्न व मी स्वतः महात्मा गांधी विद्यामंदिर विटा,याठिकाणी 15 जून 2005 पासून 31 एप्रिल 2017 या कालावधीत सी.एच.बी.तत्वावर विनाअनुदानित कला शाखेकडे इतिहास विषयाचे अध्यापन करीत असल्याने त्या संस्थेचा इतिहास जाणून घेण्याची इच्छा निर्माण झाल्याने एम.फिल.साठी या विषयाची निवड केली आहे.त्या अनुषंगाने शोधण्याचा प्रयत्न या प्रबंधातून केला आहे.

## 1.3 संशोधनाचे महत्त्व :

1. या अभ्यासाने सांगली शिक्षण संस्थेचा शंभर वर्षाचा इतिहास पुढे येईल.
2. सांगली शिक्षण संस्थेचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, साहित्यिक सांस्कृतिक योगदान समजेल.
3. या अभ्यासातून नवीन पिढीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणा मिळेल.
4. एकमेकांच्यामध्ये सहकार्याची भावना वाढीस लागेल.
5. मुख्याध्यापक, शिक्षक, लेखनिक व कर्मचारी यांना पुरस्कार प्रदान करून शाबासकीची थाप देवून कामाची प्रेरणा व उर्मी तयार करण्यास मदत होईल.
6. संस्थेचे कार्य निश्चितच प्रेरणादायी आहे त्याचा अभ्यास होणे निश्चितच गरजेचे आहे.

## 1.4 उद्दिष्टे :

1. सांगली शिक्षण संस्थेच्या स्थापनेचा इतिहास जाणून घेणे.
2. सांगली शिक्षण संस्थेच्या संस्थापकांच्या कार्याची माहिती अभ्यासणे.
3. सांगली शिक्षण संस्थेच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचा अभ्यास करणे.
4. सांगली शिक्षण संस्थेने आत्तापर्यंत चांगल्या आरोग्यासाठी केलेल्या योगदानाचा आढावा घेणे.
5. सांगली शिक्षण संस्थेचा शाखा विस्तार किती आहे हे जाणून घेणे.
6. सांगली शिक्षण संस्थेचा शाखा विस्तार आणि त्यांचे कार्य अभ्यासणे.
7. अनुदानित, विनाअनुदानित कॉलेजच्या कार्याबरोबर त्यांचे मूल्यमापन करणे.

## 1.5 गृहितके :

1. सांगली शिक्षण संस्था संख्यात्मक व गुणात्मक वाढीसाठी निश्चितच प्रयत्न करते.
2. सांगली शिक्षण संस्थेच्या शाळांचा दर्जा निश्चितच चांगला आहे.
3. सांगली शिक्षण संस्था ही आदर्श संस्था असल्याने इतर संस्थांना मार्गदर्शन करते.
4. विनाअनुदानित शाळा, कॉलेज असूनही या संस्थेचे कार्य मोलाचे व महत्वपूर्ण आहे.
5. सांगली शिक्षण संस्थेने सामाजिक उपक्रम राबवून सामाजिक क्षेत्रात योगदान दिले आहे.

## 1.6 संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

1. प्रस्तुत संशोधन हे सांगली शिक्षण संस्थेशी संबंधित आहे.
2. प्रस्तुत संशोधन हे सांगली जिल्हयापुरते मर्यादित आहे.
3. प्रस्तुत संशोधन हे इतिहास विषयाशी निगडीत आहे.
4. प्रस्तुत संशोधन हे शैक्षणिक व सामाजिक विकासापुरते मर्यादित आहे.
5. प्रस्तुत संशोधन हे सांगली शिक्षण संस्थेची शाळा, विद्यार्थी व शिक्षकांच्या योगदानाशी संबंधित आहे.
6. प्रस्तुत संशोधनामध्ये सांगली शिक्षण संस्थेच्या शंभर वर्षाचा आढावा घेतला जाईल.

## –प्रकरण 2 रे –

## संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचा आढावा

सांगली शिक्षण संस्थेचा अभ्यास करत असताना खालील संदर्भ अभ्यासासाठी उपयुक्त ठरली

**1. .सांगली संस्थानाचा राजकीय, सामाजिक आणि आर्थिक इतिहास,1880 ते1948, मेघना उद्‌गावकर यांच्या पुस्तकातून**

अ. संस्थाकालीन सांगली प्रांताची माहिती, भौगोलिक स्थान भाषा,सीमा हवामान यांचा संदर्भ सापडतो

ब. संस्थाकालीन पटवर्धन घराण्यातील सांगली व पटवर्धन घराणे यांच्या वंशाची माहिती मिळते

क. पुढील काळात सांगली शिक्षण संस्थेकडे पटवर्धनानी काही शाळा चालविण्यास दिल्याचा संदर्भ सापडत असल्याने या ठिकाणी सांगली व पटवर्धन घराण्याचा इतिहासाचा आढावा घेता आला.

ड. सांगली व आजूबाजूच्या परिसराची माहिती, व्यापारी शहरांची माहितीचा संद्‌र्भ या पुस्तकात सापडतो.

**2. सातवाहन आणि पश्चिम क्षत्रप यांचा इतिहास व त्यांचे कोरीव लेख ,लेखक व्ही.व्ही.मिराशी यांच्या** पुस्तकातून पुढिल संद्‌र्भ सापडत

अ. सातवाहन राज्याच्या विस्तारामध्ये सांगलीचा समावेश होता

ब प्राचीन इतिहासामध्ये मिरज प्रांत व सांगलीचा इतिहासाचा संदर्भ सापडतो

क. सांगलीचा समावेश मिरज प्रांतामध्ये हो

**3. शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख, व्ही. व्ही. मिराशी यांनी प्रकाशित केलेल्या पुस्तकातून–**

**अ.**इ.स.1058 ला कोल्हापूरच्या शिलाहार राजाचे सांगली,मिरज व त्यांच्या आसपासच्या भागावर राज्य होते असा उल्लेख सापडतो.

**ब.** शिलाहारांची राजधानी पन्हाळा होती. असा उल्लेख सापडतो.

**क.** इ.स.1175 ते 1212 या काळामध्ये शिलाहार राजा दुसरा भोज सांगली,कोल्हापूरवर राज्य करीत होता. असा उल्लेख सापडतो

**4. सिटी हायस्कूल, स्मरणिका, हिरक महोत्सव, डिसेंबर 1974, सांगली शिक्षण संस्था, प्रकाशक–शि.गो.कोटिभास्कर या प्रकाशित स्मरणिकेमध्ये.**

अ. सांगली शिक्षण संस्थेची पहिली शाळा सिटी हायस्कूल स्थापनेचा संद्‌र्भ सापडतो.

ब. संस्थापकांची नावे त्याचे बालपण व योगदान या विषयाचा संद्‌र्भ सापडतो.

क संस्थेच्या वाटचालीमध्ये 1974 पर्यंत मुख्याध्यापक,शिक्षक व शाळा विस्ताराचा संद्‌र्भ आलेला आहे.

ड. यशाच्या शिखरावरती विराजमान असणा–या विद्यार्थ्यांना कोणती स्कॉलरशीप मिळाली.यांचा संद्‌र्भ सापडतो.

**5. सिटी हायस्कूल,स्मरणिका अमृत महोत्सव 1990 ,प्रकाशक श.ना फाळके सांगली शिक्षण संस्था या प्रकाशनामध्ये**

अ. 1914 पासून 1990 पर्यंत संस्थेच्या शाखा विस्ताराचा आढावा, शिक्षक, मुख्याध्यापक यांनी लिहिलेल्या लेखाच्याद्वारे संदर्भ सापडतो.

ब. संस्थेच्या आजपर्यंतच्या ज्ञानदानातून उच्चपदावर विराजमान झालेल्या माजी विद्यार्थ्यांच्या यशोमालिका सापडतात.

क. प्रारंभापासून ते हीरक महोत्सवी वर्षापर्यंत संस्थेच्या विस्ताराची गती समजण्यास मदत होते.

**6.तुषार वार्षिक अंक, प्रकाशन कार्यवाह ,सांगली शिक्षण संस्था ,2008 ते 2009 ,2009 ते 2010 ,2010 ते 2011, 2011 ते 2012 , 2016 ते 2017 पर्यंतच्या अंकातून विद्यार्थ्यांनी शिक्षकांनी मुख्याध्यापक संस्थेसंदर्भातील**

अ. संस्थापकांच्या योगदानाचे लेख

ब. लोकमान्य टिळकांची विचारधारा

क. विद्यार्थ्यांचे निबंध, पर्यावरण, विज्ञान, सामाजिक उपक्रम, कोडी, चुटकूले, नाटयछटा, कथा, कविता, सहलीचे वर्णन यातून सांगली शिक्षण संस्थेमध्ये चालविल्या उपक्रमांची माहिती मिळते,संस्था प्रत्येक वर्षी एक वेगळाउपक्रम राबविते त्यांची माहिती या तुषार वार्षिक अंकातून मिळते.या अंकातील काही लेख मराठी हिंदी, इंग्रजी संस्कृत अशा भाषेतून बघायला मिळतात.त्याच्यातून सांगली शिक्षण संस्थेचे साहित्य क्षेत्रातील संधीचे धागेदो–यांचे संदर्भ सापडतात.

**7.इतिहास ग्रंथ 1914–2014,सांगली शिक्षण संस्था,सिटी हायस्कूल,प्रकाशक–नितिन खाडिलकर अध्यक्ष, या प्रकाशित ग्रंथातून**

**अ.** संगलीचे गावकुस 1914 पूर्व,यामधून सांगली नावाची उत्पत्तीची,तिचे भौगोलिक मिरज प्रांताचा इतिहास व मोडी लिपीतील काही कागदपत्रांचा संदर्भ सापडतो

**ब.** संस्थापकांच्या कार्याचा ही आढावा घेतला आहे

**क.** शाळा सुरु पण आघात 1914– 15या प्रकरणात इ.3री चे कॅटलॉग,4डिसेंबर पहिल्या दिवशीचे हजेरी पत्रक इंग्रजी भाषेतील संदर्भ सापडतो.

**ड.** लोकमान्य पाउल 1920 या प्रकरणामध्ये लोकमान्यांनी सिटी हायस्कूल ला भेट दिल्याचा उत्साहपूर्ण भाषण केल्याचा ही उल्लेख आहे

**इ.** भेट आणि विस्तार 1932–1937 या प्रकरणामध्ये सांगली शिक्षण संस्थेला खास पाहुण्यांनी भेटी दिल्या त्यांच्या अभिप्राय मधून संस्थेच्या यशाची मालिका दिसते

**फ** संस्थेच्या सर्वच शाळांचा विस्तार करताना आलेल्या अडचणी व उपाय यासर्वांचा संदर्भ मिळतो

**ग.** शिक्षकांना दिल्या जाणा–या प्रोत्साहनपर पुरस्कारांचा संदर्भ सापडतो

**च.** विद्यार्थ्यांच्या घेतल्या जाणा–या बाहय स्पर्धा परीक्षांचा संदर्भ आढळतो

**छ.** सांगली शिक्षण संस्थेला मिळालेल्या पुरस्कारांचाही संदर्भ सापडतो.

**8. शतपदी स्मरण शंभर वर्षांचे ,1914– 2013 या कालावधीतील 10 वर्षांचा आढावा घेऊन शतपदींचे दहा खंड तयार केले आहेत.**

**अ.** त्या दहा वर्षातील संस्थेची शाखा, स्थापना, गावाचे नाव ,तिथे शाळा का स्थापन केली याचा संदर्भ सापडतो.

**ब.** शाळेचे अगोदरचे नाव, नामंतर झालेले नाव, लाभलेले देणगीदार, शाळेचे वेगळे वैशिष्टये यां उल्लेख ही सापडतो.

**क.** त्या दहा वर्षातील माजी–आजी मुख्याध्यापक, शिक्षक, लिपिक यांच्यावरती माजी विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या लेखांचा संदर्भ सापडतो.

**ड.** सांगली शिक्षण संस्थेने विद्यार्थ्यांच्या विकासाकरिता घेतल्या जाणा–या उपक्रमाची माहिती मिळते.

**ई.** मेरिट मध्ये आलेल्या विद्यार्थ्यांची नावे सापडतात.

**फ.** क्रीडास्पर्धा– शालेय स्तरावर, आंतरशालेय, तालूका स्तरावर, राज्य स्तरावर आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळलेले खेळाडू , मिळालेले पदक, त्याचे लेख यासर्वांचा आढावा घेतला आहे.

**च.** माजी विद्यार्थ्यांना शाळेविषयी, संस्थेविषयी वाटणारा जिव्हाळा, आपूलकी या शतपदी मधून व्यक्त होताना दिसतो.

**छ.** सांगली शहरापुरतेच शाळा स्थापन न करता ग्रामीण भागापर्यंत शाळा स्थापन करायचे कार्य या शतपदीच्या व संस्थेच्या कार्यातून दिसते

**झ.** संस्थेला लाभलेले सर्वगुण संपन्न विशिष्ट क्षेत्रात पारंगत असणारे शिक्षक यासर्वांच्या कार्याचा संदर्भ या शतपदी मधून सापडत

**य.** बाहय परीक्षा, बालनाटय स्पर्धा परीक्षा, वक्तृत्व स्पर्धा या संदर्भ शतपदीच्या लेखनातून सापडतो.

**र** शतपदीमध्ये शाळेचे परंपरागत असणारे सण–उत्सव गणेशचतुर्थी, भोडला, दहिहंडी, पर्यावरण सहल याचे ही संदर्भ सापडतात.

**ल**. शतापब्दी निमित्ताने सुरु केलेला एक वेगळा कार्यक्रम सर्वांच्या स्मरणात राहिल अशी 'महालेझीमची' ही माहिती मिळते.

**9 .पेपर कात्रणांचा संदर्भ –**

**अ.** संस्था जे उपक्रम राबविते, त्यासंदर्भात पेपर मध्ये बातमीदेते 26 जानेवारी 2014 मघ्ये विश्वविक्रम महालेझिम कार्यक्रम संपन्न झाला. तो टि. व्हि च्या सर्व वाहिन्यावरून दाखविन्यात आला होता. सांगली जिल्हयातील सर्वच पेपर मधून बातमी छापून आली होती.

**ब.** लोकमत, हॅलो सांगली , गूरूवार दि.15 जूलै 2016 च्या बातमी – पत्रात 'एका मिनीटात संपूर्ण ज्ञानेश्वरी' लेखन सांगली शिक्षण संस्थेचा उपक्रम अशा बातमीचा संदर्भ सापडतो.

**क.** दै.तरूण भारत दि. 21 नोहेंबर 2016 या मध्ये 'सांगली जिल्हयाचा प्राचीन व सांगली जिल्हा निमितीला 57 वर्ष पूर्ण' झाल्याचा संदर्भ आहे.

# प्रकरण 3 रे
# संशोधनाची कार्यपध्दती

1. मी संशोधन करीत असताना खालील संशोधन पध्दतीचा उपयोग केला .
**अ.** प्रत्यक्ष सर्वेक्षण पध्दती
**ब.** विश्लेषणात्मक सर्वेक्षन पध्दती

संशोधन करीत असताना ऐतहासिक पद्धतीचा उपयोग करण्या बरोबर मी आवश्यक तेथे फोटो मूलाखत, चर्चा यांचा उपयोग केला आहे .प्रामुख्याने मला सिटी हायस्कुल, सांगली शिक्षण संस्था, इतिहास ग्रंथ 1914 ते 2014 व शतब्दी खंड 1 ते 10 या सर्वांचा सलोख अभ्यास करून हा प्रबंध पूर्ण केला आहे.

**संशोधनाची पद्वती :**
**1** प्रत्यक्ष सर्वेक्षण पद्वती.
**2** वर्णनात्मक सर्वेक्षण पद्वती
**3** विश्लेषणात्मक सर्वेक्षण पद्वती

सिटी हायस्कूल शाळा सुरू केली त्यावेळी संस्थापकांची परिस्थिती, त्यांचे शिक्षण त्यांना का शाळा स्थापन करावीशी वाटली, त्यासाठी त्यांनी साधन सामुग्रीचा कसा शोध घेतला याची माहिती घेतली. एप्रिल 2013 मध्ये सांगली शिक्षण संस्थेच्या इतिहास संकलनाच्या कामाचा मुहूर्त करून संस्थेने सांगली शिक्षण संस्था सिटी हायस्कूल ,1914 ते 2014 , इतिहास ग्रंथ, संकलक व लेखक वंसत आपटे , प्रकाशक नितिन खाडीलकर अध्यक्ष सांगली शिक्षण संस्था यांनी प्रकाशित केले आहे. या इतिहास ग्रंथातून 1914 साली स्थापन झालेल्या संस्थेला आता शंभर वर्ष पूर्ण आहेत. शताब्दीच्या निमित्ताने या संस्थेची आतापर्यंत झालेल्या वाटचालीचा अभ्यास या ग्रंथातून करता आला.

सिटी हायस्कूलचे माजी ग्रंथपाल विजय बक्षी सर यांना भेटून पेपर कात्रणे, संस्थेची माहिती असणारी , त्रितपोमहोत्सव अंक, हिरकमहोत्सव अंक, संस्थेतून शिक्षण घेऊन बाहेर पडलेले विद्यार्थी उच्चपदावरती देशात व परदेशात आहेत. या बाबतची चर्चा केली व त्यातून जी माहिती उपलब्ध झाली ते संस्थेसाठी व विद्यार्थ्यांनसाठी निश्चीतच योगदान आहे.

सांगली शिक्षण संस्थेने शतपदी, स्मरण शंभर वर्षाचेही स्मरणीका 4 डिसेबंर 2014 रोजी प्रकाशित केली त्यामध्ये एका शतपदीमध्ये दहा वर्षाचा आढावा घेऊन एक ते दहा खंड तयार केले आहेत.

**1. शतपदी, स्मरण शंभर वर्षाचे ,1914 ते 1923 ,खंड 1 ,कार्यवाहक सांगली शिक्षण संस्था**

या स्मरणीके मध्ये सांगली शिक्षण संस्थेची पहिली शाळा सिटी स्कूलच्या स्थापने पासून ते एक विद्यार्थी चार शिक्षक, अशी माहिती मिळते व 1920 पर्यंत चंपाबेन वाडीलाल ज्ञान मंदिर, तासगाव ही दुसरी शाळा स्थापन झाली. या दहा वर्षामध्ये शाळेची स्थापना. प्रथम दिवस अध्यपनास प्रारंभ, सांगली एज्युकेशन सोसायटीची वतीने तासगांव ए. व्ही. स्कूलची सुरुवात सांगली एज्युकेशन सोसायटीची नोंदणी 01–03–1921 या कालावधीतील लाभलेले शिक्षक त्यांच्या नातेवाईकांनी माजी विद्यार्थी, आजी– माजी शिक्षकांनी लिहलेले लेख या सर्वांमधून माहिती घेता आली. मी त्या माहितीचा उपयोग करून संस्थेचे मुल्यमापन केले आहे.

**2. शतपदी, स्मरण शंभर वर्षाचे , 1924–1933 खंड–2, प्रकाशक कार्यवाह सांगली शिक्षण संस्थेच्या स्मरणिके मध्ये आलेल्या शाखा पुढील प्रमाणे :**

डॉ. बापट बालशिक्षण शिक्षण मंदिर सांगली, या शाळेची माहिती अभ्यासता आली. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. जाधव मॅडम यांच्याशी चर्चा करता आली मुलींचे 1967 सालचे कपबुलबल पथकाची माहिती सौ. सु, सु, कुलकर्णी यांच्याशी चर्चा केली व शतपदीतून ही संदर्भ मिळाला त्याचा मी अभ्यास केला.

**3. शतपदी, स्मरण शंभर वर्षाचे – 1934 –1943 खंड –3 प्रकाशक – कार्यवाह सांगली शिक्षण संस्था**

या शतपदी महात्मा गांधी विद्यामंदिर , विटा तांत्रिक व उ. मा. सह 21 नोव्हेंबर 1937 स्थापना या ठिकाणी असणारे मुख्याध्यापक दि.रा. देशपांडे हे एक  एन.सी.सी. पथकाचे प्रमुख होते.त्यांनी एन.सी.सी. चे अनुभव कथन केले. महात्मा गांधी विद्यामंदिर या शाळेत आत्ता पर्यंत कोणकोणते मुख्याध्यापक झाले. टागोर आश्रमाची स्थापना का केली त्या अनुषंगाने या शाळेने राबविलेल्या उपक्रमाचा आढावा घेता आला.

महात्मा गांधी विद्यामंदिर शाळेच्या पर्यवेक्षिका सौ. कवठेकर मॅडम यांनी ही ज्या शाळेमध्ये शिक्षक म्हणून काम केले. त्या शाळेतील वैशिष्टयपूर्ण अशी माहिती व सांगली शिक्षण संस्थेची सांगली शिक्षण संस्था सेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादित, सांगली या संदर्भातील माहिती दिली. वार्षिक अंक उपलब्ध करून दिले त्याचा संशोधनासाठी उपयोग केला. या शाळेचे लिपिक निवास मेटकरी यांनीही माहिती उपलब्ध करून दिली.

**4. शतपदी स्मरण शंभर वर्षांचे, 1944 –53 खंड – 4 प्रकाशक – कार्यवाह सांगली शिक्षण संस्था**

शतपदी मध्ये–बुधगाव हायस्कूल स्थापना 1 जुन 1949 व शेठ र.वि. गोसलिया हायस्कूल, माधवनगर या दोन शाळाच्या स्थापनेचा इतिहास सापडतो. बुधगाव हायस्कूलच्या आळतेकर सरांनी शिक्षण संस्थेला ''ॐ तेजस्विनावधीतमस्तु'' हे ब्रीद वाक्य तयार करून दिले याचा इतिहास सापडतो याचा आढावा घेतला.

**5 . शतपदी स्मरण शंभर वर्षाचे ,1955–1963 खंड– 5 प्रकाशक –कार्यवाह सांगली शिक्षण संस्था**

सरला बापट शिशुविकास मंदिर सांगली हि. हा. रा. चिं. पटवर्धन हायस्कूल, सांगली शेठ च.ग.शहा विद्यामंदिर लेंगरे, श्रीमती पुतळाबेन शाह कॉलेज ऑफ एज्यु. सांगली या शाळा व कॉलेजना भेट देवून मुख्याध्यापकांच्या कडून शाळेतील विद्यार्थी संख्या, शिक्षक संख्या, चालविले जाणारे उपक्रम, ग्रंथालय, लिपिक यांच्याशी चर्चा करून माहिती घेऊन त्याचा उपयोग संशोधना मध्ये केला.

**6. शतपदी, स्मरण शंभर वर्षाचे ,1964– 1973 खंड –6, प्रकाशक – कार्यवाह सांगली शिक्षण संस्था**

शतपदी मध्ये श्री. म.के.आठवले विनय मंदिर, श्री. के. वि. तथा दादूकाका भिडे कन्या शिशूमंदिर, सांगली, श्री. रामदयाळ मालू हायस्कूल सांगली ,सौ. इंदिराबाई भिडे कन्या प्रशाला, विटे, यांचा इतिहास शतपदी मध्ये सापडतो त्याच बरोबर सौ. केतकर मॅडम, ग्रंथपाल कुलकर्णी मॅडम, वसवाडे मॅडम, भंडारे मॅडम, यांच्याशी चर्चा केली. कै. ग. रा. पुरोहीत कन्या प्रशाला सांगली, सांगली एज्युकेशन सोसायटीचे नामकरण करून सांगली शिक्षण संस्था असे मराठी नावाचा संस्थेचा ठराव अभ्यास करता आला. या शाळांच्या मुख्याध्यापकांना भेटून शाळेच्या संदर्भात, विद्यार्थी संख्या ग्रंथालय इत्यादीला भेट दिली संस्था पातळीवर वार्षिक उपक्रमाची माहिती मिळाली श्रीमान आबासाहेब गरवारे विद्यार्थी वक्तृत्व स्पर्धा 1968–69 पासून 5 वी ते 7 वी 8 वी ते 10 वी गट सुरू केले या संदर्भाचा संशोधनासाठी उपयोग केला.

**7. शतपदी,स्मरण शंभर वर्षाचे, 1974– 83, खंड –7,प्रकाशक–कार्यवाह सांगली शिक्षण संस्था**

या शतपदीमध्ये–वसंत प्राथमिक शाळा सांगली, वसंत बालमंदिर सांगली, राधा गोविंद मराठी शाळा, तासगाव, सौ. रे. रा. काळे बालक मंदिर तासगाव इ. शाळाची माहिती मिळाली त्या शाळेतील शिक्षकांशी चर्चा करून बाल चमूच्या बरोबर एक तास वेळ घालवला  त्याचबरोबर आंतरशालेय वैयक्तीक क्रीडा स्पर्धा 1981 ते 82 पासून संस्थेच्या सर्व शाळामधून लांबउडी, उंचउडी, गोळाफेक, भालाफेक, इत्यादी वैयक्तीक क्रीडा स्पर्धा सुरू झाल्याची माहिती घेऊन संशोधनासाठी वापर केला.

**8. शतपदी,स्मरण शंभर वर्षाचे ,1984– 93 खंड –8, प्रकाशक – कार्यवाह सांगली शिक्षण संस्था**

या शतपदीमध्ये सौ.लिलाताई देशचौगुले प्राथमिक विद्यामंदिर, विटा मा. क. दा. बर्वे शिशुमंदिर, विटे या शाळेची माहिती अभ्यासता आली. या शाळेतील मुख्याध्यापिका सौ. बाबर मॅडम विद्यामान मुख्याध्यापक पाटिल सर ,लिपीक प्रकाश कुलकर्णी सर, शिशुमंदिराचे अधिक्षक श्री. माने सर यांना ही भेटून विद्यार्थी संख्या, शिक्षक संख्या,

उपक्रम , या सर्वाची माहिती घेतली. सौ. गुळवणे मॅडम, भंडारे सर, दिवटे सर यांच्याशी चर्चा केली या शतपदी मध्ये शिक्षक सेवक यांच्यासाठी पुरस्कार दिला जातो. 1. कै. बाबासाहेब पोतदार शिक्षण सेवा गौरव पारितोषिक 1987 –88 –सुदिर्घ सेवा, उन्नतीसाठी गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न, सामाजिक वा सांस्कृतिक सहभाग अशा विद्यामान शिक्षक व मुख्याध्यापकांना हा पुरस्कार 1989– 90 पासून निष्ठावंत चारित्र्य संपन्न अभ्यासू व सामाजिक कार्यात भाग घेणारा निवृत्त शिक्षक यांना हा पुरस्कार दिला जातो. अशा प्रकारे शिक्षकांच्या कार्याचा संस्थेकडून गौरव केला जातो. याचा आढावा घेतला.

**9. शतपदी,स्मरण शंभर वर्षाचे 1994– 03 खंड –9, प्रकाशक – कार्यवाह सांगली शिक्षण संस्था**

या शतपदिमध्ये – कै. सौ. कमला जोशी बाल मंदिर, सांगली डॉ. राजाभाऊ परचुरे शिशुमंदिर, दत्तनगर तासगाव बापूसाहेब रामचंद्र खवाटे हायस्कूल, अंकली, कै. श्रीमती मो. द. बर्वे प्राथमिक शाळा, सांगली प्राथमिक शाळा , गुरूवर्य दादोजी कोंडदेव सौनिक शाळा, तासगाव उद्योगरत्न धनी वेलणकर पुर्व प्राथमिक शाळा माधवनगर श्री. गजानन मिल्स शताब्दी विद्यालय माधवनगर सौ. सुंदराबाई शं. मालु इंग्लिश मिडी. स्कूल हरिपूर पूर्व प्राथ. या संदर्भातील माहिती उपलब्ध होते. शाळेनिहाय दादोजी कोंडदेव सौनिक शाळेच्या आंतरशालेय क्रिडा स्पर्धेच्या वेळीस भेटी देवून माहिती घेतली.

**10. शतपदी,स्मरण शंभर वर्षाचे ,2004– 13 ,खंड –10, प्रकाशक – कार्यवाह सांगली शिक्षण संस्था**

या शतपदीमध्ये – सौ. सुंदराबाई शं. मालू इंग्लिश स्कूल, हरिपूर प्राथ. माध्यमिक शेठ मुलचंद गोपिलाल मालू इंग्लिश स्कूल, माधवनगर , सौ. छाया नेमिचंद मालू प्री – प्रायमरी स्कूल, माधवनगर या शाळेची माहिती मिळते.

**11. तुषार वार्षिक अंक ,2008 ते 2016 –2017 प्रकाशक – कार्यवाह सांगली शिक्षण संस्था**

या अंकातून संस्थेची पहिली शाळा, सांगली संस्थेची स्थापना तिच्या विस्तारीत शाखा, कथा, नाटयछटा–चुटकुले निबंध, चरित्रे प्रवासवर्णन कविता अशा प्रकारचे लेखन आढळले. इंग्रजी, हिंदी, संस्कृत याही भाषातून लेखन केले जाते. शाळेची इमारत चित्रे, फोटो इत्यादींचे संदर्भ संशोधनासाठी वापरण्यात आले. त्याच बरोबर काही निरीक्षणाद्धारे माहिती घेतली चर्चा, भेटी, अहवाल याच्यामधून वर्णनातून व विश्लेष्णात्मक अभ्यास पद्धतीचा वापर करून हा प्रबंध पूर्ण केला आहे.

या संशोधनासाठी मला महात्मा गांधी विद्यामंदिराचे मुख्याध्यापक,माजी मुख्याध्यापक म. ला. पोतदार सर , अधिक्षक, वाणिज्य विभाग प्रमुख तोरे सर मुख्याध्यापक शिरतोडे सर प्राचार्य टोपकर मॅडम, सर्वच शाळेचे मुख्याध्यापक , साठे सर ,सुतार सर,गंगातीकर सर, सहस्त्रबुद्धे सर, माने सर, शिंदे सर यांच्याशी चर्चा करून संस्थेची माहिती , फोटो, कात्रणे मिळाली त्यांचा ही संदर्भ घेता आला. आजी–माजी विद्यार्थी यांच्याशी चर्चा केली 4 डिसेंबर 2016 रोजी संस्था वर्धापनाच्या दिवशी हजर राहून संस्थेच्या वाटचालीचा इतिहास अध्यक्ष, उपाध्यक्ष यांच्या तोंडून ही ऐकायला मिळाला त्याचाही वापर प्रबंधनासाठी करता आला.

# प्रकरण 4 थे

# माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थ निर्वचन

## 4.1 सांगली जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी व भौगोलिक स्थान

### 4.1.1 भौगोलिक स्थान

आजचे 'सांगली' शहर हे महाराष्ट्रातील एक नामवंत शहर म्हणून नावारूपाला आले आहे. सांगलीच्या आधी 'मिरज' हे इतिहासात महत्वाचे ठिकाण होते. शिलाहार राजांपैकी 'गौक' यांच्या काळात 'मिरींच' हा प्रांत होता. त्यामध्ये सांगलीचा समावेश होता. हा उल्लेख खिद्रापूर जि. कोल्हापूर येथील मंदिराच्या शिलालेखात आढळतो.[1] सांगली हे शहर पूर्व रेखांश 74–78° आणि उत्तर अक्षांश 16.44° या बिंदूवर वसलेले आहे.[2] सांगली शहराचा इतिहास शोधत असताना सुमारे सातशे वर्षे मागे जावे लागते. बाराव्या शतकापासूनचे उल्लेख इतिहासात नमूद केले आहेत. त्या शतकाच्या मध्यावर वैष्णव संप्रदायाचा प्रसार भारतात–विशेषत दक्षिण भारतात बराच झाला होता. या संप्रदायातील उत्तरादि मठाकडे सांगली गाव इनाम दिले होते, असा उल्लेख आदिलशाही काळात सापडतो.[3] उत्तरादि मठाचे वैष्णव स्वामी सत्यव्रततीर्थ यांची समाधी (वृंदावन) कृष्णेच्या काठी सांगलीच्या विष्णू घाटावर आहे. हा परिसर तपोवन म्हणून आज ही ओळखला जातो[4]

**सीमा :–**

हिंदुस्थानातील मुंबई इलाख्यामध्ये जी संस्थाने होती, त्यातील एक संस्थान म्हणजे सांगली संस्थान होय. या संस्थानाचे बहुतेक भाग तुटक–तुटक असल्याने त्याची एकच सीमा, सांगता येणार नाही. उत्तरेकडील मंगळवेढा तालुका आणि दक्षिणेकडील भीमा व तुंगभद्रा नद्या यांच्यामधील भागात सांगली संस्थानाचा सर्व मुलूख येत होता[5]

**हवामान –**

तेरदाळ व मंगळवेढा या तालुक्यात हवामान उष्ण होते, तर शहापूर तालुक्यात हवामान थंड होते. इतर तालुक्यात हवामान साधारण उष्ण असे होते.[6]

**भाषा –**

सांगली संस्थानामध्ये प्रामुख्याने मराठी व कानडी भाषा बोलल्या जात होत्या. यापैकी मराठी भाषा ही मिरज प्रांत, कुची आणि मंगळवेढा या तालुक्यात बोलली जायची तर शिरहट्टी तालुक्यात कानडी भाषा बोलली जात होती. संस्थानातील इतर तालुक्यात कानडी व मराठी दोन्ही भाषा बोलल्या जात होत्या.[7]

### 4.1.2 'सांगली' नावाची उत्पत्ती–

1) कृष्णातीरी वसलेल्या सुमारे सहा गल्ल्यांच्या गावाला 'सहा गल्ली' असे म्हणण्यात येऊ लागले व कालांतराने त्याचेच नाव 'सांगली' असे पडले अशी एक समजूत रूढ आहे.
2) दुसरी एक उत्पत्ती अशी आहे की, पूर्वी 'संगलकी' 'संगहलकी' असे कर्नाटकी पध्दतीचे नाव या गावाला होते. कालांतराने संगलकीचे रूपांतर 'सांगली' या नावात झाले.[8]
3) 'कृष्णा आणि वारणा' या दोन नद्यांचा संगम हरिपूरला आहे. त्यांच्या शेजारची ही वस्ती 'संगमी' असे म्हणण्यात येत होते. अशा नावाच्या उत्पत्ती संबंधी इ. स. 1856–57 यासंदर्भात एक कागदोपत्री पुरावा उपलब्ध आहे. तत्कालीन गावकामगार पाटील कै. पदमण्णा बीन वीरगोंडा पाटील यांच्या जमाखर्चाच्या वहीवर 'सा'–'ग'–'ली'

असे आहे. सा वर अनुस्वार नसलेले नाव आढळते ही जमाखर्चाची वही इ. स. 1856–57 सालची असे त्यावर लिहीले आहे. 'सांगली'.[9]

4) लहान गाव या अर्थी 'सनहळ्ळी', किंवा 'संगलगी' असा कर्नाटक सीमावर्ती उच्चार होत असावा. यापैकी कुठल्यातरी नावाचा अपभ्रंभ होत. सांगली हे नाव आज रूढ झाले आहे.[10] गावभागातील काही गल्ल्यापुरताच या गावाचा विस्तार होता

**4.1.3 सांगलीचा प्राचीन ऐतिहासिक आढावा :–**

इतिहासाच्या अभ्यासाच्या दृष्टीने इतिहासकार ऐतिहासिक कालखंडाचे तीन भाग पडतात. –

अ–प्राचीन,

ब–मध्ययुगीन,

क–अर्वाचीन

**<u>अ–प्राचीन</u> –**

आद्य मानव आपली वस्ती नदी काठी करत असे त्यामुळे त्यांची पाण्याची मुलभूत गरज भागवली जात होती. महाराष्ट्रातही प्रथम नदीकाठीच वस्ती झाल्याचे मानववंश शास्त्रज्ञ सांगतात. महाराष्ट्रात कृष्णा, गोदावरी, पंचगंगा, कोयना इ. नदयांच्या काठी इ. स.पूर्व तिस–या व चौथ्या शतकात तेथील दाट जंगले साफ करून मानवाने वस्ती केली.[11] सांगली शहर कृष्णा नदीच्या पूर्वेस वसले आहे. या शहराभोवतीची जमीन काळी व सुपीक आहे.महाराष्ट्रात इ.स.पूर्व सहाव्या ते इ.स.पूर्व चौथ्या शतकामध्ये इतिहासकाळ सुरू झाला. आर्यांच्या वसाहती महाराष्ट्रातही होत्या. मौर्योत्तर काळात नागरी संस्कृतीचा उदय होऊन अनेक खेडी अस्तित्वात आली. सांगलीपासून जवळच असणारी कराड व कोल्हापूर ही शहरे सात वाहनांच्या काळात व्यापारी दृष्टीने भरभराटीस आलेली शहरे होती.[12]

इ.स.पूर्व 230 ते इ.स. 230 पर्यंत सध्याच्या महाराष्ट्र, आंध्र व कर्नाटक प्रांतावर सातवाहनांचे राज्य होते. कराड व ब्रम्हपुरी येथे झालेल्या उत्खननावरून असे सिध्द होते की, सांगली व सांगलीच्या सभोवतालचा भाग सातवाहन राज्यात समाविष्ट होता.[13] डॉ. मिराशी यांनी सातवाहन काळाचा जो इतिहास लिहीला आहे, त्यात सातवाहन राज्याचा विस्तार सांगितला आहे. या सातवाहन राज्याच्या विस्तारामध्येच पटवर्धनांचे सांगली, कुरूंदवाड व मिरज हे भाग समाविष्ट होते.

सांगली, सातारा, कोल्हापूर, बेळगांव या भागास प्राचीन काळात 'कुंतलदेश किंवा कुंडल' असे संबोधले जात होते. सातवाहनांच्या –हासानंतर सांगली व त्याच्या आसपासचा परिसर माणच्या आद्य राष्ट्रकूट घराण्याच्या अधिपत्याखाली आला.[14] तसेच महाराष्ट्रातील काही भागावर वाकाटक घराण्याची सत्ताही प्रस्थापित होती. हे अजंठा येथील गुहा नं.16 मधील शिलालेखावरून समजते.[15]

वाकाटक घराण्याची राजवट सुमारे 200 ते 450 वर्षे चालली. त्याच्यानंतर दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकात बदामीचे चालुक्य घराणे उदयास आले. चालुक्य घराण्याची सत्ता इ.स.553 ते इ.स.753 पर्यंत होते. चालुक्याची राजधानी असणारे 'बदामी' हे ठिकाण सांगलीपासून फक्त शंभर – सव्वाशे मैलावर आहे. या चालुक्याचे शिलालेख सांगलीच्या आसपास मिरज, सातारा, बेळगाव, कोल्हापूर परिसरात उपलब्ध झाले आहेत. तसेच मुधाळे व सांगलीच्या पश्चिमेस 25 मैलावर आळते (जि. कोल्हापूर) या ठिकाणीही मिळालेले आहे.[16] बदामीच्या चालुक्य घराण्यानंतर सांगली व आसपासच्या परिसरावर मालखेडच्या राष्ट्रकूट घराण्याची सत्ता होती. यासंबंधी काही

शिलालेखातून माहिती मिळते. (इ.स.754 ते इ.स.973) [17] बदामीच्या राष्ट्रकूटानंतर या भागावर 10 व्या 11 व्या शतकात कल्याणीच्या चालुक्याची सत्ता प्रस्थापित झाली.

**शिलाहार घराण्याची राजवट (इ. स. 940 ते इ. स. 1218)**

ज्यावेळी 'कल्याणीचे चालुक्य' घराणे राज्य करीत होते, त्याच काळात कोल्हापूर, सातारा, कराड, बेळगाव, सांगली या भागामध्ये शिलाहार घराण्याची सत्ता उदयास आली. या घराण्याचे अनेक शिलालेख सांगली व आसपासच्या भागात उपलब्ध आहेत. या शिलालेखाबद्दल व्ही. व्ही. मिराशी यांनी प्रकाशित केलेल्या 'शिलाहार राजवंशाचा इतिहास' आणि 'कोरीव लेख' या ग्रंथात माहिती मिळते.[18]

इ. स. 1050 ते इ.स.1075 या काळात होऊन गेलेला मारसिंह नावाच्या राजाचा मिरज येथे (सांगलीजवळ) दि.24 डिसेंबर 1058 या तारखेचा उल्लेख करणारा एक शिलालेख सापडला आहे. या शिलालेखात तो म्हणतो, 'क–हाड, कुण्डी, मिरीज देश आणि समग्र कोकण देश' याचा मारसिंह हा अधिपती होते.[19] हा संपूर्ण शिलालेख महत्वाचा असून इ.स.1058 ला कोल्हापूरच्या शिलाहार राजाचे राज्य सांगली, मिरज व त्यांच्या आसपासच्या भागावर होते हे त्यावरून सिध्द होते. मिरज येथे सापडलेल्या या शिलालेखात राजा मारसिंहाने पाशुपतपंथी ब्रम्हेश्वर पंडिताचा शिष्य चिक्कदेव यास 'कुंटवाड' हे गाव दान दिल्याचा उल्लेख हे कुंटवाड गाव म्हणजेच कृष्णा नदीच्या काठी मिरजेच्या दक्षिणेस पाच मैलावर असलेले 'कुडवाड' असावे.[20] इ.स.1175 ते इ.स.1212 या काळामध्ये शिलाहार राजा 'दुसरा भोज' हा सांगली, कोल्हापूर भागावर राज्य करीत होता. याच काळात दक्षिणेस यादव घराणे उदयास आले. यादवांचा पराक्रमी राजा सिंघण याने शिलाहार राजा भोज यांचेवर आक्रमण केले. यादव व शिलाहार यांच्यात खिद्रापूर (नृसिंहवाडीजवळ) येथे घनघोर युध्द झाले. या युध्दात शिलाहार राजाचा पराभव झाला. नंतर शिलाहाराची राजधानी पन्हाळा जिंकून घेऊन यादव राजा सिंघण याने कोल्हापूर भागावर आपली सत्ता स्थापन केली होती.[21]

अशा प्रकारे सन 1212 पासून देवगिरीच्या यादवांची राजवट सुरू झाली.

**यादव कालखंड–**

इ.स.1212 ते इ. स. 1318 या काळात सांगली–मिरज–कोल्हापूर या भागावर देवगिरीच्या यादवांची सत्ता होती. प्राचीन महाराष्ट्रातील शेवटची हिंदु राजवट म्हणून यादवांकडे पाहिले जाते. यादवांचा मुख्य प्रधान हेमाद्री ऊर्फ हेमाडपंत हा होता. त्याच्या नावाने महाराष्ट्रात अनेक हेमाडपंती देवालये आढळतात.[22] सांगली, जत, भोर, विजापूर, गुलबर्ग इ. गावात जी हेमाडपंथी देवालये दिसतात त्यावरून या भागावर यादवांची सत्ता होती हे सिध्द होते. तसेच सांगली, सातारा, कोल्हापूर या भागात काही यादवकालीन शिलालेख आजही उपलब्ध आहेत. सांगलीपासून 30 मैलावर असणा–या खिद्रापूर देवालयातील यादवांचे शिलालेख हे तत्कालीन यादव सत्तेच्या अस्तित्वास दुजोरा देतात.

अशा प्रकारे प्राचीन काळात सांगली व आसपासच्या भागावर मौर्य, सातवाहन, वाकाटक, बदामीचे चालुक्य, मालखंडचे राष्ट्रकूट, कल्याणीचे चालुक्य, कोल्हापूरचे शिलाहार आणि देवगिरीचे यादव यांच्या राजवटी होऊन गेल्या. राजवटीचे मिळणारे शिलालेख आणि इतर ऐतिहासिक अवशेष यावरून त्या त्या राजवटीचे अस्तित्व लक्षात येते.

### 4.1.4 मध्ययुगीन कालखंड व सांगली–

मध्ययुगीन काळात इ. स. 1347 ते इ. स. 1409 पर्यंत बहामनी सुलतानाची सत्ता सांगली भागावर होती. सन 1490 ला विजापूरची आदिलशाही अस्तित्वात आली आणि सांगली–मिरज इ. स. 1686 पर्यंत आदिलशाहीच्या ताब्यातच हा भाग होता. याच काळात मिरजेला मुस्लीम केंद्र अस्तित्वात आले.[23]

### सांगली व विजापूरचे आदिलशहा–

इ. स. 1686 मध्ये औरंगजेबाने विजापूरची आदिलशाही कायमची बुडविली आणि मिरज हे मोगलांचे लष्करी ठाणे केले. इ. स. 1689 ते इ. स. 1707 हा कालखंड मराठयांच्या स्वातंत्र्ययुध्दाचा कालखंड मानला जातो. या काळात पन्हाळा व इतर किल्ले जिंकत असताना औरंगजेबाने आपला मुक्काम मिरज–सांगली या भागात ठेवला होता.

### मिरज व छत्रपती शिवाजी महाराज–

छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना 17 व्या शतकात केली. इ. स. 1672 मध्ये मिरज भाग छत्रपती शिवाजी महाराजांनी जिंकून घेतले होते. शिवाजी महाराजांचे सरदार इंद्रोजी कदम व त्यांच्या वंशराजानी सन 1736 पर्यंतची व्यवस्था पहाण्याचे काम केले. सरदार इंद्रोजी कदम यांची पुण्यात मोठी पागा व फौज होती. या पागेच्या 'फडणिशी' पदावर सन 1730 मध्ये गोविंद हरी पटवर्धन यांची नेमणूक पेशव्यांनी केली होती. इ. स. 1736 मध्ये झालेल्या दिल्ली मोहिमेच्या वेळी इंद्रोजी कदम मारले गेले. सरदार इंद्रोजी कदम निपुत्रिक असल्याने मिरज व त्याच्या आसपासची सरदारकी गोविंद हरी पटवर्धन यांना इ. स. 1741 मध्ये देण्यात आली.[24] इ. स. 1739 मध्ये छत्रपती शाहूंनी सांगली–मिरज भागात मोहिम काढली होती. असाही एक उल्लेख सापडतो.

### इंद्रोजी कदम :–

इ. स. 1672 मध्ये मिरज भाग छत्रपती शिवाजी महाराजांनी जिंकून घेतला. त्यानंतर सरदार इंद्रोजी कदम व त्यांच्या वंशजांनी सन 1736 पर्यंतची व्यवस्था पाहण्याचे काम केले. सरदार इंद्रोजी कदम यांची पुण्यात मोठी पागा व फौज होती. या पागेच्या 'फडणिशी' पदावर सन 1730 मध्ये गोविंद हरी पटवर्धन यांची नेमणूक पेशव्यांनी केली होती. इ. स. 1736 मध्ये झालेल्या दिल्ली मोहिमेच्या वेळी इंद्रोजी कदम मारले गेले. सरदार इंद्रोजी कदम निपुत्रिक वारल्यामुळे मिरज व त्याच्या आसपासची सरदारकी गोविंद हरी पटवर्धन यांना इ. स. 1741 मध्ये देण्यात आली. इ. स. 1739 मध्ये छत्रपती शाहूंनी सांगली–मिरज भागात मोहिम काढली होती. असाही एक उल्लेख सापडतो.

अशाप्रकारे सांगली व त्याच्या आसपासच्या भागाने प्राचीन काळापासून मध्ययुगीन काळापर्यंत अनेक हिंदू व मुस्लिम राजवटी पाहिल्या आहेत. सन 1741 पर्यंतच्या इतिहासाचा हा थोडक्यात आढावा आहे.

### 4.1.5 पेशवे व पटवर्धन घराणे :–

18 व्या शतकात या मराठी सत्तेला अखिल भारतीय स्वरूप देण्याचे कार्य पेशव्यानी केले तर पेशव्यांच्या नेतृत्वाखाली शूर मराठी सरदारांनी उत्तर भारतात साम्राज्याचा विस्तार केला होता. अटकेपार मराठी राज्य नेले. शिंदे, होळकर, पवार, गायकवाड या सरदारांनी उत्तर भारतात जहागिरी मिळविल्या होत्या व त्यांचीच पुढे स्वतंत्र संस्थाने स्थापन झाली.[25]

उत्तर भारताप्रमाणेच दक्षिणेतही घोरपडे, रास्ते,पटवर्धन हे सरदार उदयास आले आणि त्यांनी मराठी राज्याची सीमा तुंगभद्रेपर्यंत नेली. पटवर्धन सरदार हे पेशव्याच्या कालखंडात निर्माण झालेले एक सरदार आहेत. या पटवर्धनाना पहिली जहागिरी सन 1741 ला मिरज, सांगली, कुरूंदवाड या भागात मिळाली. इ. स. 1741 ते इ. स. 1818 पर्यंत पटवर्धन सरदारांनी मराठी राज्यांची सेवा केली. पटवर्धन सरदार शूर आणि लढवये होते. अनेक लढाया जिंकून त्यांनी मराठी सत्तेचा दक्षिण भारतात राज्य विस्तार केला होता. नानासाहेब पेशवे आणि माधवराव पेशवे यांच्या कारकिर्दीमध्ये मराठी राज्याचे प्रमुख आधारस्तंभ म्हणून पटवर्धन सरदारांकडे पाहिले जात होते. सन 1761 नंतर माधवराव पेशव्यांनी काढलेल्या कर्नाटक मोहिमांमध्ये पटवर्धन सरदारांचा सिंहाचा वाटा होता. सन 1795 च्या खडर्याच्या लढाईत, मराठी राज्याचे प्रमुख सेनापतीपद तासगावचे परशुराम पटवर्धन यांच्याकडे होते.[26]

### सांगली संस्थानाचे क्षेत्रफळ व इतर सामान्य माहिती :–

पटवर्धन सरदारांची जी संस्थाने होती. त्यामध्ये सांगली हे सर्वात महत्वाचे संस्थान होते. सांगलीला या संस्थानांच्या राजधानीचा दर्जा होता. 1925 साली सांगली संस्थानामध्ये एकूण 264 गावांचा समावेश असून संस्थानाचे क्षेत्रफळ 1215 चौरस मैल होते. त्यावेळची लोकसंख्या सुमारे 2,25,000 इतकी होती तर संस्थानाचे उत्पन्न 14,00,000 |– रूपये होते.[27] ज्यावेळी संस्थान मुंबई प्रांतात विलीन झाले. त्यावेळी संस्थानातील गावाची संख्या 285 होती, तर एकूण क्षेत्रफळ 1136 चौरस मैल होते. या वेळची लोकसंख्या 2,93,381 इतकी होती. तर संस्थानचे उत्पन्न 16,80,244 |– रूपये होते. [28]

दक्षिण संस्थानात जी 18 संस्थाने होती. त्यामध्ये उत्पन्नाच्या दृष्टीने कोल्हापूर नंतर सांगली संस्थानाचा नंबर लागतो. या संस्थानातून कृष्णा, वारणा, भीमा, मोरणा, वेरळा, माणगंगा, तुंगभद्रा, मार्कंडी, अग्रणी आणि बारे या नद्या वाहतात. कृष्णा नदी ही सर्वात मोठी व महत्वाची नदी आहे.

### पटवर्धन घराण्याचा पूर्व इतिहास :–

पटवर्धनांचे सांगली संस्थान हे सदर्न मराठा कंट्री (S.M.C.) मधील एक महत्वाचे आणि अग्रेसर संस्थान होते. इतर पटवर्धन संस्थानाप्रमाणे सांगली संस्थानाच्या पटवर्धनाचा इतिहासही त्यांचा मूळ पुरूष हरभट यांच्यापासून सुरू होतो. पटवर्धनाचे मूळ पुरूष हरभट मूळचे कोकणातील रत्नागिरी जिल्हयातील कोतवडे गावचे होते. कोतवडे रत्नागिरीपासून सुमारे अडीच कोस अंतरावर वसलेले आहे.[29] हरभट हे मूळचे उत्तम वैदिक ब्राम्हण होते व वेद विद्येत पारंगत होते. या घराण्याकडे कोतवडयाचे ग्रामोपाध्येपण व कोतवडयाचे खोत, सहस्त्रबुध्दे यांचे कुलोपाध्यायपणही होते.[30] हरभटांच्या वडिलांचे नाव बाळभट्ट होते.

### हरभटाचा जन्म :–

अंदाजे इ. स. 1655 ला झाला.[31] बालपण कोतवडे येथेच बालपण गेले. त्यांनी चार वेद, धर्मशास्त्र, 18 पुराणे इ. अभ्यास केला होता. ते विदवान गृहस्थ म्हणून ओळखले जातात. घरच्या गरिबीमुळे उदरनिर्वाहासाठी त्यांना आपले मूळ गाव सोडावे लागले. तेथून रत्नागिरी जिल्हयातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र गणपतीपुळे येथे गेले. गणपतीपुळयास त्याचे बारा वर्षे वास्तव्य होते. पुढील काळात या घराण्यास राजवैभव प्राप्त झाले. श्री. गणपतीपुळे येथील पुरोहित शेंडे यांच्या मुलीबरोबर हरभट यांचा विवाह झाला. विवाह झाल्यावर काही काळाने हरभट कोकण सोडून देशावर आले ते कोणत्या साली देशावर आले हे निश्चित समजू शकत नाही. पण अंदाजे सन 1700 च्या आसपास ते देशावर आले असावेत.[32] मिरज सुभ्याचे मूळ सरदार कदम ते मराठाशाहीचे मानकरी होते. दिल्लीच्या

मोहिमेत इंद्रोजी कदम (1763) मध्ये कामी आले. ते निपुत्रीक असल्याने मिरजेची सरदारकी पटवर्धनाच्याकडे आली. हरभट बाबा हे मिरज शाखेचे मूळ पुरूष मानले जातात**33** मिरज प्रांतातील 22 कर्यातांपैकी सांगली ही एक कर्यात जवळपास तीन चार गावांना मिळून एक कर्यात (उत्तर काळातील सर्कल) म्हणावे लागेल.[34]

### हरभट व नारो महादेव जोशी :–

मराठे सरदार कापशीकर घोरपडे यांचे नारायण महादेव जोशी नावाचे मंत्री होते. या नारो महादेवांनी हरभटांची आपले कौटुंबिक पुरोहित म्हणून नेमणूक केली. इचलकरंजीकर घोरपडे सरदारांमार्फत पटवर्धनांचा मराठयांचा राजकारणात प्रवेश झाला.

हरभट यांना एकूण 7 मुले व 1 मुलगी होती. त्यांची नावे कृष्णभट, बाळभट्ट, त्रिंबकपंत, गोविंदपंत, महादेव, रामचंद्र आणि भास्कर अशी होती. या सातभावांपैकी महादेव भटाचा मृत्यु अकाली झाला. हरभटाच्या मुलीचे नाव ताराबाई होते व ती वैशंपायन घराण्यात दिली होती. सहा मुलांपैकी गोविंदपंत, त्रिंबकपंत, रामचंद्र हे स्वकर्तृत्वाने मराठयांच्या इतिहासात प्रसिद्ध आले. इ. स. 1750 मध्ये हरभटाचे पुणे मुक्कामी निधन झाले. पुढे त्याचा चौथा मुलगा गोविंदपंत याने आपल्या पित्याच्या स्मरणार्थ सांगलीजवळ कृष्णा नदीच्या तीरावर एक गाव वसविले, त्या गावाचे नाव 'हरिपूर' असे ठेवण्यात आले.

### गोविंद हरी :–

गोविंद हरी हा हरभटाचा चौथा मुलगा होय. मराठयांच्या राजकारणात त्याचा प्रवेश सन 1719 मध्ये झाला.[35] 1719 साली गोविंद हरी पेशवा बाळाजी विश्वनाथ यांच्या सेवेत गेले. स्वतःच्या हुशारीने आणि कौशल्याने त्यानी पेशव्यांची मर्जी संपादन केली होती. इ. स. 1720 मध्ये पेशवा बाळाजी विश्वनाथ यांचे निधनानंतर त्यांचा ज्येष्ठ मुलगा पेशवा पहिला बाजीराव यास शाहूने पेशवे पदाची वस्त्रे दिली.

पहिल्या बाजीरावाची कारकिर्द इ. स. 1720 ते 1740 अशी होती. पूर्वी सांगितल्याप्रमाणे या काळात इंद्रोजी कदम हा पहिल्या बाजीरावाचा एक निष्ठावंत व लढवया सरदार होता. या इंद्रोजी कदमांकडे गोविंद हरी पटवर्धन काही काळ हिशोब तपासनीस म्हणून नोकरीस होता. पुढे सन 1741 मध्ये इंद्रोजी कदमांचे निधन झाल्यावर त्याच्या ठिकाणी त्या घोडदळाचा प्रमुख म्हणून गोविंद हरीची नेमणूक पेशव्यांनी केली.[36]

या गोविंद हरी संबंधी आणखी एक उल्लेख चिंतामणराव पांडुरंग पटवर्धन यांच्या रोजनिशीमध्ये सापडतो. त्यांच्या रोजनिशीमध्ये गोविंद हरी यांनी पेशवा बाळाजी विश्वनाथ यांच्या हाताखाली इ. स. 1719–20 मध्ये नोकरी केली असा उल्लेख आहे.[37]

गोविंद हरीसंबंधी सन 1739 चा एक महत्वाचा ऐतिहासिक संदर्भ पुढील प्रमाणे इ. स. 1739 मध्ये इराणच्या नादिरशहाने दिल्लीवर स्वारी केली व प्रचंड लूट घेऊन तो परत गेला. त्यानंतर वजीर कमरूद्दीन याने उत्तर भारतामध्ये असणा–या मराठा सरदारांवर हल्ला केला. त्यामध्ये संताजी जाधव, रघूजी भोसले आणि गोविंद हरी पटवर्धन या मराठे सरदारांचा पराभव झाला. यावरून सन 1739–40 मध्ये इतर मराठे सरदारांच्या बरोबर काही पटवर्धन सरदार सुध्दा बाजीरावाच्या नेतृत्वाखाली उत्तर भारतातील स्वा–यांमध्ये भाग घेत होते असे दिसून येते.[38]

### गेविंद हरी पटवर्धन आणि नानासाहेब पेशवे

सरदार इंद्रोजी कदमांच्या निधनानंतर सन 1741 मध्ये नानासाहेब पेशव्यांनी गोविंद हरी पटवर्धनांना शिलेदारी दिली. लष्करी सरंजाम व जहागिरी देऊन पालखी वापरण्याचा मान मिळाला. इ. स. 1759–60 च्या कर्नाटक

मोहिमेमध्ये गोविंद हरीचा मुलगा गोपाळराव पटवर्धन याने भाग घेतला होता. तसेच नानासाहेब पेशव्यांनी ज्या दक्षिण मोहिमा काढल्या त्या मोहिमेतही पटवर्धन सरदारांनी भाग घेतला होता.[39]

रियासतकार सरदेसाई – ज्याप्रमाणे बाजीरावाने शिंदे–होळकरांना उत्तर भारतात मराठी राज्य विस्तारासाठी नेमले त्याचप्रमाणे नानासाहेब पेशव्यांनी पुरंदरे, पानसे, रास्ते, मेहंदळे व पटवर्धन सरदार यांना दक्षिण भारतात राज्य विस्तारासाठी नेमले होते.[40]

नानासाहेबांच्या कारकिर्दीतच पटवर्धन सरदारांना मंगळवेढा, मिरज, कुरूंदवाड आणि इतर ठिकाणच्या जहागिरी मिळाल्या. पुढे माधवराव पेशव्यांच्या कारकिर्दीमध्ये या जहागिरींना अधिकृत मान्यता पुणे दरबाराकडून देण्यात आली.

## माधवराव पेशवे आणि पटवर्धन सरदार

गोविंद हरी, त्रिंबकपंत आणि रामचंद्र हरी या भावंडांनी इ. स. 1762 च्या दरम्यान मिरज हे आपले प्रमुख ठाणे केल्याचे दिसते. पूर्वी इ. स. 1757 मध्ये झालेल्या उद्गीरच्या लढाईत गोविंद हरीने भाग घेतला होता. म्हणून नानासाहेब पेशव्यांनी कर्नाटकातील कुंदगोळाचा सुभा गोविंद हरी यांना दिला होता.[41] परंतु ख–या अर्थाने पटवर्धनांना अधिकृत जहागिरी देऊन सरदार बनवण्याचे काम माधवराव पेशव्यांनी केले. अशाप्रकारे पटवर्धनांच्या जहागिरीस राजमान्यता मिळाली. या संदर्भात सन 1764 चा तैनाती जाबता अतिशय महत्वाचा आहे. हा तैनाती जाबता म्हणजे एक महत्वाची सनदच आहे.[42] गोविंद हरीने त्याच्या भावांसह आपली चाकरी करावी म्हणून माधवराव पेशव्यांनी मिरज, सांगली, कुरूंदवाडच्या आसपासचा 25,41,900 |– रूपये महसूल मिळणारा प्रांत जहागिरी म्हणून त्यांना दिला. याच जहागिरीमध्ये पुढे मिरज (ज्युनिअर), मिरज (सिनिअर), कुरूंदवाड (ज्युनिअर), कुरूंदवाड (सिनिअर), सांगली, तासगांव, मंगळवेढा, जमखंडी इ. उपघराणी उदयास आली.

सन 1764 मध्ये गोविंद हरींना दिलेला तैनात जाबता खालीलप्रमाणे :–[43]

4600 गोविंद हरीचे घोडदळ

2400 परशुराम भाऊ

1000 निलकंठ त्रिंबक

**8000 एकूण**

पटवर्धन घराणे हे एकत्र कुटुंब असल्याने हा तैनात जाबता गोविंद हरीच्या नावाने दिलेला दिसतो. त्यांना मिळालेली ही जहागिरी सर्वसाधारणपणे 15 ते 18 उत्तर अक्षांशामध्ये व तुंगभद्रा–कृष्णा नदीपर्यंत ही जहागिरी पसरलेली होती. सांगली, मिरज, कुरूंदवाड हा कृष्णा नदी तीरावरील सुपीक भाग त्यांना जहागिरी म्हणून मिळालेला होता. या भागातील जहागिरी पटवर्धन सरदारांना देण्यामागे पेशव्यांचे काही हेतू होते. त्यातील प्रमुख हेतु म्हणजे पेशव्यांचे आणि करवीरच्या छत्रपतींचे संबंध दुरावलेले होते. याबाबतीत शिवाजी विद्यापीठामार्फत डॉ. आप्पासाहेब पवार यांनी प्रकाशित केलेल्या 'ताराबाई कालीन कागदपत्रे' या खंडात बरीच माहिती मिळते. पेशवे व करवीरचे छत्रपती यांचे संबंध दुरावलेले होते. हे सांगणारे बरेच कागद या खंडात प्रकाशित केले होते. करवीर छत्रपतीवर लक्ष ठेवणे व त्यांच्या हालचालीवर नियंत्रण ठेवणे यासाठी कोल्हापूर प्रांताजवळचा भाग पटवर्धनाना दिल्याचे दिसते.[44] हा भाग देण्यामागील आणखी एक कारण म्हणजे, दक्षिणेतील हैदरअलीच्या हालचालीवर नियंत्रण ठेवणे सोपे जावे हा होता.[45] गोविंद हरी पटवर्धन यांचे 21 नोव्हेंबर 1771 रोजी मिरज मुक्कामी निधन झाले. त्यामुळे एका शूर मराठा सरदारास पेशवाई मुकली. गोविंद हरींना चार पुत्र होते. गोपाळराव वामनराव, पांडुरंगराव व गंगाधरराव तात्या अशी

त्यांची नावे होती. गोपाळराव हा वडिलांप्रमाणेच शूर व धाडसी होता. परंतु इ. स. 1771 मध्ये हैदरअली बरोबर झालेल्या 'हलाशिगी' लढाईत त्याचे दुदैवाने निधन झाले.[46] गोविंद हरीने या घटनेचा धक्का घेतल्याने त्याचेही नोव्हेंबर 1771 मध्ये निधन झाले. पुढे पेशव्यांनी वामनरावांना सरदारकीची वस्त्रे दिली. त्यांनी मराठे व हैदर यांच्यात मोतीतलाव येथे झालेल्या लढाईत भाग घेतल होता. 2 ऑक्टोंबर 1775 रोजी तापी नदीच्या तीरावर वरणगाव येथे पेशव्यांच्या सैन्याचा तळ पडला असता त्यांचे अकाली निधन झाले.[47] त्या काळात दक्षिणेत हैदरअलीचा प्रभाव वाढत होता. पांडुरंगराव यांना सरदारकी देण्याचे पुणे दरबाराने ठरविले. कर्नाटकातील तुंगभद्रा तीरावर बेलार, गुत्ती, सावनूर या भागात आपल्या लष्करानिशी गेला होता. हैदरअलीबरोबर झालेल्या युध्दात पांडुरंगराव कैदत पडला व त्याला अतिशय अपमानित वागणूक दिली गेली. कैदेत असतानाच श्रीरंगपट्टण येथे दि.4 नोव्हेंबर 1777 रोजी पांडुरंगरावाचा मृत्यु झाला.[48]

माधवराव पेशव्यांच्या निधनानंतर पुणे दरबारात अनेक राजकीय चढउतार झाले. शेवटी इ. स. 1795 नंतर रघुनाथराव पेशव्यांचा मुलगा 'दुसरा बाजीराव' याच्या हाती सत्ता आली. या काळात पटवर्धन सरदारांना वाईट दिवस आले. इ. स. 1818 मध्ये पेशवाईचा अस्त झाल्यानंतर इतर संस्थानिकांप्रमाणे चिंतामणराव हे ब्रिटीशांचे एक मांडलिक संस्थानिक झाले.

अशाप्रकारे गोविंद हरीचा नातू चिंतामणराव हा सांगली संस्थानांचा संस्थापक बनला. पटवर्धनांची मूळ जहागिरी जरी गोविंद हरीच्या नावे होती, तरी त्यामध्ये रामचंद्र हरी व त्रिबंक हरी असे आणखी दोन भागीदार होते. जहागिरीतील हे तीनही ठिकाणी राहात होते.

1) गोविंद हरीचे वंशज मिरज या ठिकाणी तर त्रिंबक हरीचे वंशज कुरूंदवाड येथे राहात होते. रामचंद्र हरीचा मुलगा परशुराम भाऊ हा तासगांव या ठिकाणी राहत होता.[49]

**चिंतामणराव आप्पा पटवर्धन ('संस्थापक' सांगली संस्थान यांची कारकीर्द) :–**

चिंतामणराव पटवर्धन पहिले यांच्या कारकिर्दीत दुर्देवाने मराठेशाहीचा पर्यायाने पेशवाईचा –हास झाला. इ. स. 1783 मध्ये चिंतामणरावांना सरदारकीची वस्त्रे मिळाली. त्यावेळी पुण्यामध्ये सवाई माधवराव यांची कारकीर्द होती. सवाई माधवरावाच्या मृत्यूनंतर राघोबादादांचा मुलगा दुसरा बाजीराव हा इ.स.1795 मध्ये पेशवा झाला आणि मराठी सत्तेचा –हास जवळ आला. चिंतामणरावांनी नाना फडणीसांची कारकीर्द तसेच बारभाईचे कारस्थानही पहिले सवाई माधवरावांची दुर्देवी आत्महत्याही पाहिली.

**जन्म व बालपण :–**

सांगलीचे आद्य संस्थापक चिंतामणराव पटवर्धन पहिले यांचे पणजे म्हणजे हरभट बुवा होय.[50] पहिले चिंतामणराव यांचा जन्म गुरूवार दि. 05.01.1775 रोजी मिरज किल्ल्यात झाला.[51] गुरूवार दि.06.02.1783 रोजी (माघ शु. 5 शके 1704) चिंतामणराव आप्पासाहेब यांना सरदारकीची वस्त्रे देण्यात आली होती. त्यावेळी त्यांचे वय केवळ आठ वर्ष असल्याने घरचा व दौलतीचा कारभार त्यांचे चुलते गंगाधरराव बाळासाहेब हे पाहत होते. तर पेशवे दरबारी होणारा पत्रव्यवहार चिंतामणराव यांच्यातर्फे परशुरामभाऊ पहात होते.[52]

**गृहकलह –**

चिंतामणराव आप्पासाहेब यांच्या कारकिर्दीत त्यांचे चुलते मिरजेचे गंगाधरपंत बाळासाहेब यांच्याबरोबर गृहकलह झाला. पुढे सांगली व मिरज अशी दोन स्वतंत्र संस्थाने स्थापन करण्यात आली होती. गंगाधरपंत

बाळासाहेब यांना पटवर्धन सरदारांची वस्त्रे मिळावीत अशी आशा वाटत होती. परंतु ही महत्वाकांक्षा सफल न झाल्याने चिंतामणराव त्यांच्या मातोश्री (ज्यांना बाई म्हणत) आणि गंगाधरपंत बाळासाहेब यांच्यात आठ ते दहा वर्षे सुप्त संघर्ष चालू होता. गंगाधरपंत बाळासाहेब यांनी पटवर्धन घराण्याचे कर्ते परशुरामभाऊ यांच्याकडे व पुणे दरबारातही सरदारकीची वस्त्रे मिळावीत म्हणून खटाटोप केला.[53]

गंगाधरपंत आणि चिंतामणराव यांच्यात लहान लहान गोष्टींवरून मतभेद होऊ लागले व या सर्वांची परिणती म्हणून इ.स.1799 मध्ये स्वतंत्र सांगली संस्थानाची स्थापना झाली.

**चिंतामणराव व लॉर्ड वेलस्ली :–**

इ. स. 1799 ते 1804 या काळात गव्हर्नर जनरल असणारा लॉर्ड वेलस्ली हा भारतातील एक साम्राज्यवादी गर्व्हनर जनरल म्हणून प्रसिद्ध होता. त्याने भारतात तैनाती फौजेची पद्धत सुरू केली व अनेक संस्थानिकांना आपल्या छत्राखाली घेतले. दुस–या बाजीरावाने इ. स. 1802 मध्ये तैनाती फौजेचा स्वीकार केला. त्यामुळे पेशव्यांचे सरदार म्हणून पटवर्धनाना काहीकाळ इंग्रजांच्या बाजून लढावे लागले. कर्नाटकामध्ये धोंडजी वाघ नावाच्या व्यक्तीने दक्षिणेत आणि पटवर्धनांच्या हद्दीत धुमाकुळ घातला होता. याचा बंदोबस्त करण्यासाठी लॉर्ड वेलस्लीने एक व्यापक मोहिम आखून त्यात चिंतामणराव पटवर्धन यांना आपल्या फौजेत सामील करून घेतले.[54] पुढे जेव्हा इ. स. 1800 मध्ये धोंडजी वाघाची गाठ पहिले चिंतामणराव यांच्याबरोबर पडली तेव्हा धोंडजी वाघ पराभूत होऊन मरण पावला. या पराक्रमामुळे पहिल्या चिंतामणरावांची इंग्रज दरबारात आणि पुणे दरबारातही प्रतिष्ठा उंचावली. दुसरा बाजीराव पेशवे यांनी पहिल्या चिंतामणरावांना पुण्यात बोलावून त्यांचा बहुमान केला.[55] 15 जुलै 1800 रोजी पहिले चिंतामणराव व लॉर्ड वेलस्ली यांची प्रत्यक्ष भेट झाली होती. त्यावेळी लॉर्ड वेलस्लीने त्यांना 13 तोफांच्या सलामीचा मान दिला होता.[56] चिंतामणराव हे शूर उमेद, दिलदार, मोकळया वृत्तीचे व सहकार्य करण्याच्या वृत्तीचे असल्याने इंग्रज गव्हर्नरांशी त्यांचे विशेष नाते तयार झाले होते.[57]

**4.1.6 सांगली स्वतंत्र संस्थान –**

इ.स.1799 मध्ये पहिले चिंतामणराव व गंगाधरपंत यांच्यात वाटण्या होऊन सांगली स्वतंत्र संस्थान निर्माण झाले. त्यांनी राजधानीसाठी सांगली नावाची निवड केली. साधारणपणे इ. स. 1807 मध्ये सांगली हे नवीन राजधनीचे ठिकाण म्हणून अस्तित्वात आलेचे काही कागदपत्रांवरून दिसते.[58] नवीन राजधानीचा योग्य असा नकाशा काढून त्यामध्ये रस्ते, बाजारपेठा यांचे नियोजन केले आहे. तसेच आराध्य दैवत श्री गणपतीचे मंदिर बांधून त्यासाठी स्वतंत्र गणपती संस्थानाची स्थापना केली. दुस–या बाजीरावाचा पटवर्धनांवर रोष असल्यामुळे इ. स. 1802 ते इ. स. 1818 हा काळ चिंतामणराव पटवर्धनांना व इतर पटवर्धन सरदारांनाही अतिशय वाईट गेला. दुसरा बाजीराव आणि इंग्रज यांच्यात शेवटचे युध्द इ.स.1817–18 झाले. या युध्दामध्ये बाजीरावाचा संपूर्ण पराभव झाला. त्यावेळी इतर संस्थानिकाप्रमाणे पटवर्धनाची संस्थाने इंग्रजांची मांडलिक संस्थाने झाली. इ. स. 1820 मध्ये इंग्रज आणि पहिले चिंतामणराव यांच्यात तह होवून सांगली हे सुध्दा मांडलिक संस्थान बनले.

अशा प्रकारे सन 1818 मध्ये इंग्रजांनी दुसरा बाजीरावाचा पाडाव केला आणि मराठी राज्याचा शेवट झाला. इ. स.1800 पासून चिंतामणराव पटवर्धनांनी इंग्रजांशी विशेषतः लॉर्ड वेलस्ली आणि एल्फिन्स्टन यांच्याशी सलोख्याचे संबंध ठेवले होते. त्यामुळे इंग्रजांनी पटवर्धनांची जहागिरी न बुडवता त्यास स्वतंत्र संस्थान (Native state) म्हणून मान्यता दिली. अशा प्रकारे पहिले चिंतामणराव पटवर्धन हे इंग्रजांचे मांडलिक म्हणून पुढील राज्यकारभार करू लागले.[59]

एल्फिन्स्टन नंतर सर जॉन माल्कम हा मुंबई प्रांताचा नवीन गव्हर्नर झाला. या दोघांचेही संबंध चांगले होते. माल्कम नंतर अर्ल ऑफ क्लेअर यांने सुध्दा सन 1833 मध्ये सांगलीला भेट दिली. त्याने सुध्दा चिंतामणराव आणि त्यांचे प्रशासन याबद्दल अतिशय चांगले उद्गार काढले आहेत.[60] पहिले चिंतामणराव आप्पासाहेबांचे 15 जुलै 1851 रोजी वयाच्या 77 व्या वर्षी निधन झाले.[61]

पहिले चिंतामणराव यांची कारकीर्द प्रदीर्घ होती. त्यांनी मराठी सत्तेचा शेवट कसा होत गेला हे पाहिले. बदलत्या परिस्थितीशी मिळते–जुळते घेण्यावाचून भारतातील सर्व संस्थानिकांना पर्याय नव्हता. त्यास सांगलीचे चिंतामणराव हे सुध्दा अपवाद नव्हते.

### 4.1.7 स्वतंत्र सांगली जिल्ह्याची निर्मिती –

''सांगली'' म्हणजे वसंत दादांचे गाव. अशीच ओळख आज देशपातळीवर होत आहे. सांगली हळद व्यापा–यांची जागतिक पेठ, नाटय रसिकांची लाडकी नाटय पंढरी आणि पूर्वी दक्षिण सातारा म्हणून ओळखला जाणारा, 'सांगली जिल्हा' 21 नोव्हेंबर 1960 पासून स्वतंत्रपणे अस्तित्वात आला. 86015 चौरस कि.मी. असा जुन्या साता–या जिल्हयातील शिराळा तालुक्याने स्वातंत्र्य संग्रामात इतिहास घडविला. वाळवा तालुक्याने 'प्रतिसरकार' स्थापण्याचा विक्रम केला. या जिल्ह्याचा वारसाही मोठा आहे.

सांगली म्हणजे बुध्दिबळ स्पर्धेच आंतरराष्ट्रीय स्पर्धाचं गांव गुरूवर्य, भा. प. म्हैसकर, पहिले बुध्दिबळपटू परदेशी गेला तो सिटी हायस्कूलचे विद्यार्थी म्हणूनच नंतर गुरूवर्य भाऊराव पडसलगीकर यांनी सांगलीची ओळख 'बुध्दिबळ नगरी' अशी बदलली. कबड्डी, मल्लखांब, कुस्तीची पंढरी, वैद्यकीय सुविधांचा गाव म्हणून मिरजेची प्रसिध्दी आहे. मराठीतील पहिले ज्ञानपीठकार वि. स. खांडेकर सांगलीचेच कथाकार श्री. दा. पावलकर, कवी साधुदास, आण्णाभाऊ साठे, म. भा. भोसले, कृ. पा. कुलकर्णी सरोजिनी बाबर आणि आटपाडी तालुक्याचे तीन सुपुत्र ग. दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर आणि शंकरराव खरात यांनी साहित्य क्षेत्रात आपले नाव कमावले आहे. हे तिघेही साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले होते. पु. ल. देशपांडेंचे शिक्षणही काही काळ सांगलीतच झाले. प्रा. सुभाष भेंडेचे बालपण ते तरुणपण सांगलीतच गेले. अशा नावांची परंपरा या सांगली जिल्ह्याला लाभली आहे. जनकवी पी. सावळाराम नाटयाचार्य, गोविंद बल्लाळ देवल, बालगंधर्व, मा. दीनानाथ या थोर साहित्यिकांनी जिल्ह्याचे नाव राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर नेले आहे.. त्याचबरोबर 'श्वास' चित्रपटाच्या कथा लेखिका माधवी घारपुरे सांगलीच्याच. 'सानिया' चा जन्मही सांगलीचा. कवी गिरीश, श्रीनिवास कुलकर्णी हे औदुंबरचे 'डोहकार' म्हणून प्रसिध्द आहेतच. 'दत्त दिगंबर दैवत माझे' लिहिणारे कवी सुधांशु औंदुबरचे, लोक कलांचे अभ्यासक अशोकजी परांजपे, हरीपूरच्या प्रा. तारा भवाळकर याही सांगलीच्याच. अशीही कृष्णाकाठची साहित्य परंपराही सांगलीचीच. प्रा. देवदत्त पाटील, वसंत सबनीस, आचार्य जावडेकर यांची परंपरा इथलीचं[62]

शासनाने 'मोफत आणि सक्तीचं शिक्षण देणारा कायदा' नुकताच लागू केला. पण हा कायदा यापूर्वीच सांगली संस्थानात होता. पुणे शहरानंतर सांगली हे शिक्षणाचे केंद्रच बनले आहे. इथे पूर्वी वेदविद्येच्या शाळा होत्या. सर्व जाती धर्माच्या विद्यार्थ्यांना रहायला वस्तीगृह, अनाथाश्रम आणि स्त्रियांच्या शिक्षणाला उत्तेजन मिळावे म्हणून दिली जाणारी शिष्यवृत्ती हे या जिल्ह्याचे वैशिष्ट्य आहे. सन 1861 मध्ये सांगलीत सार्वजनिक शिक्षणास प्रारंभ झाला. सन 1877 ला मोफत शिक्षण देण्याची योजना सांगली संस्थानात सुरू झाली. शिक्षकांसाठी ट्रेनिंग कॉलेज, वालचंद कॉलेजमुळे विद्यार्थ्यांचा ओढा सांगलीत वाढला. सांगली जिल्ह्याच्या प्रत्येक तालुक्यात पदवी कॉलेज सुरू झाली. त्याची संख्या 42 झाली, पदव्युत्तर शिक्षण देणारी महाविद्यालये आहेत, व्यावसायिक अभ्यासक्रम देणा–या बी. एड्. कॉलेजची संख्या 10, डी. एड. 33, विधी 2, इंजिनिअरिंग 5, मेडिकल 2 असे शिक्षणाचे जाळे सांगली जिल्ह्यात

आहे. फार्मसी, बी. पी. एड्. कलाविश्व, ग्रंथालयशास्त्र पदवी, पदव्युत्तर शिक्षण देण्याच्या सोयी आहेत. त्याचबरोबर टिळक महाराष्ट्र विद्यापीठाद्वारे सांगलीत वृत्तपत्र अभ्यासक्रम सुरू आहेत. कृषी व्यवस्थापन, आय. टी. आय., एम. बी. ए., बी. बी. ए, ॲनिमेशन सारखे नवनवे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहेत. मराठी, उर्दू, कन्नड, गुजराथी भाषांतील शिक्षणही इथे दिले जाते. नाईट हायस्कूल कॉलेजही जिल्ह्यात आहेत. त्याच बरोबर कर्णबधीर, मुकबधीर, मतिमंद विद्यार्थ्यांच्या शाळाही या जिल्यात आहेत.

या जिल्ह्याच्या विकासात आणखी भर पडली ती म्हणजे 2006 साली राष्ट्रीय महामार्ग 30 किमी. राज्य मार्ग 931 किमी. जिल्हा मार्ग 2238 किमी. तर ग्रामीण रस्ते 3344 किमी. असल्याने संपर्काची साधने वाढली एस टी. मार्फत मोफत पास विद्यार्थिनींना मिळू लागल्याने व गावोगावी मागासवर्गीयांची वसतिगृहे सुरू झाल्याने जिल्ह्याच्या ठिकाणी शिक्षणासाठी येणा–यांचे प्रमाण कमी झाले. सन 1960 ला सांगली जिल्हा आस्तित्वास आला. सन 1962 ला सांगली जिल्हा परिषदेची स्थापना झाल्यानंतर ग्रामीण विकासास प्राधान्य देण्यात आले. सन 1963 ला सांगली आकाशवाणी केंद्राची स्थापना झाली. 1600 विद्यार्थी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत/शासकीय शासन सहाय्यता देणा–या व इतर 30 संस्थेत शिक्षण घेत आहेत. मा. वसंतदादा पाटील यांनी सहकाराचा मूलमंत्र जिल्ह्याला दिला. दूध उत्पादक, शेतकरी सहा. साखर कारखाने 17 आहेत. सुतगिरणी प्रथम आटपाडीतून सुरू झाली. पहिला दूध पावडर बनविण्याचा प्रकल्प, वीट उद्योग, वाईन पार्क, किर्लोस्करवाडीतील शेती अवजारांचा कारखाना ही जागतिक ओळख आहे. आजच्या घडीला जिल्ह्यातील द्राक्ष, डाळींब, फुले, आंतरराष्ट्रीय बाजारात जात आहेत. ग्रामीण विकासात घोंगडी, दोरखंड, मनुका, हातमाग व यंत्रमाग, कापड उद्योग, सिमेंट पाईप, विटा, विडया, पादत्राणे, तंतुवाद्ये हे पांरपारिक उद्योग टिकून आहेत. मराठी रियासतीचा झेंडा अटकेपार नेणारे परशुराम भाऊ पटवर्धन, बहिर्जी नाईक, प्रतापराव गुजर हे आपल्याच परिसरातील, कसबे डिग्रज येथील चव्हाणांच्या घराण्याचा इतिहास महत्वाचा आहे. मा. वसंतदादा पाटील, राजारामबापू पाटील, वि.स. पागे यांच्या नेतृत्वाने सांगली जिल्हयाचे नाव देशपातळीवर नेले आहे. वि. स. पागे यानी सुरू केलेली ''रोजगार हमी योजना'' आता देशपातळीवर राबविली जाते. याचा अर्थ सांगली जिल्ह्यात राबविलेले प्रकल्प देशात राबविले जातात हेच या जिल्ह्याचे कौतुक आहे. आज या जिल्ह्याने सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण पूर्ण केले.

इ. स. 1799 स्वतंत्र सांगली संस्थान अस्तित्वात आले. सन 1818 मध्ये पेशवाईचा –हास होऊन सा–या महाराष्ट्रात इंग्रजांनी आपला अंमल बसविला. संस्थानिकांनी इंग्रजांचे मांडलिकत्व स्विकारून इंग्रजांशी स्वतंत्र करार करून त्यांना आपल्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करू दिला. ही संस्थाने सन 1948 पर्यंत एतद्देशीय संस्थान म्हणून अस्तित्वात राहिली. सांगली संस्थानसुध्दा एक एतद्देशीय संस्थान म्हणून या काळात टिकून राहिले.

सांगली संस्थानामध्ये एकूण तीन संस्थानिक होऊन गेले हे सर्व प्रागतिक व पुरोगामी विचारांचे होते. यातील शेवटचे संस्थानिक चिंतामणराव पटवर्धन दुसरे यांना सांगलीचे 'भाग्यविधाता' म्हणतात. कारण मुंबई प्रांतातील एक 'प्रागतिक संस्थान' म्हणून नावलौकिक मिळवून देण्याचे कार्य दुसरे चिंतामणराव पटवर्धन यांनी केले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सरदार पटेल यांनी संस्थानिकांना राष्ट्रीय प्रवाहात सामील होण्याचे आवाहन केले. त्याला प्रतिसाद देऊन सन 1948 मध्ये मुंबई प्रांतात विलीन केले.

अशा प्रकारे पूर्वी सांगलीचा भाग मिरज प्रांतामध्ये समाविष्ट होता सांगली व आसपासच्या भागावर मौर्य, सातवहन, चालुक्य, राष्ट्रकूट, शिलाहार, यादव, बहामनी, आदिलशाही आणि पेशव्यांची सत्ता होती पटवर्धनाची सत्ता, इंग्रजांची सत्ता होती. अशा प्रकारे प्राचीन मध्ययुगीन आणि मराठेकालीन इतिहास आहे.

# संदर्भ साधने


1. वसंत आपटे, संकलक व लेखक – सांगली शिक्षण संस्था, सिटी हायस्कूल
   1914 ते 2014 इतिहास प्रकाशक – नितिन खाडिलकर, अध्यक्ष सांगली शिक्षण संस्था पृष्ठ क्र..19
2. डॉ. सौ. मेघना उद्‌गावकर सांगली संस्थानाचा राजकीय, सामाजिक आणि आर्थिक इतिहास 1880 ते 1948 पृष्ठ क्र.15
3. कित्ता पृष्ठ क्र.. 1/2 1914 पूर्व 20
4. कित्ता पृष्ठ क्र.. 20
5. डॉ. सौ. मेघना उदगावकर सांगली संस्थानाचा राजकीय, सामाजिक आणि आर्थिक इतिहास 1880 ते 1948 पृष्ठ क्र.15
6. कित्ता पृष्ठ क्र. 15, 16
7. कित्ता पृष्ठ क्र. 16, 17
8. सांगली नगरपरिषद शताब्दी महोत्सव स्मरणिका, सांगली 1876 पृष्ठ क्र..8
9. कित्ता पृष्ठ क्र. 9
10. वसंत आपटे, संकलक व लेखक सांगली शिक्षण संस्था सिटी हायस्कूल 1914 ते 2014 इतिहास, प्रकाशक नितिन खाडिलकर, अध्यक्ष सांगली शिक्षण संस्था सांगलीचे 'गावकुस' 1914 पूर्व, पृष्ठ क्र. 20, 21
11. एस. बी. देव महाराष्ट्रातील उत्खनने दिल्ली–1960 पृष्ठ क्र. 61
12. कित्ता पृष्ठ क्र. 61
13 डॉ. व्ही. व्ही. मिराशी, सातवाहन आणि पश्चिम क्षत्रप यांचा इतिहास व त्याचे कोरीव लेख मुंबई 1979, पृष्ठ क्र. 7, 8
14. सांगली डिस्ट्रिक्ट गॅझटियर महाराष्ट्र शासन, मुंबई 1962 पृष्ठ क्र. 37, 38
15. आर. सी. मुजुमदार व ए. एस. आळतेकर : वाकाटक गुप्तकाळ दिल्ली 1968 पृष्ठ क्र. 112
16. के. व्ही. रमेश, वातापीचे चालुक्य दिल्ली 1984 पृष्ठ क्र. 6 ते 11, 37, 303 ते 311, 322 ते 326
17. ए.एस. आळतेकर,राष्टकूट आणि त्यांचा काळ पुणे 1936 पृष्ठ क. 53 ते 62
18. वासुदेव विष्णू मिराशी, शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख नागपूर – 1974 पृष्ठ क्र. 6
19. कित्ता पृष्ठ क्र. 243 – 249
20. कित्ता पृष्ठ क्र.. 53, 243 ते 249
21. मु. ग. पानसे, यादव कालीन महाराष्ट्र पुणे 1963 पृष्ठ क्र. 29
22. ए. व्ही. मूर्ती – नरसिंह, सिऊनाज ऑफ देवगिरी म्हैसूर 1971 पृष्ठ क्र.. 73
23. एस. ए. क्यू हुसेन, बहामनी शहा कलकत्ता 1960 पृष्ठ क्र..125
24. अनंत रामचंद्र लागू : पेशवाईतील पहिले रावसाहेब गोपाळराव गोविंद पटवर्धन यांचे चरित्र सांगली 1937, पृष्ठ क्र.. 5
25. डॉ. सौ. मेघना उदगावकर, सांगली संस्थानाचा राजकीय, सामाजिक आणि आर्थिक इतिहास 1880 ते 1948, पृष्ठ क्र 9
26. कित्ता पृष्ठ क्र. 9
27. शंकर दत्तात्रय कुलकर्णी, सांगली संस्थानाचे सोपे भूवर्णन,आवृत्ती 2 री (सांगली 1925) पृष्ठ क्र. 4
28. विश्वनाथ अनंत पटवर्धन, दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानांच्या विलिनीकरणाची कथा (पूणे 1966) पृष्ठ क्र. 112
29. अनंत रामचंद्र लागू, उपरनिर्दिष्ठ पृष्ठ क्र.. 3 ते 5
30. य. न. केळकर, भा. ई. संशोधन मंडळ, पुणे, ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड 12 वा प्रस्तावना, 2 रे श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन यांची दिनचर्या पुणे 1967 पृष्ठ क्र. 2
31. द. बा. पारसनीस, द. सांगली स्टेट मुंबई 1917 पृष्ठ क्र. 1
32. द. बा. पारसनीस, उपरनिर्दीष्ट पृष्ठ क्र. 2

33. वसंत आपटे, संकलक व लेखक सांगली शिक्षण संस्था, सिटी हायस्कूल 1914 ते 2014 इतिहास प्रकाशक, नितिन  खाडिलकर, अध्यक्ष पृष्ठ क्र. .21
34. कित्ता पृष्ठ क्र.. 22, 23
35. द. बा. पारसनीस, उपरनिर्दिष्ट पृष्ठ क्र.. 4
36. अनंत रामचंद्र लागू, उपरनिर्दिष्ट पृष्ठ क्र. 5
37. य. न. केळकर, उपरनिर्दिष्ट पृष्ठ क्र. 4
38.गो. स. सरदेसाई, मराठी रियासत, खंड 3 रा पुण्यश्लोक शाहू, पेशवा बाळाजी बाजीराव, पेशवा बाजीराव (मुंबई 1989) पृष्ठ क्र. .463, 491
39. गो. स. सरदेसाई, मराठी रियासत, मध्य विभाग 2, पेशवा बाळाजी बाजीराव, मुंबई 1921 पृष्ठ क्र. 430
40. गो. स. सरदेसाई, मराठी रियासत, मध्य विभाग 4, मुंबई 1921 पृष्ठ क्र.. 430
41. व्ही. व्ही. खरे, हरिवंशाची बखर ऑथर पब्लिकेशन 1909 पृष्ठ क्र.. 4
42. गो. स. सरदेसाई, मराठी रियासत, मध्य विभाग 4, मुंबई 1925 पृष्ठ क्र.. 6
43. व्ही, व्ही, खरे, ऐतिहासिक लेखसंग्रह खंड 13 वा आप्पासाहेब सांगलीकरांचा वाका पुणे 1926 पृष्ठ क्र... 73, 74
44. डॉ. आप्पासाहेब पवार, ताराबाई कालीन कागदपत्रे, खंड तिसरा, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर 1972 पत्र क्र. 16, 28, 81, 123 पृष्ठ क्र.. 19, 20, 33, 36, 35, 95, 96, 157 ते 160
45. Captain Edward West, A memoir of the states of southern Maratha Country (Bombay-1869) AP Pendix.
46. द. बा. पारसनीस, उपरनिर्दिष्ट पृष्ठ क्र.. 7
47. द. बा. पारसनीस, उपरनिर्दिष्ट पृष्ठ क्र.. 7
48. कित्ता पृष्ठ क्र.. 10
49. स. अ. सहस्त्रबुध्दे सरदार परशुरामभाऊ पटवर्धन रत्नागिरी 1953 पृष्ठ क्र.. 425
50. पटवर्धन घराण्याचा मूळ पुरूष पृष्ठ क्र. 13
51. गो. ज. कुंटे, चिंतामणराव आप्पासाहेब यांचे चरित्र सांगली 1971 पृष्ठ क्र.. 13
52. कित्ता पृष्ठ क्र.. 15
53. कित्ता पृष्ठ क्र.. 17
54. द. बा. पारसनीस उपरनिर्दिष्ट पृष्ठ क्र.. 28
55. गो. ज. कुंटे, उपरनिर्दिष्ट पृष्ठ क्र.. 27
56. द. बा. पारसनीस, उपरनिर्दिष्ठ पृष्ठ क्र.. 34
57. वसंत आपटे, संकलक व लेखक सांगली शिक्षण संस्था, सिटी हायस्कूल 1914 ते 2014 इतिहास प्रकाशक, नितिन खाडिलकर, अध्यक्ष पृष्ठ क्र.. .23
58. सांगली कलेक्टर दप्तर 1853 चा कागद
59. गो. ज. कुंटे, उपरनिर्दिष्ट पृष्ठ क्र.. 144, 145
60. द. बा. पारसनीस, उपरनिर्दिष्ट पृष्ठ क्र.. 52
61. य. न. केळकर, ऐतिहासिक संकिर्ण साहित्य खंड 12 वा श्रीमंत चिंतामणरावाची दिनचर्या पुणे 1967 पृष्ठ क्र.. 4
62. विजय बक्षी यांचा ''दैनिक तरूण भारत'' या वर्तमान पत्रातील दि .21 नोंव्हेंबर 2016 मधील 'सांगली जिल्हयाचा प्राचीन व सांगली जिल्हा निर्मितीला 57 वर्ष पूर्ण'' झाल्याचा लेख पा.न.3

## 4.2 संस्थापक परिचय व त्यांचे कार्य

### 4.2.1 कै. धोंडोपंत विठ्ठल सखदेव

ज्यांच्या मनात अगदी पहिल्यांदा या शाळेच्या संकल्पनेचे विचार आले, आणि ज्यांच्या अथक परिश्रमातून सिटी स्कूलचे इवलेसे रोप कृष्णा काठच्या जुन्या सांगलीत उभे राहिले, ते सिटी हायस्कूलचे कै. धोंडोपंत सखदेव, सांगली सिटी हायस्कूलचे अग्रणी संस्थापकांपैकी एक प्रमुख संस्थापक होते. त्यांचा जन्म दि. 27/06/1892 साली सध्याच्या मिरज तालुक्यापैंकी मालगांव येथे झाला. मिरजेपासून सुमारे 6 ते 7 मैलावर हा गाव आहे. धोंडोपंत यांचे वडील विठ्ठलपंत हे मालगांवी राहात. सांगलीचे मोरभट्ट केळकर यांची कन्या दुर्गाबाई ही कै. धोंडोपंत यांची आई, विठ्ठलपंत व दुर्गाबाई यांना कृष्णाबाइ, धोंडोपंत व बाळुताई अशी तीन अपत्ये होती. धोंडोपंत हे 3–4 वर्षाचे असतानाच वडील वारले. घरची गरीबी असल्याने आई दुर्गाबाई ही पतीच्या मृत्युनंतर आपली लहान तीन मुले (दोन मुली व एक मधला मुलगा धोंडोपंत) यांना घेवून आपले वडील मोरभट्ट केळकर यांचे घरी सांगलीस माहेरी राहावयास आल्या.[1] धोंडोपंतांचे मामा कै. वासुनाना केळकर हे त्यावेळी सांगली संस्थानात खेडयात बोरगाव येथे प्राथमिक शिक्षक होते.

सांगलीस त्या काळात 1897–98 ते 1903–04 दरवर्षी प्लेगची फेरी असलेने धोंडोपंत हे आपले मामा केळकर मास्तर यांचेकडे राहिले व पहिल्या तीन इयत्तेपर्यंतचे शिक्षण मामांच्या हाताखालीच झाले. 4 थीचे शिक्षण सांगली येथे शाळा नं. 2 मध्ये व 5 वी 6 वी शाळा नं. 1 मध्ये पूर्ण झाले आणि सन 1906 च्या अखेरीस धोंडोपंत हे इंग्रजी पहिल्या इयत्तेत दाखल झाले. सन 1914 अखेर इंग्रजी शाळेचे वर्ष (व कॉलेजचेही) वर्ष नवंबर ते ऑक्टोंबर अखेर असे होते. 1915 पासून एप्रिल अखेर वर्ष सुरू झाले.[2]

याच सुमारास (1906–07) जुनी सांगलीत नंबर 2 मराठी शाळेच्यामागे कै. शंकरशास्त्री केळकर यांच्या घराच्या मागील भागात कै. रघुनाथ गोविंद आपटे यांनी एक तालीम सुरू केली होती. या तालमीत धोंडोपंत हे दाखल झाले व शाळेतील मित्र दामू केळकर, वामन लिमये, आण्णा लागू यांनाही तालमीत नेले. सदरची तालीम ही शारीरिक – शिक्षण – संस्था होती. देशभक्तीचे शिक्षण, नीति व संस्कृतीचे समर्थ रामदास, छत्रपती शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक या तीन तालमीच्या स्फुर्ती देवता होत्या. 1917 मध्ये या तालमीला "समर्थ व्यायाम शाळा" हे नाव दिले गेले.

1913 च्या नोव्हेंबर, डिसेंबर महिन्यात फायनलच्या परिक्षेत धोंडोपंत सखदेव नापास झाले. पुढे 1914 मध्ये फायनल परिक्षा पास झाले. घरच्या गरीबीमुळे कॉलेजचा अभ्यास झेपण्यासारखा नव्हता म्हणून मॅट्रिक ऐवजी त्यांनी स्कूल फायनलची परिक्षाच पत्करली होती. या काळामध्ये सखदेव, जोशी व तोरो जीवाभावाचे मित्र होते.

<u>संस्था स्थापनेचा विचार</u> :–

माळव्यात शेती करावयास जावे अशी कल्पना धोंडोपंत सखदेव यांच्या डोक्यात होती. पण तोरो, जोशी, दामू आण्णा केळकर, बा. चिं. लागू व इतर सहका–यांनी त्यांना या विचारापासून परावृत्त केले. हातमाग घालून विणकराचा धंदा करावा. अशी ही एक कल्पना धोंडोपंत सखदेव यांच्या डोक्यात होती. सरकारी नोकरी देशात व परदेशात कोणत्याही परिस्थितीत करावयाची नाही असा या मंडळीचा हेतू होता. हा काळ पहिल्या महायुद्धाचा होता. जहालांच्या विचारसरणीचा होता. आपणही देशासाठी काहीतरी करायला पाहिजे असे वाटत होते. राष्ट्रीय शिक्षण देणारी शाळा काढण्याचा निर्णय झाला व वडिलधारी मंडळी, मित्र बाळुमामा गोडबोले यांच्याशी बरेच दिवस चर्चा झाली व 4 डिसेंबर 1914 ला सिटी हायस्कूलचा जन्म झाला. पण पुढे लवकरच एक वर्षाने 31 डिसेंबर 1915 रोजी सखदेव हे प्लेगला बळी पडले व एका वर्षाच्या नव्या संस्थेवर मोठा आघात झाला. कै. धोंडोपंत सखदेव हे सुमारे

22/23 वर्षाचे असतानांच त्यांचा अंत झाला. त्यांच्या ठिकाणी अनेक गुण होते. पण त्या गुणांचा विकास होण्याची संधी त्यांना मिळाली नाही. निरपवाद, नितीमत्ता, दिर्घोद्योग, संघटना चातुर्य, लोक संग्रहबुध्दी आणि विशाल दृष्टी ही सर्व साधनसंपत्ती त्यांच्या बालपणी त्यांच्या ठिकाणी होती.

प्लेगच्या भीतीने गाव सोडून माणसे प्राणभयाने बाहेर राहावयास जात होती. पण शाळेकडे दुर्लक्ष होईल, त्या कामात थोडासा सुध्दा अडथळा येऊन चालणार नाही. 'देह जावो अथवा राहो' या निश्चयाने श्री. धोंडोपंत सखदेव सांगलीतच राहिले आणि प्लेगच्या क्रूर काळाने या ध्येयनिष्ठ व्यक्तीचा बळी घेतला.धोंडोपंत सखदेवाचे छायाचित्र त्यांच्या आयुष्यात एकदाच निघाले त्यांच्या अंत्यदर्शनाच्या वेळी !

## 4.2.2 पूज्य ब्रह्मीभूत गुरूनाथ गोविंद तोरो

पूज्य ब्रह्मीभूत गुरूनाथ गोविंद तोरो यांचा जन्म मिरज संस्थानात मोडलिंबला 5 फेब्रुवारी 1895 रोजी झाला. रायबाग महालापैकी मायाक्काची चिंचली या गावी सन 1894 च्या सुमारास झाला ते दहावर्षाचे होण्यापूर्वी त्यांचे आई–वडील दिवंगत झाल्याने त्यांचे आत्येभाऊ हरिपूरचे श्री हरिपंत अडके यांनी त्यांना हरिपूरला आणले. हरिपंताची आई श्री. तुळसाआक्का यांनी त्या पोरक्याचे पालनपोषण केले. श्री. गुरुनाथ तोरो हे आरंभी थोडे व्रात्य पण हुशार विद्यार्थी होते. वर्गातील (हुशार) बुध्दीमान मुलांत त्यांची गणना होती. वाढत्या वयाबरोबर वृत्ती चिंतनशील होत गेली.[3] हरिपूरच्या शाळेतील अभ्यास संपवून श्री. गुरुनाथ तोरो सांगली हायस्कूलमध्ये जाऊ लागले. हरिपूरच्या विद्यार्थ्यांच्यात दोन गट होते. एक सुखवस्तू विद्यार्थ्यांचा, दुसरा गरीब व चिंतनशील, दुस–या गटात श्री. तोरो होते. हरिपूरचे गुळवणी यांच्या वाडयात एक तालीम होती लक्ष्मण मिसाळ या गावठी पैलवानाने तालमीचे वस्ताद म्हणून काम बघितले होते. त्यांच्याकडून कुस्तीचे धडे घेतले. हरिपूरात पत्त्यावर पैसे लावून खेळण्याचे खूळ बरेच माजले होते. वडीलधारी मंडळी प्रत्यक्ष पैसे लावून खेळत असत. श्री. गुरुनाथ तोरो व त्यांचे मित्र कवी काव्यविहारी हे सुपा–या, कोरे कागदाचे चौकोर वगैरे लावून खेळत होते. पुढे विचाराअंती पत्त्यांचा जुगार खेळण्याचे बंद केले.

आपल्या खर्चाचा भार गरीब आत्येभावावर नको म्हणून श्री. गुरुनाथ तोरो हे हरिपूर सोडून सांगलीस रहावयास गेले. सुरूवातीस ते आयर्विन पुलाजवळील रामाच्या देवळात राहत असत. माधुकरी मागून उदरनिर्वाह करीत होते. तेथे गाडगीळ स्वामींच्या सहवासामुळे अध्यात्माची गोडी लागली. वेद, उपनिषदे त्याचप्रमाणे रामकृष्ण परमहंस स्वामी रामतीर्थ विवेकानंद, समर्थ रामदास, ज्ञानेश्वर, तुकाराम एकनाथ यांच्या वाङ्मयाचा अभ्यास सुरू झाला.[4] याच ठिकाणी सिटी हायस्कूलचे संस्थापक श्री. विनायकराव जोशी व श्री. चिकोडीकर यांची गाठ श्री. तोरो यांच्याबरोबर याच सुमारास पडली. श्री. तोरो यांची संसार विन्मुखता व विरक्त वृत्ती या सुमारास बरीच वाढली होती. कै. धोंडोपंत सखदेव यांच्याशीच श्री. गुरुनाथ तोरो यांची मैत्री होती. या चार संस्थापकांनी सिटी हायस्कूलची स्थापना सन 1914 ला केली. तेव्हा सिटी हायस्कूल 'लेले' यांच्या वाडयात भरत असे. 'श्री. समर्थ व्यायाम शाळेची' स्थापनाही श्री. गुरुनाथ तोरो व कै. धोंडोपंत सखदेव यांच्या प्रयत्नामुळेच झाली. त्याचबरोबर 1914 ते 22 ही 8 वर्षे सिटी हायस्कूल व पुढे 1920 साली काढलेले तासगांव हायस्कूल यांच्यासाठी या दोघांनी खूप धडपड केली होती. श्री तोरो यांचे मराठी, संस्कृत, गणित हे त्यांचे आवडते विषय होते.

1920 च्या सुमारास श्री. तोरो यांनी सिटी हायस्कूल संस्था सोडली व ते विरक्तवृत्तीने अध्यात्मचिंतनात वेळ घालवू लागले. सुरूवातीस ते माकडचौकीजवळील श्री. विष्णुचे देवळात राहात. पुढे ते अनाथ विद्यार्थीगृहात काही काळ रहात होते. त्यानंतर बरीच वर्षे त राजवैद्य आप्पासाहेब सांभारे याच्या वाड्यातील तिस–या मजल्यावर राहून परमार्थ चिंतनात वेळ घालवत असतानाच 1964 साली ते कालवश झाले.

### 4.2.3 श्री. रा. राजाराम रावजी चिकोडीकर

सिटी हायस्कूलच्या संस्थापकापैकी श्री. राजाराम चिकोडीकर हेच पहिले पदवीधर शिक्षक होत. श्री. राजाराम चिकोडीकर यांचा जन्म सांगलीस त्यांच्या आजोळी श्री. जळतकर यांचे घरी झाला. प्राथमिक शिक्षण कोल्हापूरात झाल्यावर इंग्रजी शिक्षणाकरता पुनः सांगलीस आले तेथेच 1909 साली सांगली हायस्कूलमधून मॅट्रिक झाल्यावर गरिबीमुळे कॉलेजात जाता आले नाही. म्हणून त्यांनी दरमहा 10 रू. वर सांगली स्टेट प्रेसमध्ये नोकरी धरली.[5] त्यांच्या अंगी उच्च शिक्षणाची तळमळ होती. त्यांचे स्नेही श्री. बळवंत गोडबोले यांचाही सल्ला होता की, त्यांनी कॉलेज शिक्षण घ्यावे. त्यांच्याच मदतीने श्री. राजाराम चिकोडीकर यांनी कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्ये नाव घातले. सरकारी नोकरी करावयाचे नाही असा मनोमन संकल्प त्यांनी केला.

राजाराम कॉलेजमध्ये जाऊन वर्ष होण्यापूर्वीच सर्व मित्रांना एकत्र राहता यावे या कल्पनेने श्री. गोडबोले व राजाराम चिकोडीकर हे सिटी हायस्कूल स्थापणा–या कै. धोंडोपंत सखदेव श्री. विनायकराव जोशी व श्री. तोरो यांना येऊन मिळाले. श्री. चिकोडीकर यांचेवरच प्राधान्याने शिक्षणाचा भार पडला होता. 1915 साली ते प्रिव्हीयस परिक्षा पास झाले. 1920 साली इंटर व 1923 ला ते बी. ए. झाले. परिस्थितीशी झगडण्यात त्यांचा बराच वेळ गेल्यामुळे बी. ए. पर्यंतचे शिक्षण पूरे करण्यास त्यांना आठ नऊ वर्षे लागली.

**शैक्षणिक कार्य :**

आपल्या विद्यार्थ्यांची सर्वांगीण उन्नती व्हावी म्हणून पहिल्यापासून ते प्रयत्न करत होते. मुलांची स्वाभाविक गुणांची पारख करून त्यानुसार कोणाला संगीत, कोणाला तालीम, कोणास चित्रकला, हस्त व्यवसाय इ. उपक्रम शाळेत सुरू केले. सुप्रसिद्ध गवई रेडिओस्टार श्री. जे. एल. रानडे हे त्यांच्या पट्टशिष्यापैकी एक होते. मराठी शिकवण्यात त्यांचा हातखंडा होता. विद्यार्थी आजारी पडला तर त्यांच्या घरी जाऊन जरूर ती मदत करीत होते. त्यामुळे विद्यार्थी वर्गात ते अतिशय प्रिय होते. ते बरीशीच कामे स्वतः करायचे हे पुढील उदाहरणावरून लक्षात यईल. हार्डवेअरचे व्यापारी श्री. बंडोपंत दांडेकरांनी शाळेतील बाके–डेस्के करण्यासाठी लोंखडी ॲंगल्स श्री. चिकोडीकरांना दिले होते. ते अवजड सामान वाहून नेण्यासाठी बैलगाडी आणून त्याच्यात भरले व स्वतः बैलगाडी ओढत ते अवजड ओझे शाळेपर्यंत वाहून आणले.[6] विद्यार्थ्यांची सर्वांगीण उन्नती व्हावी म्हणून ते सतत प्रयत्नशील असत ते विद्यार्थी वर्गात अतिशय प्रिय होते. हीरक–महोत्सवी 4–5 महिन्यावर आलेला असताना 1974 च्या जुलैमध्ये त्यांच्या वयाच्या 85 व्या वर्षी मृत्यूने झडप घातली.

### 4.2.4 कै. श्री. विनायकराव सदाशिव जोशी

विनायक सदाशिव जोशी यांचा जन्म 05 फेब्रुवारी 1890 मध्ये झाला. विनायकराव हे अत्यंत कृश, ठेंगु, काळवंडलेल्या सुरकुतलेल्या व दंतपंक्तीच्या अभावी असहा्‌य व दिनवाण्या दिसणा–या चेह–याची एक व्यक्ती, मोठया उमेदीने छोटयाश्या मोफत दवाखान्याचे रेकॉर्ड काढून दररोज मुलांना किती ट्रिटमेंट मिळते. वर्षातून किती विद्यार्थी व शिक्षक, कारकुन, नोकर येतात व या दवाखान्याचा फायदा होतो. याची आकडेवारी लिहून ठेवलेली असे. सिटी हायस्कूलच्या संस्थापकांपैकी श्री. विनायकराव जोशी हेच मोफत औषधालय चालवणारे धन्वंतरी होय. सिटी हायस्कूलच्या स्थापनेपासून 1939 सालापर्यंत पडेल ते काम करीत, मिळेल ते वेतन घेत व सिटी हायस्कूलसाठी पैसा जमवित त्यांनी आपला देह ठेवला.[7]

<u>सिटी हायस्कूलचा दवाखाना</u> :–

श्री. विनायकरावांनी दवाखान्यातील टापटीप व शिस्त एखाद्या मोठया हॉस्पिटलसारखी ठेवली होती. सिटी हायस्कूलच्या स्थापनेच्या वेळी पडेल ते काम करून व मिळेल तो अत्यंत पगार घेऊन संस्थेचा पाया घालण्यास सहाय्य केले. प्रथमावस्थेतून शाळा बाहेर आल्यावर इमारतीसाठी जागा व पैसे मिळविणे ही मोठी जबाबदारी पार पाडली. निधीसंकलनाचे काम अत्यंत निष्ठेने व हौसेने पार पाडले आहे. यासाठी नागपूरपासून ते बेंगलोरपर्यंतचा प्रवास अत्यंत हालाखीच्या परिस्थितीत त्यांनी केला आहे. सिटी हायस्कूलच्या स्थापनेपासून 1939 पर्यंत हे काम केले होते. 'बिल्डींग फंड कमिटीचे सेक्रेटरी' या नात्याने 1919 ते 1926 पर्यंत प्रत्यक्ष निधी संकलनाचे कार्य त्यांनी केले.
विनायकराव जोशी यांचे व्यक्तिमत्व अगदीच वेगळे होते. यांना वैद्यकीचा व्यासंग होता. त्यांची नाडीपरिक्षा उत्तम होती. सांगलीचे नामांकित वैद्य आबासाहेब सांभारे यांनीही विनायकरावाच्या नाडी परिक्षेबद्दल गौरवाचे उदगार काढले आहेत. सामाजिक कार्यातही सहभाग दिसतो. सांगलीपासून तीन किमी. अंतरावर बागेतील गणपती आहे. तेथे पाण्याची सोय उपलब्ध करून दिली आहे. ब्रिटीशांनी लोकमान्य टिळकांना बंदिवासात टाकले. तेव्हा पुण्यामध्ये 'टिळक फंड' गोळा करण्यात येऊ लागला. त्यासाठी काम करणा–यांना ब्रिटीश सरकारने अटक केली. त्यात विनायकराव कोठडीत गेले होते.

संस्थेने त्यांच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी त्यांना मानधन म्हणून 25 रू. देण्यास सुरूवात केली होती. संस्था विस्ताराची व भोजनाचीही व्यवस्था करावी असे त्यांचे स्वप्न होते. मुख्यमंत्री बाळासाहेब खरे यांची विनायकरावानी काहीवेळ भेट घेतली होती. सांगलीला आयुर्वेदिक कॉलेज काढण्याची परवानगी देणारे पत्र त्यांनी मिळविले होते आणि कच्चा आराखडा कागदावर तयार केला होता.

पोटदुखीच्या व्याधीने ते ग्रस्त झाले असताना भर दुपारी एका धनिक व्यक्तिला देणगीसाठी भेटायला ते स्टेशनवर गेले होते. काम झाले नाही त्यामुळे अशक्तपणाने विनायकराव निराश होऊन रेल्वे स्टेशनवर एका बाकावर बसले होते. त्यांच्या मुलाने त्यांना तसे पाहिले आणि त्यांना टांग्यात घालून घरी नेण्याची व्यवस्था केली. वयाच्या सतराव्या वर्षी इ. स. 1953 साली ते कालवश झाले. त्यांच्या पश्चात विधवा पत्नीला आजीवन दरमहा 20 रूपये घरपोच देण्याची व्यवस्था संस्थेने केली होती.[8]
संस्था चालवण्याच्या वाटचालीत संस्थापकांचे, मुख्याध्यापकांचे व शिक्षकेतर कर्मचा–यांचे योगदान आपल्याला दिसते.

### 4.2.5 आजीव सभासद

### गुरूवर्य श्री. गो. तथा बळवंतरावजी गोडबोले बी. ए. एलएल. बी.

सिटी हायस्कूलच्या उभारणीत संस्थापकांना सर्व प्रकारचे साहाय्य केले. 'समर्थ व्यायाम शाळे'चे आधारस्तंभ संस्थेचे आजीव सदस्य म्हणून सुरूवातीच्या काळात विविध जबाबदा–या पार पाडल्या. राष्ट्रीय वृत्तीचे धडाडीचे कार्यकर्ते. सन 1920 मध्ये सिटी हायस्कूलचे मुख्याध्यापक असताना लो. टिळकांची शाळेस भेट घडवून आणली.[9] शाळेच्या इतिहासातील ते सोनेरी पान होय. तासगाव व सिटी हायस्कूलचे मुख्याध्यापक म्हणून त्यांनी काम केले. ते 1924 मध्ये सेवामुक्त झाले. त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला होता.

### गुरूवर्य द. पु. ताम्हनकर बी. ए. बी. टी.

आजीव सदस्य व सिटी हायस्कूलचे कर्तबगार मुख्याध्यापक, नैसर्गिक, रूबाबदार शरीरयष्टी, दुस–यावर छाप पाडणारे अष्टपैलू व्यक्तिमत्व, परिणामकारी वक्तृत्व, अभ्यासू वृत्ती, खेळातील नैपुण्य, इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व, त्यामुळे केवळ शाळेत व सांगलीतच नव्हे तर सांगलीबाहेरही कर्तबगार मुख्याध्यापक व कुशल अध्यापक म्हणून कीर्ति

मिळविली. करडी शिस्त, शिक्षक व विद्यार्थी दोघांवरही वचक. 'सिटी हायस्कूल म्हणजे ताम्हनकर' असे समीकरण झाले होते. संस्कृत, भूगोल, गणित याही विषयांचा सखोल अभ्यास होता. संस्थेत त्यांनी विविध मंडळांवर जबाबदारीने कामे केली होती.[10] सिटी हायस्कूलच्या सर्वांगीण विकासात फार मोठा वाटा आहे. संस्थेतून 1940 मध्ये निवृत्त झाल्यावर मुख्याध्यापक म्हणून बुधगांव, इस्लामपूर येथील हायस्कूलमध्ये काम केले. वयाच्या 81 व्या वर्षी त्यांच्यातील शिक्षक जागा होता. इंग्रजी, संस्कृत यातील शंका शाळा, कॉलेजमधील विद्यार्थ्यांना सांगण्यात रमून जात. संस्थेच्या शाळांशी जिव्हाळयाचे संबंध होते. ईश्वर चिंतनात लक्ष घालीत.

## कै. अ. गो. तथा बाबासाहेब करंदीकर बी. ए.

बी. ए. पदवी घेऊन 1920 मध्ये सिटी हायस्कूलमध्ये शिक्षक होते. आजीव सदस्य होते. संस्थेच्या विविध मंडळांवर पदाधिकारी म्हणून काम केले. व्यायामाची आवड, कष्टाळू वृत्ती, शिस्तप्रियता, साधी राहणी, स्वदेशीचा अभिमान व निर्व्यसनी जीवन यामुळे विद्यार्थ्यांत बाबासाहेबांच्या संबंधी आदर असे. सिटी हायस्कूलचा विद्यार्थी केवळ हुशारच नव्हे तर चारित्र्यसंपन्न असला पाहिजे अशी त्यांची दृष्टी होती. भूगोल व इतिहास हे त्यांचे आवडते विषय, प्रसंगी कठोर वाटणारे करंदीकर मनाने प्रेमळ होते. 1935 नंतर सिटी हायस्कूलचे मुख्याध्यापक झाले. डॉ. बापट बाल शिक्षण मंदिराच्या उभारणीत त्यांचा महत्वाचा वाटा आहे[11] सिटी हायस्कूलच्या इमारतीची पूर्व बाजू त्यांच्या कारकीर्दीत बांधून झाली. वयाच्या 83 व्या वर्षी 17 जानेवारी 1974 रोजी त्यांचे निधन झाले.

## कै. सीताराम बाळाजी वाकणकर बी. ए. बी. टी.

सांगली शिक्षण संस्थेच्या माजी आजीव सेवकांमध्ये कै. सीताराम बाळाजी तथा बापूसाहेब वाकणकर यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. इंग्लिश, गणित व संस्कृत या तीनही विषयात प्राविण्य असलेले ते एक कुशल कष्टाळू अध्यापक व समर्थ प्रशासक म्हणून प्रसिध्द होते. संस्थेच्या तासगांव हायस्कूलची जडण घडण त्यांनी परिश्रमपूर्वक केली. सन 1941 च्या 31 मे रोजी आपल्या अन्य चार सहका–यांसह ते संस्थेतून निवृत्त झाले. कुशल प्रशासन, यशस्वी अध्यापन व खंबीर तत्त्वनिष्ठा या गुणांमुळे बापूसाहेब ''मोडेन पण वाकणार नाही.''
या वृत्तीने संस्थेत राहिले.[12]

## मा. श्री. ग. श्री. वैद्य –

संस्थेचे एक कर्तबगार आजीव सदस्य व नामवंत शास्त्रशिक्षक ! हे 1942 मध्ये सेवामुक्त झाले. सिटी हायस्कूलच्या लौकिकात त्यांचा मोठा वाटा आहे. डॉ. बापटबाल शिक्षण मंदिराची उभारणी करण्यात त्यांनी महत्वाची कामगिरी केली.[13] श्री. वैद्य, श्री. कंपली, श्री. फाळके, श्री. बाबासाहेब करंदीकर यांनी उभे केलेले हे कार्य अतिशय मोलाचे आहे.

## कै. बापूरावजी केळकर –

सिटी हायस्कूलच्या संस्थापकांना शाळेच्या स्थापनेपासून यांचे सहकार्य लाभले होते. सुरूवातीचा काही काळ यांनी शाळेत अध्यापनाचे काम विनामूल्य केले. त्यानंतर नितीशिक्षक म्हणून त्यांची रितसर नेमणूक झाली. शास्त्र, चित्रकला व वक्तृत्व हे विषय चांगले शिकवीत. सुरूवातीपासूनच त्यांचा अध्यात्माकडे ओढा होता. सत्पुरूषांच्या जीवन कार्याचे सतत चिंतन हा ध्यास असल्यामुळे त्यांच्या शिकवण्यात सुध्दा हे आध्यात्मिक संस्कार विद्यार्थ्यांवर उत्तम

प्रकारे होत असत. गुरूवर्य ब्र. तोरो आणि कै. बापूरावजी केळकर यांच्या शाळेतील अस्तित्वामुळे सिटी हायस्कूलला लोक पारमार्थिकांची शाळा म्हणून ओळखत असत.[14] उत्तरायुष्यात एक साक्षात्कारी संत म्हणून लोकांच्या आदरास हे पात्र झाले.

### श्री. रा. म. जोगळेकर –

सिटी हायस्कूलमध्ये आपल्या क्रीडानैपुण्यामुळे गुरुवर्य जोगळेकरसरांनी आपल्या कालखंडात क्रीडाक्षेत्रात अक्षरशः जोगळेकर–युग घडविले. शाळेच्या मैदानावर सकाळ–संध्याकाळ त्यांच्या भोवती सतत विद्यार्थ्यांचा गराडा असे. प्रत्येक खेळात व व्यायामप्रकारात ते स्वतः भाग घेत आणि आपल्या कौशल्याच्या दर्शनातून ते विद्यार्थ्यांना शिकवीत.

त्यांच्या हाताखाली सिटी हायस्कूलमध्ये अनेक नामवंत खेळाडू तयार झाले. मुलांचे व मुलींचे क्रीडासंघ गाजले. त्यांच्या बजरंग मंडळाच्या माध्यमातून सिटी हायस्कूलच्या खेळाडूंनी हुतूतू च्या क्षेत्रात इतिहास घडविला. खेळांची आवड निर्माण करून तरूण पिढीवर त्यांनी व्यायामाचे संस्कार रूजविले.[15]

### कै. गुंडो दासो. आण्णा कंपली एम. ए. बी. टी.

यांनी सिटी हायस्कूलमध्ये अनेक वर्षे काम केल्यावर विटे, तासगांव, किर्लोस्करवाडी येथील शाळात मुख्याध्यापक म्हणून काम केले. इंग्रजी, संस्कृत, गणित, मराठी या विषयांचे ते तज्ञ शिक्षक होते. हिंदीचा विशेष अभ्यास करून हिंदीच्या प्रसारासाठी व प्रचारासाठी त्यांनी मोठे कार्य केले.[16] जिल्ह्यात हिंदी शिक्षण केंद्रे सुरू करण्यात त्यांचा भाग होता. विटे येथील महात्मा गांधी विद्यामंदिरात त्यांनी जास्त लक्ष घातले होते. अनेक गरीब विद्यार्थ्यांना सहाय्य केले. डॉ. बापट बालशिक्षण मंदिर उभे करण्यात यांचा सहभाग होता. सन 1955 मध्ये ते निवृत्त झाले. निवृत्तीनंतर पुण्यातील राष्ट्रभाषा सभेत ते पदाधिकारी म्हणून काम करीत होते. सन 1961 मध्ये त्यांचे निधन झाले.

### कै. गो. ग. मराठे बी. ए. बी. टी.

हे सिटी हायस्कूलचे माजी विद्यार्थी. नामवंत गणित शिक्षक म्हणून त्यांनी नावलौकिक मिळवला. त्रितपोमहोत्सवाच्या वेळी ते सिटी हायस्कूलचे मुख्याध्यापक होते.[17] सिटी हायस्कूलच्या नावलौकिकात त्यांचा मोठा वाटा आहे. विटे व किर्लोस्करवाडी येथे त्यांनी कार्य केले. मे 1958 मध्ये त्यांचे दुःखद निधन झाले.

### कै. वि. गो. पाटील बी. ए. (ऑनर्स) बी. टी.

हे सिटी हायस्कूलचे माजी विद्यार्थी. मराठी, संस्कृत, इंग्रजी हे त्यांच्या आवडीचे विषय होते. श्री. पाटील हे विद्यार्थीप्रिय, प्रेमळ, हळव्या मनाचे शिक्षक होते. त्यांना लेखन, संगीत, वाचन यांची विशेष आवड होती. सांगली, तासगांव, किर्लोस्करवाडी, विटे, बुधगाव येथील शाळांत त्यांनी पडतील त्या जबाबदा–या स्वीकारल्या होत्या.[18] 1959 साली निवृत्त झाल्यावर 3 जुलै 1961 रोजी त्यांचे दुःखद निधन झाले.

## श्री. गो. आ. करंदीकर एम. ए. बी. टी.

यांनी सांगली, तासगांव, माधवनगर, किर्लोस्करवाडी, बुधगाव, मिरज येथील शाळांत मुख्याध्यापक म्हणून काम केले होते. इंग्रजी, मराठी, भूगोल या विषयांचे ते कुशल शिक्षक होते. अध्ययन, अध्यापन, नवीन शैक्षणिक प्रयोग, वाचन, चिंतन यांत त्यांना विशेष गोडी होती. 'गोपाळकाका' म्हणून विद्यार्थी त्यांना ओळखत.[19] निर्व्यसनी, व्यासंगी, प्रेमळ, कर्तव्यदक्ष शिक्षकाचे एक उत्तम उदाहरण म्हणून 'गोपाळकाका' विद्यार्थ्यांना माहीत होते. बुधगाव हायस्कूलचे मुख्याध्यापक म्हणून मे 1963 मध्ये ते निवृत्त झाले तरीही शैक्षणिक कार्यात आजही त्यांचे लक्ष होते.

## कै. के. जि. दिक्षीत बी. ए. (ऑनर्स) बी. टी.

संस्थेचे व सिटी हायस्कूलचे नाव सा–या महाराष्ट्रात पसरविण्याचे अद्वितीय काम यांनी केले. 'जगन्नाथ शंकर शेठ संस्कृत शिष्यवृत्ती' मिळविण्याचा अखंड विक्रम करणारे त्यांचे विद्यार्थी त्यांनी विनामूल्य शिकवून तयार केले होते.[20] संस्थेसाठी मोठ्या देणग्या जमविल्या. राजवाडा शाखा हि. हा. रा. चिं. पटवर्धन हायस्कूल सुरू करण्यात त्यांचा पुढाकार होता. डॉ. बापट बाल शिक्षण मंदिर उभारणीमध्ये सहाय्य केले. पटवर्धन हायस्कूलचे मुख्याध्यापक, कौन्सिलचे सेक्रेटरी म्हणूनही त्यांनी लक्ष घातले होते. संस्थेस प्रतिष्ठा मिळवून दिली. 1966 साली पटवर्धन हायस्कूलचे मुख्याध्यापक म्हणून ते निवृत्त झाले, दि. 22 मे 1971 रोजी अचानक त्यांचे दुःखद निधन झाले.

## कै. के. रा. जोशी बी. ए. बी. टी.

यांनी संस्थेच्या जवळ जवळ सर्व शाळात मुख्याध्यापक म्हणून काम केले. गरज भासेल तेथे जाण्यास तयार असलेले, सर्वांना बरोबर घेऊन काम करणारे मनमिळाऊ कर्तव्यदक्ष शिक्षक व मुख्याध्यापक म्हणून सांगली, माधवनगर, तासगाव, विटे, बुधगाव, किर्लोस्करवाडी येथील शाळांत काम केले. तासगाव हायस्कूलच्या इमारतीची जबाबदारी खंबीरपणे पार पाडली. ते इंग्रजी, मराठी, संस्कृत, गणित विषयांचे चांगले शिक्षक होते. मे 1968 मध्ये हायस्कूलचे मुख्याध्यापक म्हणून निवृत्त झाले. इ. स. 1985 मध्ये त्यांचे दुःखद निधन झाले.

## कै. गो. ब. बिनीवाले बी. एस. सी. बी. टी.

यांनी गणित, शास्त्र, भूगोल विषयाचे शिक्षक म्हणून नावलौकिक मिळविला. तासगाव, किर्लोस्करवाडी येथे मुख्याध्यापक म्हणून काम केले. सिटी हायस्कूल व पटवर्धन हायस्कूलमध्येही अनेक वर्षे काम केले. हि. हा. रा. चिं. पटवर्धन हायस्कूलच्या इमारतीसाठी देणग्या जमविण्यात पुढाकार घेतला. ते 1965 मध्ये निवृत्त झाले. निवृत्तीनंतरही त्यांनी म. के. आठवले विनय मंदिर, पुरोहित कन्या प्रशाळा, शिवाजीनगर हायस्कूलसाठी व सिटी हायस्कूलसाठीही आर्थिक मदत मिळविण्यासाठी उत्साहाने यशस्वी प्रयत्न केले. इ. स. 1982 साली त्यांचे निधन झाले.

## कै. ना. ग. फाळके बी. ए. बी. टी.

यांनी तासगांव, विटे, सांगली, मिरज येथे मुख्याध्यापक म्हणून उत्साहाने कार्य केले. इंग्रजी, इतिहास, संस्कृत या विषयांचे ते नावाजलेले शिक्षक होते. मिरज हायस्कूलमध्ये विशेष कार्य केले. डॉ. बापट बाल शिक्षण मंदिराच्या उभारणीत महत्त्वाचा भाग घेतला. त्यांना चर्चासत्रे, शिबीर, सूतकताई, विणकाम यांची विशेष आवड होती, त्यांच्या लोकसंग्रहवृत्तीचा शाळेस उपयोग होत असे.[21] सिटी हायस्कूलचे मुख्याध्यापक म्हणून 1965 मध्ये ते निवृत्त झाले. दिनांक 19 डिसेबर 1988 रोजी त्यांचे निधन झाले.

## स्व. दा. धों. तथा दामूआण्णा केळकर –

सिटी हायस्कूलच्या सुरूवातीच्या काळात शिक्षक रूजू झाले. अत्यंत ध्येयवादाने आणि निष्ठेने अध्यापन कार्य केले. अक्षरशः मुलांत मूल होऊन अगदी हरीजन वस्तीतल्या मुलांशीही गुरूवर्य दामुआण्णा रमून जात. व्यायामाची आणि विद्याव्यासंगाची अंतः करणापासून आवड होती. शास्त्र, गणित, इंग्रजी पासून अगदी तालमीपर्यंत कोणताही विषय कोणत्याही वर्गाला गुरूवर्य दामूआण्णा अगदी सहजतेने शिकवू शकत असत. शाळेसाठी जे अंगावर पडेल ते काम त्यांनी निष्ठापूर्वक केले

## श्री. कृ. गं. मराठे बी. ए. (ऑनर्स) बी. टी.

सिटी हायस्कूलचे माजी विद्यार्थी, मराठी, गणित, अर्धमागधी विषयांचे नामवंत शिक्षक होते. तासगांव, किर्लोस्करवाडी, बुधगाव येथील शाळांत मुख्याध्यापक म्हणून काम केले. नाट्य, खेळ, वक्तृत्व यांची विशेष आवड होती. राजवाडा शाखेच्या पूर्वतयारीत त्यांचा सहभाग होता. संस्थेच्या व सिटी हायस्कूलच्या कार्यालयीन कामास योग्य स्वरूप देण्याचे महत्वाचे काम त्यांनी केले. 1962 साली तासगांव हायस्कूलचे मुख्याध्यापक असताना सेवामुक्त होऊन ते डोंबिवलीस मुख्याध्यापक म्हणून गेले.

## कै. ना. चिं. ताम्हनकर बी. ए. बी. टी.

हे सिटी हायस्कूलचे माजी विद्यार्थी 'बजरंग मंडळा'चे खेडाळू होते. गणित विषयाचे नामवंत शिक्षक होते. नाट्य, संगीत, खेळ यांची त्यांना आवड होती. बुधगाव, माधवनगर, सांगली येथे मुख्याध्यापक म्हणून काम केले. सिटी हायस्कूलचे मुख्याध्यापक असताना रंगमंचाचे व दक्षिण बाजूकडील दुमजल्याचे काम पूर्ण केले. सिटी हायस्कूलचे मुख्याध्यापक असताना 1965 जूनमध्ये सेवामुक्त झाले. इ. स. 1987 च्या सप्टेंबर महिन्यात त्यांचे दुःखद निधन झाले.

## कै. नी. वि. परचुरे बी. ए. बी. टी. डी. पी. एड्.

हे सिटी हायस्कूलचे माजी विद्यार्थी. मराठी, इतिहास, शारीरिक शिक्षण या विषयाचे कुशल शिक्षक होते. सांगली, तासगांव, किर्लोस्करवाडी येथे काम केले. बुधगाव हायस्कूलचे मुख्याध्यापक म्हणून काम पाहिले. 1962 मध्ये सेवामुक्त झाले. जून 1971 मध्ये त्यांचे अकाली निधन झाले.

## कै. भा. द. सहस्त्रबुध्दे एम. ए. बी. टी. डी. पी. एड्.–

हे सिटी हायस्कूलचे माजी विद्यार्थी. सांगली, विटे, किर्लोस्करवाडी, मिरज येथे त्यांनी मुख्याध्यापक म्हणून उत्साहाने कार्य केले. मराठी व इंग्रजीचे ते शिक्षक होते. लेखन, वाचन, नाट्य, संगीत यांची त्यांना विशेष आवड होती. राजवाडा शाखा काढण्याच्या पूर्वतयारीत त्यांचा सहभाग होता. डिसेंबर 1969 मध्ये ते निवृत्त झाले. दिनांक 23 मे 1986 राजी त्यांचे दुःखद निधन झाले.

## प्रा. श्री. ना. वा. भावे –

सिटी हायस्कूलचे माजी विद्यार्थी व सिटी हायस्कूलचे आणि सांगली शिक्षण संस्थेचे सेवाभावी कार्यकर्ते. उत्कृष्ट विचारवंत, वक्ते व लेखक. टापटीप, नीटनेटकेपणा व लोकसंग्रह ही त्यांच्या कार्यपध्दतीची वैशिष्ट्ये होती.

इंग्रजी विषयाच्या कौशल्यपूर्ण अध्यापनावर त्यांचे प्रभुत्व होते. महात्मा गांधी विद्यामंदिर विटे येथे प्रदिर्घ काळ यशस्वी मुख्याध्यापक म्हणून वावरले व पुढे सांगली शिक्षण संस्थेच्या 'कॉलेज ऑफ एज्युकेशन'चे नामवंत प्राचार्य म्हणून त्यांनी नावलौकिक संपादन केला होता. कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या उभारणीत त्यांनी खूप परिश्रम घेतले आहेत. सिटी हायस्कूलच्या हीरक महोत्सवाच्या स्मरणिकेचे यशस्वी संपादन त्यांनी केले.

### प्रा. श्री. क. श्री. काळे –

सांगली शिक्षण संस्थेच्या तासगांव हायस्कूलचे नामवंत माजी विद्यार्थी व शिक्षक सांगली शिक्षण संस्थेचे आजीव सदस्य. तासगांव व मिरज येथील शाळांचे मुख्याध्यापक म्हणून मोलाची कामगिरी केली. सिटी हायस्कूलमध्ये व इतरत्रही ते मराठी विषयाच्या प्रभावी अध्यापनासाठी विद्यार्थ्यांमध्ये प्रिय होते. कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या उभारणीत त्यांचा महत्वाचा सहभाग होता.[22] मराठी साहित्य परिषदेच्या चळवळीत भाग घेऊन विद्यार्थ्यांपर्यंत त्या परिषदेच्या वाङ्मयाची गोडी त्यांनी निर्माण केली.

### कै. अनंतराव म्हैसकर –

सिटी हायस्कूलचे पहिले हिशेबनीस. शाळेच्या 'पै न पै'चा चोख हिशेब श्री. अनंतरावांनी आपल्या कार्य काळात अतिशय दक्षतेने ठेवला व सर्वांचा विश्वास संपादन केला. शाळेच्या अधिका–यांपासून ते शिक्षक, सेवक, पालकांपर्यंत त्यानी सदैव हसतमुख राहून कामे करून चांगले संबंध निर्माण केले. सिटी हायस्कूलच्या कामाशी ते इतके एकरूप झाले होते की, सिटी हायस्कूल संबंधी कोणतीही लहान मोठी माहिती केव्हाही विचारले तरी ते सांगत. त्यांना जितेजागते सिटी हायस्कूलचे कोष म्हणावे लागेल.

### कै. पां. वि. रास्ते –

सिटी हायस्कूलचे सुरूवातीपासूनचे आत्मीयतेने शाळेशी आणि विद्यार्थ्यांशी समरस असलेले शिक्षक. शाळेच्या विद्यार्थ्यांच्या क्रीडानैपुण्याच्या यशपरंपरेला कै. रास्ते सरांनी शुभारंभ करून दिला. सर स्वतः पोहण्यात अत्यंत तरबेज होते आणि अनेक विद्यार्थ्यांना त्यांनी पोहण्यात तरबेज केले. शिक्षक असे पर्यंत त्यांनी विद्यार्थी भांडार चोख सांभाळले. विद्यार्थ्यांच्या स्मरणात रेंगाळणारी छाप कै. रास्तेसरांनी आपल्या शिकविण्याने सतत ठेवली. जुन्या पिढीचे विख्यात कुस्तीगार पै. हरी नाना पवार हे शालेय जीवनात कै. रास्तेसरांच्या मार्गदर्शनाखाली घडले.

### श्री. शं. गो. आपटे –

सिटी हायस्कूलचे माजी विद्यार्थी व पुढे सिटी हायस्कूलमध्येच अध्यापन केलेले चांगले शिक्षक. संस्कृत, अर्धमागधी, मराठी आणि इंग्रजी या विषयातील अत्यंत निष्णांत शिक्षक. व्यायामाची मनापासून आवड आणि विविध खेळातही पारंगत. गुरूवर्यांबद्दल असीम आदर, शिस्तप्रियता, पोशाखापासून सगळया गोष्टींत नेटकेपणा हे गुरूवर्य आपटेसरांचे विशेष गुण होते. अत्यंत कमी बोलणे आणि 'रिकामा जाऊ नेदी एक क्षण' या सूत्रानुसार आयुष्य व्यतीत केले आहे. त्यांची तडफ तरूणाला लाजवेल अशी होती. सिटी हायस्कूलच्या त्रितपोमहोत्सवापासून माजी विद्यार्थी–शिक्षक नाट्य संघाच्या नाटकातून अभिनयाचा आविष्कार घडविला.

### कै. शि. वि. नातू –

गुरूवर्य जोगळेकरांच्या हाताखाली तयार झालेले सिटी हायस्कूलचे ख्यातनाम क्रीडानिपुण माजी विद्यार्थी व सिटी हायस्कूलचे निष्ठावंत व नामवंत क्रीडाशिक्षक. विविध मैदानी खेळामध्ये सदैव रंगून जात असत हुतूतू, लंगडी, मल्लखांब, कुस्ती या मैदानी खेळांबरोबर बुद्धिबळाच्या खेळातही व पोहण्यातही प्राविण्य मिळवणारे अनेक विद्यार्थी कै. नातूसरांनी घडविले.[23] बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे नातू मास्तर होते.

### श्री. गो. द. काळे –

सिटी हायस्कूलमध्ये 1942 च्या सुमारास शारीरिक विभागाचे शिक्षक म्हणून रूजू झाले. श्री. काळेसर शाळेचे क्रीडापटू विद्यार्थी म्हणून शालेय जीवनात सर्वदूर चमकले होतेच. आपल्या क्रीडापटुत्वाचा लाभ मुक्तहस्त उपलब्ध करून महाराष्ट्र गाजविणारे खेळाडू, कुस्तीगार घडविले. नियमितपणे कृष्णेच्या काठावर मार्गदर्शन करून यांनी अनेक विद्यार्थी–विद्यार्थीनींना पोहण्याच्या कलेतही तरबेज केले.[24] शाळेच्या N.C.C. पथकाचे ऑफिसर व पुढे A.C.C. कमांडर म्हणून यांनी मोलाची कामगिरी बजावली.

### प्रा. भा. श्री. ठाणेदार –

सिटी हायस्कूलमधील एक अत्यंत उत्साही आणि विद्यार्थीप्रिय शिक्षक. मराठी, इंग्रजी या विषयांवर प्रभुत्व आणि विद्यार्थ्यांना तन्मयतेने शिकवण्याची हातोटी होती. प्रत्येक तास विद्यार्थ्यांच्या प्रसन्न प्रतिसादाने 'रंगला' पाहिजे ही त्यांची तळमळ होती. स्वतः उत्तम क्रीडापटू तसेच विद्यार्थ्यांना अभ्यासेतर शारीरिक उपक्रमांमध्ये कुशल मार्गदर्शन करीत असत. शाळेतील बहुविध व्याप सांभाळत असतानाच पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. संस्थेच्या बी. एड्. कॉलेजमध्ये प्रथम प्राध्यापक व पुढे प्राचार्य म्हणून यशस्वीपणे जबाबदारी सांभाळली. त्यांचा विविध सामाजिक कार्यांमध्ये सहभाग होता आणि त्यांच्या सामाजिक संपर्काचा लाभ संस्थेस त्यांनी प्राप्त करून दिला.[25] निवृत्त आयुष्यात ते अत्यंत साधेपणाने राहात. परदेशातही अभ्यासपूर्ण व्याख्याने देऊन यांनी लौकिक मिळविला होता.

### श्री. शि. गो. कोटिभास्कर –

सिटी हायस्कूलचे माजी विद्यार्थी आणि सिटी हायस्कूलच्या आजच्या उभारणीत मोलाचा सहभाग असलेले ध्येयनिष्ठ शिक्षक–मुख्याध्यापक. सिटी हायस्कूलच्या हीरक महोत्सव समारंभाच्या वर्षी हे शाळेचे मुख्याध्यापक होते. अविश्रांत परिश्रम करून त्यांनी हीरक महोत्सव संपन्न केला आणि त्याबरोबरच शाळेच्या इमारतवाढीसाठी यशस्वी प्रयत्न केले. विद्यार्थी–प्रिय, सदैव कामात रंगलेले, कष्टाळू आणि निःस्पृह असा लौकिक त्यांनी संपादन केला.[26] ते उत्कृष्ट शास्त्रशिक्षकही होते आणि उत्कृष्ट शारीरिक शिक्षक होते. संस्थेने काही काळ चालवलेल्या तासगाव येथील सी. पी. एड्. कॉलेजच्या प्रमुखपदाची जबाबदारी त्यांनी सांभाळली होती.

### श्री. अ. गो. कुंटे –

सिटी हायस्कूल मध्ये शिक्षक, उपमुख्याध्यापक आणि मुख्याध्यापक अशा अनेक पदांवरून त्यांनी दक्षतेने जबाबदारी सांभाळली. अध्यापकीय कौशल्य, शालेय नियंत्रणावरील उत्तम प्रभुत्व, उत्कृष्ट सामाजिक संपर्क हे श्री. कुंटे सरांचे गुणविशेष. अतिशय शिस्तपूर्ण पण तरीही भीती किंवा कडवटपणा नसलेले शालेय नियोजन त्यांनी केले. हीरक महोत्सवाच्या प्रसंगी आणि इतरही शाळेची इमारत वाढीसाठी खूप परिश्रम केले.[27] विद्यार्थ्यांची आणि सहकारी

शिक्षकांची सर्वांगीण प्रगती व्हावी यासाठी श्री. कुंटे सर सदैव प्रयत्नशील राहिले. फार कमी बोलणारे पण खूप चांगले घडविणारे कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्व म्हणून आजही त्यांच्या विषयी सर्वांच्या मनात आदर आहेत.

## कै. ह. शं. लिमये –

सिटी हायस्कूलमध्ये शिक्षक, उपमुख्याध्यापक व मुख्याध्यापक या नात्याने त्यांनी मोलाचे कार्य केले. उत्कृष्ट शास्त्र व गणित शिक्षक म्हणून तर त्यांचा लौकिक होताच पण एक कृतिशील विज्ञानप्रेमी म्हणूनही त्यांना ओळखले जात असे. सदैव उत्साहाचा झरा त्यांच्या वागण्याबोलण्यात ओसंडताना दिसे. समाजातील अनेकानेक क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींनी शाळेच्या संपर्कात यावे, अनेक विविध उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शाळेत सतत होत रहावेत. शाळा सदैव गाजती रहावी हा त्यांचा सक्रिय आग्रह होता. कार्यक्रमांचे परिपूर्ण नियोजन आणि काटेकोर अचूक कार्यवाही हे त्यांचे खास वैशिष्ट्य होते. सर्वांना हसत खेळत ठेऊन कामात रंगवायचे ही त्यांची कार्य पध्दती होती. दि.22/06/1990 रोजी त्यांचे निधन झाले.

## श्री. भ. रा. नाईक बी. ए. एम. एड्.

सिटी हायस्कूलमधील प्रसन्न व्यक्तीमत्त्वाचे, उत्साही आणि अध्यापन कुशल शिक्षक आणि कर्तबगार मुख्याध्यापक! विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच उत्कृष्ट नैतिक सुसंस्कारही व्हावेत यावर श्री. नाईकसरांचा कटाक्ष होता. मराठी व इंग्रजी या विषयांवर प्रभुत्व. शैक्षणिक क्षेत्रात व सांस्कृतीक क्षेत्रात शाळेबाहेरच जगातही विधायक कार्य करून लौकिक संपादन केला. संस्थेच्या विविध भागातून मुख्याध्यापक म्हणून उत्कृष्ट कामगिरी बजावली. शासनाने राज्य पुरस्कार देऊन श्री. नाईकसरांच्या ध्येयवादी शिक्षण कार्याचा यथायोग्य गौरव केला आहे. अध्यात्मिक मनोधारणा असलेले श्री. नाईकसर समाधानी वृत्तीने निवृत्तीनंतरचा काळ ज्ञानसाधनेत घालवला होता.

## श्री. रा. श्री. केळकर –

शालेय प्रशासनाच्या विषयात अत्यंत दक्ष आणि व्यवहार कुशल प्रशासक. सिटी हायस्कूलचे मुख्याध्यापक या नात्याने यांनी फार मोलाची कामगिरी केली. हुशार विद्यार्थ्यांच्या विकासासाठी तसेच शैक्षणिक दृष्ट्या मागास विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठीही स्वतः जास्तीचे तास घेऊन प्रयत्नशील राहिले. शिक्षकांच्या कार्यक्षमतेकडे आणि विकासाकडेही त्यांचे लक्ष होते. अतिशय परिश्रमपूर्वक शाळेचे रेकॉर्ड यांनी अद्ययावत केले. श्री. केळकरसरांच्या प्रयत्नांतून शाळेच्या पश्चिम बाजूच्या दुमजली इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आणि आता दर्शनी बाजूचे बांधकाम पूर्ण होण्याच्या मार्गावर आले आहे. श्री. केळकरसरांना जिल्हापरिषदेचा 'आदर्श शिक्षक पुरस्कार' 1989 साली प्राप्त झाला. अशा त–हेने सांगली शिक्षण संस्थेच्या वाटचालीमध्ये नावलौकिकामध्ये रौप्य, त्रितपोमहोत्सव, सुवर्णमहोत्सव, हीरकमहोत्सव, अमृतमहोत्सव व शताब्दीच्या वाटचालीमध्ये वरील चार प्रमुख संस्थापकांचे, आजीव सदस्यांचे, मुख्याध्यापकांचे, शिक्षकांचे योगदान येथे महत्त्वाचे वाटते.

## संदर्भ साधने


1. वसंत आपटे, संकलक व लेखक – सांगली शिक्षण संस्था, सिटी हायस्कूल 1914 ते 2014 इतिहास ग्रंथ ,प्रकाशक –नितिन खाडिलकर अध्यक्ष पृष्ठ क्र.. .38
2. आ. श्री.बुवासाहेब गोसावी,सिटी हायस्कूलच्या त्रितपोमहोत्सव अंकातील पुनर्मुद्रित लेख, पृष्ठ क्र.. .29
3. वसंत आपटे, लेखक व संकलक, उपरनिर्दिष्ट पृष्ठ क्र... 39
4. स्मरणिका, अमृत महोत्सव, 1990 प्रकाशक–श. ना. फाळके, सिटी हायस्कूल, सांगली पृष्ठ क्र.. .29
5. वसंत आपटे, संकलक व लेखक, उपरनिर्दिष्ट पृष्ठ क्र... 39, 40
6 स्मरणिका, अमृत महोत्सव, 1990 प्रकाशक–श. ना. फाळके, पृष्ठ क्र.. 29
7. वसंत आपटे, संकलक व लेखक, उपरनिर्दिष्ट पृष्ठ क्र.. 39 ते 41
8 स्मरणिका, अमृत महोत्सव, 1990 उपरनिर्दिष्ट पृष्ठ क्र... 29
9. स्मरणिका, अमृत महोत्सव, 1990 उपरनिर्दिष्ट पृष्ठ क्र... 30
10. स्मरणिका, अमृत महोत्सव, 1990 उपरनिर्दिष्ट पृष्ठ क्र... 30
11. श्रीमती सुनंदा गोपाळ करंदीकर, माजी शिक्षिका, शतपदी 1924–1933, प्रकाशक–कार्यवाह, सांगली शिक्षण संस्था, खंड–2, पृष्ठ क्र.. 89 ते 90
12. स्मरणिका, अमृत महोत्सव, 1990 उपरनिर्दिष्ट पृष्ठ क्र.. 31
13. कित्ता पृष्ठ क्र.. 31
14. कित्ता पृष्ठ क्र.. 31
15. कित्ता पृष्ठ क्र.. 31
16. श्री. प्रा. दा. गो. परांजपे, शतपदी 1924–1933, प्रकाशक– कार्यवाह सांगली शिक्षण संस्था , खंड–2 पृष्ठ क्र.. 79
17. स्मरणिका, अमृत महोत्सव, 1990 उपरनिर्दिष्ट पृष्ठ क्र.. 32
18. स्मरणिका, हीरक महोत्सव, डिसेंबर 1974, सांगली शिक्षण संस्था, सिटी हायस्कूल, सांगली प्रकाशक–शि. गो. कोटिभास्कर, पृष्ठ क्र.. 54
19. कित्ता पृष्ठ क्र.. 55
20. श्री. म. के. दिक्षीत, शतपदी 1924–1923, प्रकाशक–कार्यवाह. सांगली शिक्षण संस्था खंड–2 पृष्ठ क्र.. 47
21. सौ. विशाखा दाते, माजी विद्यार्थिनी, शतपदी 1924–1933 खंड–2 पृष्ठ क्र.. 11
22. सौ. पद्मा दामले,, माजी विद्यार्थिनी, शतपदी 1924–1933 खंड–2 पृष्ठ क्र.. 81
23. श्री. प्रमोद गानू,, माजी विद्यार्थी, शतपदी 1924–1933 खंड–2 पृष्ठ क्र.. 33
24. श्रीमती माणिक आपटे, माजी विद्यार्थिनी,उपरनिर्दिष्ट, पृष्ठ क्र.. 121 ते 124
25. स्मरणिका, अमृत महोत्सव, उपरनिर्दिष्ट पृष्ठ क्र.. 35
26. कित्ता पृष्ठ क्र.. 35
27. कित्ता पृष्ठ क्र.. 35

## 4.3 सांगली शिक्षण संस्थेची स्थापना ,तिच्या विविध शाखा व त्यांचा विस्तार

### 4.3.1 सिटी हायस्कूल

**स्थापना 04 डिसेंबर 1914 (स्वातंत्र्यपूर्व शाळा)**

**'' ॐ तेजस्विनावधीतमस्तु ''।।**

स्वातंत्र्यपूर्व काळात लोकमान्य टिळकांनी ज्या चतु : सूत्रीचा पुरस्कार केला. त्यातील महत्त्वाचे सूत्र म्हणजे राष्ट्रीय शिक्षण.[1] सांगलीच्या सिटी स्कूलच्या संस्थापकांनी लोकमान्य पुरस्कृत राष्ट्रीय शिक्षण हेच उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून, 04 डिसेंबर 1914 रोजी लोकमान्यांची मंडालेच्या तुरूंगातून सुटका झाली. तो मुहूर्त समजून सिटी स्कूलची स्थापना[2] शुक्रवार 04 डिसेबर 1914 रोजी बुध्दजयंतीच्या सुमुहुर्तावर शाळेची स्थापना केल्याचा उल्लेख सुरूवातीच्या नोंदी व वृत्तांतामध्ये आहेत.[3] बुध्दपौर्णिमा वैशाख शुध्द 15 ला मानली जाते. ती बुध्दजयंती असते. त्यामुळे 4 डिसेंबरला बुध्दपौर्णिमा हा उल्लेख घोटाळ्यात टाकतो. त्यासंबंधी तर्क असा की, 04 डिसेंबर 1914 या दिवशी शाळेची स्थापना झाली तो मार्गशीर्ष कृष्ण द्वितीयेचा दिवस आहे. त्याकाळातील झालेल्या सरकारी निर्णयानुसार नवे शैक्षणिक वर्ष मे, जून 1915 पासून सुरू होणार होते. 1915 सालची वैशाख पौर्णिमा दि.28/29 मे रोजी होती. तो बुध्दजयंतीचा मुहूर्त शाळेचे कामकाज सुरू होण्याचा असून तो प्रत्यक्ष अध्यापन प्रारंभ दिवस असावा. 01 जून 1915 पासून नव्या शाळेचे अध्यापन सत्र सुरू झाले. **04 डिसेंबर 1914 ला बुध्दजयंती** या उल्लेखास दुजोरा देणारा अन्य काही संदर्भ मिळू शकला नाही.[4]

शाळेचे नाव 'सिटी स्कूल' असे ठेवले. लेले वाडयात चार ध्येयवेड्या तरूणांनी या संस्थेची स्थापना केली. प्रथम मुख्याध्यापक म्हणून गुरूवर्य रा. राजाराम रावजी चिकोडीकर यांनी पद्भार स्वीकारला. 'एक शिष्य व चार गुरू' या व्यस्तप्रमाणे कार्य सुरू झाले. त्या पहिल्या विद्यार्थ्याचे नाव होते 'जनार्दन वासुदेव खांडिलकर' त्यांची शाळा रजिस्टरमध्ये रीतसर नोंद आहे. एक, दोन, तीन असे डिसेंबर अखेर सात विद्यार्थी शाळेच्या पटावर होते. सुरूवातीस तीन वर्ग उघडण्यात आले.

ऑगस्ट 1915 मध्ये 52 असलेली विद्यार्थी संख्या वाढून ऑगस्ट 1916 मध्ये 70 झाली. डिसेंबरमध्ये 95, जानेवारी 1917 मध्ये 100 पर्यंत आकडा गेला. सिटी स्कूलमध्ये इंग्रजी चौथीचा वर्ग सुरू झाला.

**शाळेची पाटी –**

शाळेच्या नावाची पाटी संस्थापकांपैकी एक श्री. विनायकराव जोशी यांनी कल्पकतेने तयार केली होती. पत्र्यावर चक्क गुळाच्या पाण्याने अक्षरे लिहून त्यावर काजळी फासली होती त्यामुळे अक्षरे उठून दिसत होती.[5]

**शाळेची घंटा –**

श्री. विष्णुपंत फडके यांनी रेल्वेच्या रूळाचा तुकडा शाळेला भेट म्हणून दिला. तो रुळाचा तुकडा आढ्याला टांगण्यात आला. तीच शाळेची घंटा बनली.[6]

**विद्यार्थ्यांची संख्या –**

लोक सुरूवातीला शाळेसंबंधी चेष्टेने बोलत परंतु संस्थापकांच्या ध्येयवाद व जिद्द पाहून काही काळानंतर त्यांचे कौतूक करू लागले. जानेवारी सन 1915 अखेर विद्यार्थ्यांची संख्या 38 पर्यंत पोहचली. मार्च अखेर 48 झाली. मध्यंतरीच्या प्लेगच्या साथीने संख्यावाढीचा वेग मंदावला. ऑगस्ट 1915 मध्ये 52 विद्यार्थी सिटी स्कूलमध्ये शिकत होते. सांगलीच्या आसपास परिसरातील विद्यार्थीही शिक्षण घेत होते.

**रजिस्टर करणे –**

सिटी स्कूलचे काम वेगाने वाढू लागल्याने रजिस्ट्रेशनच्या सर्व अटी पूर्ण केल्याने सप्टेंबर 1915 मध्ये संस्थानद्वारे शाळेला मान्यता मिळाली. शाळेचे अधिकृत कौन्सिल तयार करण्यात आले.
कौन्सिल पुढीलप्रमाणे –

1. श्री. ग. र. अभ्यंकर
2. श्री. वि. कृ. माईणकर
3. श्री. म. के. आठवले
4. श्री. गो. गोडबोले
5. श्री. धों. वि. सखदेव

कौन्सिल स्थापनेनंतर ख–या अर्थाने शाळेस आखीव–रेखीव स्वरूप प्राप्त झाले.[7]
ऑगस्ट 1915 मध्ये 52 विद्यार्थी संख्या होती. ऑगस्ट 1916 मध्ये 70 झाली. डिसेंबर मध्ये 95, जानेवारी 1917 मध्ये तर 100 पर्यंत आकडा गेला. 100 चा आकडा पार झाल्याने सिटी स्कूलमध्ये इंग्रजी चौथीचा वर्ग सुरू झाला. ह्याच कालावधीत संस्थानकडून कायमची मान्यता मिळून रु, 400/– वार्षिक ग्रँट मंजूर झाली.
सन 1918 मध्ये शाळेस पाचवीचा वर्ग सुरू करण्यात आला व वार्षिक रु 1200/– ग्रँट मंजूर झाली. विद्यार्थी ग्रँट संख्या 150 च्यावर जाऊन 1918 मध्ये शाळेस First grade Anglo vernacular school असा दर्जा मिळाला होता.सन 1919 ला शाळेत सहावीचा वर्गही सुरू झाला. अशा त–हेने उत्तरोत्तर वाढत जाणा–या या संख्येवरून व संस्कार शिक्षणामुळे तालुक्यातही अशा शाळा निर्माण व्हाव्या अशी लोकांची भावना झाली.03 मार्च 1920 रोजी मॅट्रिकचा वर्ग सुरू झाला. सिटी स्कूलचे हायस्कूलमध्ये रुपांतर झाले.

**शिक्षक –**

महाबळ शिक्षक हे व्यायामाचे हौशी असलेले शिक्षक म्हणून असल्याने लोक चेष्टेने शाळेस '**पैलवानांची शाळा**' म्हणत. तर गुरुवर्य तोरो, श्री. बापूराव केळकर इ. मुळे शाळेस **पारमार्थिकांची शाळा** म्हटले जात होते.[8]

**संस्थेचे ब्रीद वाक्य –**

14 जून 1949 पासून "ॐ तेजस्विनावधीतमस्तु" हे ब्रीदवाक्य सांगली शिक्षण संस्थेने स्वीकारले आहे.
एखाद्या संस्थेचे बोधचिन्ह ही त्या संस्थेच्या विचारांची, भविष्याची, ध्येयाची इतिहासाची ओळख करून देत असते. 'आमचे अध्ययन व अध्यापन तेजस्वी असो'. अशा विचारांच्या सांगली शिक्षण संस्थेचे ब्रीद वाक्य/बोध चिन्ह आहे. समईच्या शांत प्रकाशात आपल्या शिष्याला ज्ञान देणारे गुरू व विनम्रपणे ज्ञान ग्रहण करणारा शिष्य हे अतिशय अर्थपूर्ण पिढ्यान्‌पिढ्या ज्ञानाचे आणि दानाचे महत्त्व सांगणारे हे बोधचिन्ह भावी काळात संस्थेच्या नावलौकिकाला साजेसे असणा–या या बोधचिन्हाचे निर्माते होते. श्री. आळतेकर सर.[9]

**संस्थेची मुद्रा –**

सांगली शिक्षण संस्थेच्या प्रशासनाचा आदर्श शासनाच्या, निमशासनाच्या आणि कोणत्याही कार्यालयात मान्य होईल असे आहे. शिस्तशीर काम, स्वच्छ हातांचे काम, गुणवत्तेचे काम, अनुकरणीय काम म्हणजे सांगली शिक्षण संस्था हे समीकरण राज्यभर सर्वांना मान्य व माहित आहे. एखादे काम संस्थेने स्वीकारले तर ते गुणवत्तेने होणार ही हमी आहे. ही संस्थेची मुद्रा आहे.[10]

**क्रीडा नैपुण्य –**

अभ्यासक्रमापुरते मर्यादित शिक्षण न देता सिटी हायस्कूलमधील विद्यार्थ्यांना डबलबार, सिंगलबार, खो–खो, हुतुतू इ. खेळ शिकवले जात. फुटबॉल, क्रिकेट हे विदेशी खेळ सुध्दा शिकवले जात होते.

**नैतिक शिक्षण –**

नैतिक शिक्षण देण्यासाठी स्वतंत्र तासाची व्यवस्था केलेली दिसते. श्री राम चरित्र, कृष्ण चरित्र, भारतीय युध्द, श्रीमदभगवतगीता याद्वारे नैतिकता बालमनाला शिकवली जाते.

**बौद्धिक उपक्रम –**

विद्यार्थ्यांच्या अंगी सभाधीटपणा उत्पन्न होऊन आपले विचार व्यवस्थित रितीने दुस–यापुढे मांडण्याची सवय व्हावी ह्या हेतूने 1920 च्या जून महिन्यात वादविवाद संघाची स्थापना करण्यात आली होती असे, श्री. नितिन जोशी 'असे रूजले बीज' या लेखात सांगतात की, मराठी व इंग्रजी अशा दोन्ही भाषांमधून वादविवाद होत.. चरित्रात्मक, आरोग्यविषयक नैतिक विषयांवरही वादविवाद होत. सण, धार्मिक उत्सव यांच्या अनुषंगाने चर्चा होत असे.[11]

**विद्यार्थी मासिक अंक–**

विद्यार्थ्यांच्या नैसर्गिक बुद्धीला चालना मिळावी म्हणून त्यांची निरीक्षणशक्ती वाढून त्यांच्यामध्ये लेखनाची आवड निर्माण व्हावी व कल्पनाशक्तीला वाव मिळावा यासाठी 1920 पासून स्वतःची 'तुषार मासिक अंक' काढण्याचा उपक्रम सुरू केला.

**विद्यार्थी ग्रंथसंग्रह –**

वाचनाची आवड उत्पन्न होण्याच्या दृष्टीने विजयादशमीच्या मुहूर्तावर स्थानिक लोकांकडून दस–याची भेट म्हणून वर्गणी गोळा केली होती. या वर्गणीतून 110 वेचक इंग्रजी, मराठी पुस्तके खरेदी करण्यात आली.

**विद्यार्थी सहकारी भांडार – सन 1919**

सहकारी तत्त्वावर मुलांकडून भांडवल गोळा करून 'विद्यार्थी सहकारी भांडार' सुरू केले त्या भांडवलातून क्रमिक पुस्तके, एक्सरसाईज बुक, परिक्षेचे पेपर्स, कागद, शाई, विद्यार्थी उपयोगी साहित्य ठेवले. विक्रीचे काम गरीब विद्यार्थ्यांना देऊन, त्याच्या मोबदल्यात त्यातील गरजेच्या वस्तू मोफत दिल्या जात होत्या. पर्यटन सहलीच्याद्वारे ही ज्ञान व मनोरंजनाचे धडे ही विद्यार्थ्यांना दिले जात होते.

**व्यावसायिक प्रशिक्षण –**

1920 पासून विणकामाचा वर्ग डिसेंबर मध्ये सुरू करण्यात आला. परंतु काही तांत्रिक कारणाने हा वर्ग बंद करण्यात आला. श्री. अ. इ. कडलास्कर माजी शिक्षक 'सिटी हायस्कूलचे मनोगत' व्यक्त करताना म्हणतात की, गुरूवर्य रास्ते सरांच्या मार्गदर्शनाखाली 'कुस्ती कौशल्य' मिळवून भारतभर किर्ती मिळविलेले पैलवान हरी नाना पवार, विष्णुपंत सावर्डेकर, प्रख्यात पैलवान बाबुराव पवार, पैलवान शामराव मोरे, पैलवान शिवाजी पवार, पै. लाला पवार, पै. संभाजी पवार इ. मैदान गाजविणा–या विद्यार्थ्यांमुळे पैलवानांची शाळा म्हणून सिटी हायस्कूल ओळखले जात होते.[12]

**सिटी हायस्कूलच्या प्रागंणात जिजाऊ माता व बालशिवाजी पुतळा –**

16 जून 1995 रोजी सिटी हायस्कूलमध्ये मुख्य इमारतीच्या सौधावर जिजाऊ माता व बालशिवाजी यांच्या पुतळ्याचे अनावरण झाले. अभ्यासाच्या पुस्तकांवर लक्ष देणारा बालशिवाजी राजा आणि त्याच्या पाठीवर मायेचा हात देऊन त्यास शिकवणारी जिजाऊ यांचे हे आगळे शिल्प आहे.

सकाळी सर्वच शाळातून व कॉलेजमधून प्रार्थना, राष्ट्रगीत, प्रतिज्ञा होते.

सांगली शिक्षण संस्थेतील विविध शाखामध्ये खालील प्रार्थना म्हटली जाते.

या कुन्देन्दुतुषारहारधवला या शुभ्रवस्त्रावृता
या वीणावरदण्डमण्डितकरा या श्वेतपद्मासना
या ब्रह्मांच्युतशंकर प्रभृतिभिर्देवैः सदा वंदिता
सा. मां पातु सरस्वती भगवती निःशेष जाड्यापहा ।।

कुंद फुलाप्रमाणे शुभ्र, चंद्राप्रमाणे शीतल, मोत्याप्रमाणे तेजस्वी, शुभ वस्त्र परिधान केलेली, वीणाधारिणी, श्वेत कमलावर आसनस्थ, देवांनाही वंदनीय आपल्या मनातील अज्ञानाचानाश करणा–या या सरस्वती देवीला माझे वंदन !

सन 1950 साली सिटी हायस्कूलच्या स्थापनेनंतर 36 वर्षाची तेजस्वी वाटचाल पूर्ण झाल्याने संस्थेने 4 डिसेंबर 1950 ला 'त्रितपोमहोत्सव' पार पाडला. ख्यातनाम गणित तज्ञ व जुन्या पिढीतील थोर समाजहितकर्ते डॉ. रघुनाथराव परांजपे (रॅंगलर) यांच्या अध्यक्षतेखाली हा समारंभ साजरा करण्यात आला. या निमित्ताने संस्थेचे नियतकालिक 'तुषार'याचा खास अंक ही काढण्यात आला.

**सांगलीतील कन्या शिक्षणाची सुरूवात**

संस्थानिकांच्या काळातही मुलींना शिक्षण दिले जात होते. परंतु मुलींचे शाळेतील प्रमाण आजच्यासारखे नव्हते. मुलींसाठी प्राथमिक शिक्षणाची सोय केली होती. 1910–11 साली संस्थानातील एकूण शाळांमध्ये 1416 मुली शिकत होत्या. अशी नोंद इतिहास खंडामध्ये दिलेली आहे. 1922 साली श्रीमती कळंत्रे आक्का यांनी सुरू केलेल्या जैन श्राविकाश्रम व त्यास जोडलेल्या शाळेत 70 मुलींनी प्रवेश घेतल्याची नोंद रजिस्टरमध्ये आढळते.

सांगली शिक्षण संस्थेच्या सांगली एज्युकेशन सोसायटीच्या सिटी हायस्कूलमध्ये पहिला कन्याप्रवेश मराठी शाळा क्र.1 मधून दि.09/07/1926 रोजी झाला होता. रमाबाई जयवंतराव कुलकर्णी हिचा शाळेतील रजिस्टर नंबर 1956 आहे. तिने इंग्रजी पहिली अ या वर्गात प्रवेश घेतला होता. दुसरी कन्या कु. आक्काताई लक्ष्मण काळे ही विद्यार्थिनी सांगली हायस्कूलमधून सिटी हायस्कूलमध्ये आली होती. तिचा रजिस्टर नंबर 2094 असून तिने इंग्रजी सातवी अ मध्ये प्रवेश घेतला होता.[13]

### 4.3.2 चंपाबेन वाडीलाल ज्ञानमंदिर, तासगांव

### स्थापना 06 जून 1920 (स्वातंत्र्यपूर्व शाळा)

सांगली शिक्षण संस्थेची दुसरी शाखा शाळा म्हणून हिचा उल्लेख केला जातो.[14] सांगली एज्युकेशन सोसायटीचे आजीव सभासद श्री. गो. गोडबोले काही खाजगी कामानिमित्त मार्च 1920 मध्ये तासगावला आले असताना ग्रामीण विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळावे या हेतूने तासगांव हायस्कूलचे हस्तांतर सांगली एज्युकेशन सोसायटीकडे केले. या कामासाठी त्यांना म्युन्सिपालिटीचे प्रेसिडेंट माधवराव कुलकर्णी, गोपाळराव कालगावकर यांची मदत घेतली व 01 जून 1920 पासून सांगली एज्येकेशन ए. व्ही. स्कूल अशी ओळख झाली. पहिले सुपरिटेंडेंट म्हणून श्री. गोडबोले यांची नियुक्ती सांगली एज्युकेशन सोसायटीने केली होती. बडोद्याचे सुप्रसिध्द मल्लविद्या विशारद प्रो. माणिकराव यांचे पट्टशिष्य श्रीपाद रामचंद्र जोग, तालीम मास्तर म्हणून काम करत होते. ते मल्लखांब, फरिगदगा, कुस्ती इत्यादींची कसून तयारी करून घेत होते. गुरूवर्य रा. म. जोगळेकर, नामबा पोक्षे, तमण्णाचार्य पडसलगीकर, बंडोपंत नातू यांनी व्यायामाची परंपरा जोपासण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. ड्रॉइंग मास्तर वाय. जी. पोंक्षे यांनी इलेमेंटरी परीक्षेची तयारी करून चित्रकलेत अनेक विद्यार्थी चमकवले होते.

पूर्वी ही शाळा मोकासवाड्याच्या इमारतीमध्ये भरत होती. याच वाड्यात न्यायमूर्ती रानड्यांनी रमाबाईंना लेखन, वाचनाचे धडे दिले होते. हीच ती ऐतिहासिक मोकासवाड्याची इमारत सन 1931 पासून विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी उपलब्ध झाली. सन 1934 च्या ऑगस्टमध्ये प्लेगची साथ आली होती. त्यावेळी तीन महिने शाळा बंद ठेवावी लागली. त्यातील काही विद्यार्थी या प्लेगच्या साथीला बळी पडले होते. पण त्याही परिस्थितीमध्ये गावकुसाबाहेर दत्ताच्या देवळाजवळील लोकल बोर्डाच्या जागेत मॅट्रिकचा वर्ग चालू ठेवला होता. सन 1950 मध्ये श्रीमंत परशुराम शंकरराव जमखंडीकरांनी 'रमणा' या नावाची श्रीमंगलमूर्तीच्या परिसरातील 4700 चौ. फुटाची जागा व भैरव काळे, डॉ. वा. श्री. काळे यांनी संस्थेला 5000 रू. मिळवून दिले होते. 09 फेब्रुवारी 1954 रोजी मा. मोरारजी देसाई यांच्या हस्ते कोनशिला बसविली होती..

सन 1977–78 साली मुख्यमंत्री निधीतून मिळालेल्या रक्कमेतून श्री. भ. रा. नाईक सरांनी प्रयोगशाळेचे बांधकाम करून घेतले होते. त्या गावातील नागरिक दगडूशेठ बोथरा यांनी मुलांसाठी पिण्याच्या पाण्यासाठी हौद बांधून दिला होता. शाळा स्थापनेला साठ वर्ष पूर्ण झाले म्हणून 'षष्ठयब्दिपूर्ती'चा सोहळा साजरा केला. यावेळी शि. गो. कोटिभास्कर मुख्याध्यापक होते.

श्रीमान रसिकलाल वाडीलाल शहा यांनी हीरक महोत्सवी वर्षात दोन लाखाची देणगी दिल्याने या शाळेचे पूर्वीचे 'ए. व्ही. स्कूल' हे नाव बदलून 'चंपाबेन वाडीलाल ज्ञानमंदिर, तासगांव' असे नामकरण करण्यात आले.
या शाळेचे वैशिष्ट्ये :–

1. जानेवारी 1980 साली नवी दिल्ली येथे प्रजासत्ताक दिन संचालनासाठी कुमार अशोक वसंत पांढरे यांची निवड झाली होती.
2. ओरिसा येथील एन. सी. सी. शिबीरात 1988 साली समीर बर्वे याची बेस्ट कॅडेट म्हणून निवड झाली होती.
3. श्याम सोनवणे या साहसी वीराने 10121 जोर मारून 14 ऑगस्ट 1989 रोजी जागतिक विक्रम केला होता.
4. कु. संध्या साखरे ही दहावीच्या परीक्षेत तासगांव केंद्रात पहिली आली होती.
5. सन 2007 साली सुमित बाळासाहेब जोतराव, साक्षी हणमंत पाटील N.T.S. या परीक्षेत राज्यस्तरापर्यंत पोहचले होते.
6. या शाळेकडे सेमी इंग्रजी माध्यम, आधुनिक संगणक कक्ष, स्पर्धा परीक्षा केंद्र, देशी–विदेशी खेळाचे प्रशिक्षण इत्यादी उपक्रम चालू आहेत.
7. सन 2011 व 2016 चा संस्थेचा वर्धापन दिन याच शाळेच्या पटांगणात झाला.

अशा अनेक कला, कर्तव्याने ही शाळा आज उभी आहे.

### 4.3.3 डॉ. बापट बाल शिक्षण मंदिर,
### स्थापना 08 मार्च 1931 (स्वातंत्र्यपूर्व शाळा)

या बालशिक्षण मंदिराची स्थापना 08 जून 1931 रोजी भिडे वाड्यात झाली आहे. याची सुरूवातीची जबाबदारी श्री. गुंडो दासो तथा आण्णा कंपली सरांच्याकडे होती. उपक्रम आणि कसदार अध्यापन हे ध्येय या शाळेचे आहे. बालकलाकरांनी पहिले स्नेहसंमेलन 1932 साली इंजिनिअर भावेच्या अध्यक्षतेखाली भरवले होते. सन 1938 पासून राज्य पुरस्कार प्राप्त श्री. बन्याबापू जोशी व यादव शिक्षक रूजू झाले. 09 जानेवारी 1954 रोजी भारताचे तत्कालीन उपराष्ट्रपती सर्वपल्ली डॉ. राधाकृष्णन या शाळेत आले होते. उपमंत्री बी. डी. जत्ता, नगराध्यक्ष गुलाबराव पाटील आले होते. सन 1954 मध्ये हरहुन्नरी शिक्षक शिंदगी सर यांचे आगमनही झाले. या संस्थेने 1956 ला पंचविशीत पदार्पण केले. 26 जानेवारी 1957 पासून निळी हाफपॅन्ट, पांढरा शर्ट व मुलींचा निळा स्कर्ट व पांढरा ब्लाऊज हा युनिफॉर्म आला. शिवणकाम, भाजीपाला बाग, रेशीमकिडे निरीक्षण 1958 पासून असे उपक्रम सुरू झाले. मुलींचे प्रथम बुलबुल पथक 1967 साली सौ. सु. सु. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली निर्माण झाले.[15]

लेखक ग. प्र. प्रधान, मालतीबाई दांडेकर, विद्यार्थी चित्तरंजन कोल्हटकर, गानसम्राज्ञी लता मंगेशकर, शिक्षणमंत्री वसंत पुरके, आशाताई खाडीलकर, माधवीताई घारपुरे, डॉ. आंबेडकर इत्यादिंनी या शाळेला पदस्पर्श केला आहे.

### 4.3.4 महात्मा गांधी विद्यामंदिर, विटा
### स्थापना 21 नोव्हेंबर 1937 (उच्चमाध्यमिक विभाग + तांत्रिक विभाग) (स्वातंत्र्यपूर्व शाळा)

सांगली शिक्षण संस्थेने ग्रामीण विभागातील शिक्षण देणारी शाळा म्हणून नावलौकिक मिळवला आहे. खानापूर तालुक्यातील विटा हे गाव, तालुका खानापूर आहे. परंतु सर्व तालुक्याची कामे 'विटा' या गावातच होतात. विट्याला नगरपालिका, पंचायत समिती, तहसिलदार प्रांत ऑफिस, कोर्ट, पोलिस स्टेशन, प्रशासकीय कार्यालये आहेत. त्याचबरोबर राष्ट्रीयकृत बँका आहेत. विट्यातील खासदार, आमदार या पदासाठीचे उमेदवार ही राहातात. अशा या विट्यातील शैक्षणिक संस्थेला भरघोस देणगीदार ही विटयाला लाभले आहेत. सुरूवातीला प्राथमिक शाळा होत्या. पण इंग्रजी शिक्षणाची सोय नव्हती. सर्वसाधारण विद्यार्थ्यांना माध्यमिक शिक्षणाला माध्यमिक शिक्षणापासून वंचित राहावे लागत होते. माध्यमिक शिक्षण देणारी शाळा सुरू करण्याच्या हेतूने इ.स.1937 साली विटे नगरपालिकेचे शिक्षणप्रेमी सदस्य मामासाहेब पेठकर, वकील भाऊसाहेब वाडीकर वकील, विठ्ठलदाजी पाटील (तत्कालीन नगराध्यक्ष) रामचंद्र तात्याबा लकडे, नानासाहेब सगरे, दादा बर्वे यांच्यासारख्या प्रतिष्ठित व्यक्तींनी पुढाकार घेऊन 'न्यू इंग्लिश स्कूल,' सांगली एज्युकेशनची विटयात इंग्रजी शाळा सुरू करण्याबाबतच ठराव एकमुखाने संमत झाला. श्री. स. तोरो, माजी शिक्षक, उच्चमाध्यमिक विभाग विटा, माजी शिक्षक म. गा. वि. विटा मनोगत व्यक्त करतात की, ''21 नोव्हेंबर 1937 रोजी शाळेची मुहूर्तमेढ रोवली व तिचे नामकरण न्यू इंग्लिश स्कूल असे ठेवले. 21 नाव्हेंबर 1937 स्थापन झालेली न्यू इंग्लिश स्कूल, विटे ही शाळा प्रथम भांबर्डेकर इनामदार वकीलांच्या वाड्यात भरत होती. पहिल्या दिवशी तीनही इयत्तेत मिळून 30 विद्यार्थी हजर होते. श्री. डी. पी. ताम्हणकर यांनी पहिले हेडमास्तर म्हणून धुरा सांभाळली.''[16] 15 ऑगस्ट 1948 साली पुज्य राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची स्मृती चिरंतन रहावी म्हणून त्यावेळेचे मुख्याध्यापक श्री. गुंडो दासो तथा आण्णासाहेब कंपलीसर यांनी न्यू इंग्लिश स्कूल हे नाव बदलून 'महात्मा गांधी विद्यामंदिर' असे नाव घोषित केले. 1951 साली एस. एस. सी. परिक्षेत सांगली केंद्रात सिद्दू पांडुरंग कदम यांनी प्रथम कमांक मिळवला होता[17]

### हनुमान बोर्डिंग, टागोर आश्रम, ग्रामीण भागातील पाँडेचेरी

महात्मा गांधी विद्यामंदिर. विट्याच्या शाळेच्या यशाची किर्ती ऐकून ग्रामीण भागातील विद्यार्थी, स्थानिक विद्यार्थ्यांचा लोंढा वाढू लागला. परगावी येणा–या विद्यार्थ्यांच्या निवासाची सोय व्हावी म्हणून 'हनुमान बोर्डिंग' बांधण्यात आले. त्यानंतर ना. वा. भावे यांनी 'टागोर आश्रम' असे नामकरण केले. इ.स.1975 मध्ये नवीन शैक्षणिक धोरणानुसार वाणिज्य व विज्ञान या शाखेचे वर्ग हा पुढे काही अडचणीमुळे बंद करण्यात आला. इ. स.1980 मध्ये 12 वी (वाणिज्य) चा वर्ग सुरू करण्याची परवानगी मिळाली. याचवर्षी आणखी एक आनंदाची गोष्ट घडली विनाअनुदानित 1958–59 साली म. गा. विद्यामंदिर विटे या शाळेत सायन्स वर्ग सुरू करण्यात आला. त्यास मध्यवर्ती सरकारकडून ग्रँट मिळाली. जिल्ह्यात पहिला सायन्स वर्ग सुरू करण्याचा मान या शाळेस मिळाला होता.
विनाआनुदानीत तत्त्वावर तांत्रिक विभाग सुरू करण्याची संमती शिक्षण खात्याकडून मिळाली. 'तांत्रिक विषयाची ज्ञान देणारी खानापूर तालुक्यातील पहिली शाळा' म्हणून म.गा.वि.चा गौरव केला जातो.[18] उच्च माध्यमिक विभागतील वाणिज्य शाखेचे कार्य व्यवस्थित चाललेले पाहून पालकांनी कला शाखा सुरू करण्याविषयी आग्रह धरला. कायम विनाअनुदानित तत्त्वावर कला विभाग इ.स.2000 मध्ये सुरू करण्यात आला. याच दरम्यान शिक्षण खात्याकडून माहिती तंत्रज्ञान या विषयास अनुदान तत्त्वावर मंजूरी मिळाली. या शाळेने 1987 साली सुवर्णमहोत्सवी वर्षात पदार्पण केले. अमृत महोत्सवी वर्ष 21 नोव्हेंबर 2012 पासून सुरू झाले. या निमित्ताने माजी विद्यार्थी संघटना स्थापन झाली. बॅचनुसार ज्येष्ठतम माजी विद्यार्थ्यांपासून नुकतेच एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांपर्यंत स्नेहमेळावे आयोजित केले. प्रत्येक मेळाव्याची सुरूवात श्रीनिवास शिंदगी सरांनी रचलेल्या शाळागीताने होत असे.–

**नितांत सुंदर या माळावर, सुरेख आमुची शाला.**
**हिचे आम्ही अभिमानी बालक मिळवू किर्ती यशाला।।**

या गीतातूनच विद्यार्थ्यांना स्वतःच्या यशाचा व दूजि जन्मदात्री शाला मातेला यश मिळवून देण्याचे संस्कार केले जातात. या अमृत महोत्सवी वर्षात 'विभागीय साहित्य संमेलनाचे' आयोजन दोन दिवस करण्यात आले होते. यावेळी श्रीमती मंगलाताई गोडबोले, माधवी वैद्य, अशोक नायगांवकर, प्रदिप निफाडकर यांसारखी साहित्य क्षेत्रातील दिग्गज मंडळी उपस्थित होती व अमृत महोत्सवी वर्षात **अजिंक्य जालिंदर पवार** हा विद्यार्थी एस.एस.सी.परिक्षेत 99. 09% गुण संपादन करून राज्यात प्रथम आला.[19] प्रत्येक वर्षी शाळेचा विद्यार्थी आधिक गुण प्राप्त करण्यासाठी ज्यादा तास, सराव परीक्षा, वैयक्तिक मार्गदर्शन केले जाते. ज्या विद्यार्थ्यांना घरी अभ्यास करण्यास अडचणी येतात त्या विद्यार्थ्यांना 'टागोर आश्रम'मध्ये बसून अभ्यास करावा किंवा महात्मा गांधी विद्यामंदिराच्या परिसरात 'यशवंतराव चव्हाण मुक्तांगण वाचनालय' आहे. त्या ठिकाणी अभ्यास करण्याची सोयही केली आहे. टागोर आश्रमाला ग्रामीण भागातील पाँडिचेरी असे प्रा. देवदत्त दाभोळकर यानी म्हटले आहे. दाभोळकर महात्मा गांधी विद्यामंदिर, विटे या शाळेत आले होते. विद्यामंदिराचा परिसर, इथले निष्ठापूर्वक प्रयत्न हे सर्व बारकाईने टिपले व ते मुलांना म्हणाले, ''मुलांनो, तुम्ही सारे भाग्यवान आहात मावळत्या सूर्याला साक्षीदार ठेवून सांगतो इथली प्रत्येक गोष्ट आकर्षक आहे. तुमची शिस्त, सभेची मांडणी सारं पाहिलं की, वाटतं ग्रामीण भागातील ही पाँडिचेरीच आहे.'' या टागोर आश्रमाला पुन्हा एकदा उभारी आणण्याचे काम गुरूवर्य गुंडोदासो ऊर्फ आण्णासाहेब कंपली माजी विद्यार्थी प्रतिष्ठान व त्याचे कार्याध्यक्ष बंडोपंत राजोपाध्येसाो यांनी केले आहे.

या शाळेचे ग्रंथालय नीटनेटके व व्यवस्थित आहे. ग्रंथालयातील खरेदीची व वाढदिवसानिमित्त भेट म्हणून मिळालेली अशी 8,000 च्या वरती पुस्तके उपलब्ध आहेत. 1955–56 या वर्षांत लोकशिक्षण दिनानिमित्त शासनातर्फे

झालेल्या ग्रंथालयाच्या स्पर्धेत ग्रंथ विभागासाठी पुरस्कार व पदक मिळाले. तसेच ग्रंथालयासाठी केंद्र सरकारचे रू. 2500/– विशेष अनुदानही मिळाले होते.

**N.C.C. (National Cadet Core)** पथक 1962 च्या चीन–भारत युध्दानंतर शाळेतील N.C.C. पथकांना विशेष प्राधान्य देण्यात आले. सध्या या पथकाचे काम श्री. गंगातीरकर सर बघत आहेत.

कै. बापूरावजी घोडके यांच्या प्रेरणेने व शिक्षण सहाय्यक मंडळ यांच्या कृपेने विद्यामंदिराची आजची जुनी इमारत उभी आहे. विद्यामंदिर नावारूपास आणण्यात कै. गुरूवर्य गुं. दा. कंपली यांची मुख्याध्यापक म्हणून कामगिरी केवळ अजोड अशी आहे. पुढे हीच परंपरा श्री. ना. वा. भावे यांनी चालविली व विद्यामंदिर हे खानापूर तालुक्यातील एक संस्कारकेंद्र बनविले. शाळेच्या चढत्या यशासाठी परिश्रम करणा–या मुख्याध्यापकांच्या मालिकेत सर्वश्री द. पु. ताम्हणकर, क. श्री. काळे, के. रा. जोशी, कै. गुं. दा. कंपली, ना. ग. फाळके, गो. ग. मराठे, ना. वा. भावे, भा. द. सहस्त्रबुध्दे, ह. श. लिमये, अ. गो. कुंटे, वा. ए. कुलकर्णी, गो. ग. आपटे, शि. गो. कोटिभास्कर, म. ल. पोतदार सर यांचा उल्लेख करावा लागेल.

### 4.3.5 बुधगाव हायस्कूल

### स्थापना 01 जून 1949 (स्वातंत्र्यपूर्व शाळा)

बुधगावची इंग्रजी शाळा 1904 मध्ये ''एव्ही स्कूल'' या नावाने स्थापन झाली होती. 1947 साली त्या शाळेचे रूपांतर पूर्व माध्यमिक शाळेत झाले. तेव्हापासून ते ''बुधगाव हायस्कूल'' झाले.[20] ही शाळा पूर्वीच्या 'मिरज संस्थानाची शाळा' म्हणून ओळखली जात असे. स्वातंत्र्यानंतर संस्थाने विलीन झाली व 1 जून 1949 पासून बुधगाव हायस्कूल सांगली एज्युकेशन सोसायटीकडे पाच वर्षाच्या कराराने मुंबई सरकारकडून आले.

ही अतिशय जुनी संस्थानी सरकारी शाळा सांगली शिक्षण ऐज्युकेशन सोसायटी संस्थेचा नावलौकिक ऐकून स्वातंत्र्यानंतर बुधगावच्या श्रीमंत बाळासाहेब पटवर्धन राजेसाहेबांनी बुधगाव हायस्कूल ही शाळा संस्थेकडे सुपूर्द केली होती.

दि. 01/06/1949 रोजी 'बुधागव हायस्कूल' ही शाळा सोसायटीच्या' ताब्यात आली. श्री. के. रा. जोशी यांची मुख्याध्यापक म्हणून नेमणूक झाली होती. पूर्वीचे या शाळेचे नाव ''ए. व्ही. स्कूल'' होते ते आता बुधगाव झाले. 14 जून 1949 पासून '' ॐ तेजस्विनावधीतमस्तु'' या ब्रीदवाक्याने ओळखले जाते. या शाळेमध्ये कवलापूर, बिसूर, कुमठे, कर्नाळ या निकटवर्ती ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय या शाळेने प्रथमपासून पाहिली आहे. संस्कृत विषयाचे रोप मुख्याध्यापक कै. के. रा. जोशी यांनी लावले. श्रीमद्‌भगवतगीता तोंडपाठ विद्यार्थ्यांच्याकडून करून घेण्याचे श्रेय श्री. गोसावी सर यांच्याकडे जाते. अथर्वशीर्ष स्तोत्र पठणाचे धडे ही विद्यार्थ्यांना दिले. प्रतिवर्षी सहस्त्रावर्तन अनुष्ठान आज ही चालू आहे.

#### गावातील लोकांचे योगदान –

डॉ.सुरेश उपळावीकर या सुप्रसिद्ध वैद्य धन्वंतरीकडून आजही विद्यार्थी व शिक्षकसेवकांना मोफत औषधोपचार करतात. अनेक ग्रामस्थ, माजी विद्यार्थी यांच्या सहकार्यातून शाळेची इमारत वाढवून शाळा एकाच वेळी भरते.

उद्योजक श्री व सौ. बाबरे यांच्या तीनही मुली एस. एस. सी. परिक्षेत केंद्रात व एस.एस.सी. बोर्डात मेरिट (गुणवत्ता) यादीत चमकल्या. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना दत्तक घेऊऊन खर्चाची जबाबदारी घेतली.[21]

**शिक्षकाचे सामाजिक कार्य व योगदान –**

1. गजानन शिवाजी कांबळे या मागासवर्गीय होतकरू, हुशार वक्तृत्व स्पर्धेत प्रतिवर्षी प्रथम क्रमांक ठरलेला असे या विद्यार्थ्यांचे 5 वी ते 12 वी पर्यंतचे शिक्षण गोसावी सरांनी केले. आज गजानन प्रसिध्द संगणक तज्ज्ञ असून मुद्रांक विक्रेता म्हणून कोर्टात कार्यरत आहे.
2. गोसावी सर व गोरे सर यांनी दोन गरीब कुटूंबांचा सर्व खर्च पाहिला. त्यांच्या मुलींची लग्ने ही लावून दिली.
3. एका नवीन गरीब नुकत्याच हजर झालेल्या शिक्षकांचा सर्वशिक्षकांनी पैसे गोळा करून विवाह लावून दिला.

**शिक्षण मंत्र्याची भेट –**

शिक्षणमंत्री माननीय मधुकरराव चौधरी यांनी शाळेस भेट दिली होती. 23 जुलै 1956 रोजी बुधगाव हायस्कूलमध्ये वाङ्‌मय मंडळाची स्थापना झाली. त्याकाळातील शिक्षण मूलभूत तत्त्वावर आधारित नैतिक शिक्षण अभ्यासक्रम विशेष रितीने राबविला गेला आहे. शिक्षण, साहित्य, कला, क्रिडा, राजकारण अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शाळेस भेटी दिल्या आहेत. शाळेच्या दैनंदिन शैक्षणिक कार्याबरोबर बुधगाव येथील सांस्कृतिक जीवनातही शाळा आस्थेने भाग घेते त्यामुळे ग्रामस्थांचे प्रेम या शाळेवर आहे. ग्रामपंचायतीनेही या शाळेला मदत केली आहे. बुधगावच्या ग्रामस्थांचे, ग्रामपंचायतीचे व अन्य सार्वजनिक संस्थांचे प्रेम व सहकार्य लाभल्यामुळे शाळेची प्रगती जोमाने चालली आहे.[22]

## 4.3.6 शेठ रतिलाल विठ्ठलदास गोसलिया हायस्कूल, माधवनगर (स्वातंत्र्योत्तर संस्था 08 जून 1953)

माधवनगर हे शहरी ग्रामीण अशी सरमिसळ असलेले गाव बघायला मिळते. कॉटन मिलमुळे कामगार वस्ती तर सांगली पालिकेशेजारी वसलेले व्यापारी गाव. माधवनगरमध्ये राहणारे मा. श्री. भ. रा. नाईक सरांनी मुलांच्या वतीने, गावातील शिक्षणप्रेमी लोकांचा सहभाग घेऊन सांगली शिक्षण संस्थेच्या वतीने 8 जून 1953 रोजी या हायस्कूलची स्थापना केली.[23] सांगली शिक्षण संस्थेच्या स्वातंत्र्योत्तर काळातील स्थापन झालेली पहिली शाळा आहे. त्याकाळी दक्षिण सातारा (त्यावेळेचे सांगलीचे नाव) आणि कोल्हापूर या दोन जिल्ह्यांचे शिक्षणाधिकारी कै. मा. श्री. य. व्यं. जावडेकर यांच्या हस्ते नामकरण माधवनगर विद्यालय असे झाले. शेठ रतिलाल गोसलिया हे स्वामी शिवानंद सरस्वती यांच्या नावे असलेल्या एका मोठ्या मोफत नेत्र रूग्णालयाचे आश्रयदाते होते. त्यानी या शाळेसाठी बिनव्याजी कर्जाने रक्कम दिली होती.[24] संस्थेने माधवनगर हायस्कूलचे नाव ''शेठ रतिलाल विठ्ठलदास गोसलिया हायस्कूल, माधवनगर'' असे केले. सुरूवातीस इ. 8 वी व 9 वी चा एक एक वर्ग सुरू केला. सन 1978 मध्ये या शाळेने रौप्य महोत्सवी वर्षात पदार्पण केले. या शाळेतून जे माजी विद्यार्थी बाहेर पडून ही त्यांनी आपली शाळेशी नाळ जोडून ठेवली आहे. शाळेसाठी पिण्याच्या पाण्याची सोय करण्यासाठी जुगलशेठ भराडिया या विद्यार्थ्याने को–या चेकवर सही करून दिली होती. संगणकाची सोय ही आहे, समृध्द वाचनालय, सभागृह, व्यासपीठ इ. आहेत. सध्या या शाळेने 64 व्या वर्षात पदार्पण केले आहे. शाळेने विशिष्ट दर्जाचे काम सुरू केले आहे. '1963 जूनमध्ये झालेल्या (S.S.C.) एस. एस. सी. परिक्षेत कु. शालिनी भास्कर भिडे या विद्यार्थिनीने बोर्डात तिसरा क्रमांक मिळवला.'

अभ्यास, खेळ, वक्तृत्व अशा विविध उपक्रमाने शाळा वाटचाल करीत आहे. या शाळेच्या आजवरच्या प्रगतीत मुख्याध्यापक म्हणून काम केलेल्या सर्वश्री भ. रा. नाईक, वि. हे. पोरे, गो. आ. करंदीकर, ना. चि. ताम्हणकर, ग. वा. परांजपे, पां. सी. तावरे इ. व्यक्तींचा वाटा मोठा असून सध्या श्री. सं. रा. माने यांच्या मार्गदर्शनाखाली शाळा सुरू आहे.

### 4.3.7 सरला बापट शिशुविकास मंदिर, सांगली स्थापना 01 जुलै 1954 (स्वातंत्र्योत्तर शाळा)

संस्थेची पहिली पूर्वप्राथमिक शाळा/सरला बापट शिशुविकास मंदिर, सांगली आहे. 01 जुलै 1954 ला स्थापना झाली. डॉ. बापटांची मुलगी सरलाताई यांना मुलांची खूप आवड होती. त्यांनी माधवनगर येथे आपल्या राहत्या घरी बालवाडी सुरू केली होती. परंतु वय वाढल्याने सरलाताईंना शाळेचा व्याप होईना म्हणून डॉ. बापटांनी सांगली शिक्षण संस्थेकडे प्रस्ताव मांडला की, माझ्या येथेच डॉ. बापट बाल शिक्षण मंदिर, सांगली शाळा सुरू आहेच. त्याचेच नाव 'सरला बापट शिशु विकास मंदिर,' सांगली असे करावे या प्रस्तावाला संस्थेने मान्यता दिली हे साल होते 1970 असे सौ. नीला राजाराम लिमये, माजी शिक्षीका सांगतात.[25]

बालकांच्या सर्वांगीण विकासात शरीर विकासाला फार महत्त्व आहे. खेळ खेळता येणे म्हणजे स्नायूंचा विकास, खेळातून सहकार्याची सवय, आज्ञापालन, खेळात बुद्धिचाही वापर करावा लागतो, प्रार्थना, भजन, जीवनव्यवहार, इंद्रिय शिक्षण, हस्तव्यवसाय, विज्ञान, संगीत, खेळ, मुक्तव्यवसाय या शैक्षणिक साहित्यातून शारिरीक व बौद्धिक विकास होण्यासाठी सहकार्य व सहभावना यांचे ज्ञान मिळावे हा उद्देश बाळगून बालवाडी सुरू केली. हसत खेळत शिक्षण देणे हा याचा मूळ पाया. आज शाळेची प्रगती झालेली दिसते. तीन मोठे हॉल, एक प्ले ग्रूप, तेरा ताई, सात सेविका, एक स्वंतत्र लेखनिक आणि अंदाजे सातशे मुले असा विस्तार झाला आहे. सांस्कृतिक कार्यक्रम ही होतात. रक्षाबंधन, सर्व मुलामुलींना कुंकू, मुलांना नाम लावून, ओवाळून राखी बांधतो, दहीहंडी पाना–फुलांनी सजविली जाते. कृष्ण, गोप, गोपी, सवंगडी टिपरी व राधा नाच करून भजनाच्या तालात दहीहंडी फोडली जाते. हादगा एंडोमेंटची बक्षीसे दिली जातात. या विद्यार्थ्यांना गणवेशही दिला आहे. 2005 साली सांगलीला महापूर आला होता त्या पाण्यामध्ये शाळेचे रेकॉर्ड, पुस्तके, सर्व काही बुडाले, तेही बरेचसे संसार उद्ध्वस्त, भयाण परिस्थिती निर्माण झाली. ही शाळा बिनघंटेची आहे. छोटेसे ग्रंथालय आहे. ताईंना शिक्षण देण्याची गुणवत्ता वाढावी या दृष्टीने संस्था निरनिराळ्या गावी उद्बोधन वर्ग आयोजित केले जातात. डॉ. श्री. गोविंद जोशी व सौ. सुलोचना जोशी यांनी संस्थेच्या बालवाडीकरिता 'बालमित्र' हा पुरस्कार नव्याने सन 2002 साली सुरू केला आहे. हा चांगल्या गुणवत्तेच्या ताईसाठी दिला जातो. 2007 पासून निवृत्त होणा–या सर्व ताई–सेविका यांना संस्थाचालकांनी निवृत्ती वेतन देण्याचा निर्णय घेतला. अखेर 2013 पासून हे निवृत्ती वेतन सुरू झाले.

### 4.3.8 हिज हायनेस राजा चिंतामणराव पटवर्धन हायस्कुल, सांगली (स्वातंत्र्योत्तर शाळा स्थापना 06 जानेवारी 1960)

सिटी हायस्कूलची 'राजवाडा शाखा' म्हणून ही शाळा ओळखली जाते.[26] सिटी हायस्कूलची संख्या वाढल्यामुळे व दुवक्त शाळा बंद करण्याची अंतिम सूचना शिक्षण खात्याने दिल्यामुळे नवीन जागेसाठी गुरूवर्य केशव जिवाजी दिक्षीत, गोपाळ बळवंत बिनीवाले, भास्कर दत्तात्रेय सहस्त्रबुध्दे, वसंत नारायण देवधर ही मंडळी जागा मागण्यासाठी हिज हायनेस राजा चिंतामणराव पटवर्धन यांच्याकडे गेले. त्यांनी 77 वर्षापूर्वी शिलेखान्याची जागा संस्थेला दिली. 2 जुलै 1954 शुक्रवार श्री. लक्ष्मीचा वार, सरस्वतीच्या मंदिराच्या पूजनासाठी लक्ष्मीपुत्र गजानन मिलचे मालक धनी उद्योगरत्न विष्णु रामचंद्र तथा दादासाहेब वेलणकर यांच्या हस्ते ध्वजारोहणचा कार्यक्रम झाला. या हायस्कूलला प्रथम 'राजवाडा शाखा' हे नाव दिले होते.[27] दि.06 जानेवारी 1960 रोजी मुंबई राज्याचे मुख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांचे हस्ते नामकरण करण्यात आले. सांगली शिक्षण संस्थेची धर्मकन्या झाली म्हणून पित्याच्या नावाने 'हिज हायनेस राजा चिंतामणराव पटवर्धन' म्हणून या शाळेला ओळखू लागले. श्री. उत्तम द. पोतदार पटवर्धन हायस्कूल, सांगलीचे मनोगतात सांगतात की, 'भारत सरकारने जून 1960 पासून ही शाळा बहु–उद्देशीय शाळा

(Multi purpose) स्कूलसाठी मान्यता देऊन ' Art Courses Drawing and music' या विषयाच्या अध्यापनासाठी हॉल बांधण्यासाठी रू.32,000/– अनुदान दिले होते." मार्च 1962 मध्ये सर्वश्री वि. दि. गोडबोले व श्री. ना. जोशी यांनी संस्कृतची अकबरनवीस शिष्यवृत्ती मिळविली. 1964 मध्ये माध्यमिक शालांत परिक्षेत सुनिल देशमुख याने बोर्डात 4 था क्रमांक व विज्ञान–रसायन–अंकगणितात पारितोषिक पटकावले होते. 1972 च्या माध्यमिक शालांत परिक्षेत संजीव श्रीनिवास कट्टी याने 700 पैकी 621 गुण मिळवून दोन लाख विद्यार्थ्यांत पहिला क्रमांक पटकावला होता. जून 1975 पासून उच्च माध्यमिक शिक्षणाच्या वर्गांपैकी आर्टस व सायन्सचे वर्ग सुरू करण्यास मान्यता मिळालेली आहे.

नागरिकशास्त्रसारख्या विषयातील प्रात्यक्षिक म्हणून स्नेह संमेलनासाठी विद्यार्थी प्रतिनिधी निवडणूक घेण्यात येत होती. याच धर्तीवर आज अनेक विद्यार्थी निवडणूका लढवून जिंकतही आहेत. अगदी ताजे उदाहरण घ्यायचे तर 16 व्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये माजी विद्यार्थी श्री. संजय (काका) पाटील हे भारतीय जनता पक्षाच्या वतीने 16 मे 2014 च्या निकालात तब्बल दोन लाख मतानी निवडून आले. अनेक निकालात तब्बल दोन लाख मतानी निवडून आले. अनेक नगरसेवक आ. संभाजी पवार, माजी आमदार मदन पाटील हे माजी विद्यार्थी म्हणजे या शाळेतील निवडणुकीने केलेले विद्यार्थी दशेतील संस्काराचे उदाहरण आहे.

राष्ट्रीय ध्येयाने सुरू झालेल्या शाळांनी प्रत्यक्ष स्वप्न पूर्ण करत असलेचे चित्र 26 जानेवारी 2013 च्या प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात भाग घेण्याचा मान मिळाला होता. त्याचबरोबर कु. हिरण्यगर्भ रविंद्र कुलकर्णी या बाल कलाकराने पोस्टमन मराठी चित्रपटात पोस्टमनच्या मुलाची भूमिका बजावली आहे. त्याचबरोबर पाठ्यपुस्तकातील लेखकांचे व कवीचे साहित्य संमेलन भरले. संस्थेच्या इतिहासात प्रथमच इतके साहित्यिक जमले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांना, पालकांना साहित्य लिहिण्यास प्रेरणा मिळाली. आजपर्यंतच्या काळात शाळेच्या संचालनाची जबाबदारी सर्वश्री के. जी. दिक्षीत, ना. वा. भावे, भा. द. सहस्त्रबुध्दे, व. ना. देवधर, भ. रा. नाईक यांनी परिश्रमपूर्वक सांभाळली आहे.

विद्यमान मुख्याध्यापक प्र. म. सावंत यांच्या नेतृत्वाखाली शाळेचे कामकाज सुरू आहे !

### 4.3.9 शेठ चतुरलाल गणपतचंद शहा विद्यामंदिर, लेंगरे
### स्थापना 09 जून 1961 (स्वातंत्र्योत्तर शाळा)

लेंगरे हे गाव दुष्काळी भागातील असले तरी तसे सधन गाव. गावाच्या तिन्ही बाजूस ओढा, डोंगर, हिरवीगार शेती व दुरून कलंदरबाबाची टेकडी असे गावाचे वर्णन करता येईल. लेंग–याचे कै. श्री. आ. र. कुलकर्णी सर यांनी चालू केलेल्या लेंग–याची शाळा संस्थेने चालविणेस घेतली.[28] लेंगरे ग्रामस्थांच्या विनंतीवरून 09 जून 1961 रोजी न्यू इंग्लिश स्कूल लेंगरे शाळेची स्थापना केली होती. या शाळेसाठी लेंगरे येथील ग्रामस्थ सन्माननीय कांडेसर यांनी त्या गावालगतची 2 एकर 4 गुंठे इतकी जागा सांगली शिक्षण संस्थेस देणगी म्हणून दिली.

ग्रामीण भागातील संस्कार शाळा म्हणून प्रसिद्ध आहे. सुरूवातीस 8 वी, 9 वीचे वर्ग भाड्याच्या जागेत सुरू झाले व इ. स. 1964 पासून कॉलेजच्या .11 वीच्या वर्गाला सुरूवात झाली. ग्रामीण भागात शाळा असूनही शाळेचे निकाल सुरूवातीपासून चांगले लागलेले आहेत. इ. स.1964 साली तालुका पातळीवर शारीरिक शिक्षणाच्या कबड्डी स्पर्धेत चांगले यश मिळविले आहे व वैयक्तिक खेळात अनेक बक्षिसे मिळवली. या शाळेचा माजी विद्यार्थी कुमार कृष्णदेव महादेव देवकर याने 1967 मध्ये प्री. डिग्री परीक्षेत शिवाजी विद्यापीठात दुसरा क्रमांक मिळविला होता.

लेंग–याचे विद्यार्थी संजय ज्ञा. पवार 1997 मध्ये उपजिल्हाधिकारी या पदावर रूजू, चंद्रपूर व गडचिरोली येथे दहा वर्ष काम केले. सध्या पुणे विभागामध्ये उपजिल्हाधिकारी या पदावर कार्यरत आहे.[29]

या शाळेचे कुशल व्यवस्थापन 09 जून 1961 पासून 14 फेब्रुवारी 1973 अखेर सतत बारा वर्षे मुख्याध्यापक या नात्याने श्री. आ. र. कुलकर्णी यांनी पदभार सांभाळला होता. सध्याचे विद्यमान मुख्याध्यापक श्री. वि. पु. काळे हे पदभार सांभाळत आहेत.

## 4.3.10 श्री. विनायक ऊर्फ बाबासाहेब पटवर्धन कन्या प्रशाला, तासगांव
## स्थापना 12 जून 1961 (स्वातंत्र्योत्तर शाळा)

गुरूवर्य श्री. वि. शं. कोल्हटकर आणि गुरूवर्य श्री. रा. वा. काळे यांच्या पुढाकाराने दि.12 जून 1961 रोजी स्थापना झाली. या शाळेच्या इमारतीची जागा पटवर्धन सरकारची होती असे माजी शिक्षक श्री. संतोष शंकर जोशी 'पटवर्धन कन्याप्रशाला तासगांवचे' मनोगत मध्ये व्यक्त करतात. या जागेत पटवर्धनांचा जुना मोठा 'मोकास वाडा' नावाने प्रसिद्ध होता.[30] हा वाडा आणि सभोवतालची मोकळी जागा श्रीमंत कै. भाऊसाो पटवर्धन सरकार यांचेकडून शाळेसाठी मिळाली व पटवर्धनांच्या कृतज्ञतेपोटी दि.09 मार्च 1964 रोजी श्रीमंत विनायकराव ऊर्फ बाबासाहेब पटवर्धन कन्या प्रशाला असे भाऊसाहेबांच्या वडिलांचे नाव देण्यात आले. या शाळेचे वैशिष्ट्य म्हणजे येथे शिकणा–या विद्यार्थिनी ह्या ग्रामीण भागातून येणा–या, शेतकरी–कामकारी वर्गातल्या तासगाव पंचक्रोशीमधील पानमळ्याचीवाडी, शिरगाव, चिंचणी, वासुंबे, बोरगांव, मतकुणकी, बेंद्री, भिलवडी स्टेशन या खेड्यातील आहेत.[31] या मुली एस. टी. बसने ये–जा करतात. त्यामुळे एस. टी.च्या वेळेनुसार वेळापत्रकामध्ये लवचिकता ठेवावी लागते. खेड्यातील या पालकांशी संपर्क रहावा, त्यांना विश्वास वाटावा म्हणून शिक्षकांना खेड्याच्या दौ–यावरती जावे लागते. ग्रामीण भागातील मुख्याध्यापकांनी दाखले अडवू नयेत म्हणून शिक्षकवर्ग विशेष लक्ष ठेवतात. आज शिक्षकांच्या प्रयत्नांना यश येताना दिसते. कारण या शाळेमध्ये मुलींची संख्या वाढताना दिसत आहे. या शाळेमध्ये स्नेहसंमेलनासाठी स्वामीकार रणजित देसाई, बालसाहित्यकार, राजा मंगळवेढेकर, जगदिश खेबूडकर यासारखे नामांकित येऊन गेले होते. या शाळेला तीनवेळा 'विकास चॅरिटेबल ट्रस्ट'चा पुरस्कार मिळाला आहे.

पहिल्याच वर्षी एस. एस. सी. परिक्षेत 64 विद्यार्थिनी बसल्या होत्या. त्यांच्यापैकी कु. हेमलता जोशी हिने तासगांव केंद्रात पहिला कमांक मिळवला. शाळेच्या गुणवत्तेत भर घालण्यासाठी ग्रंथालय, शैक्षणिक साहित्य, शास्त्रीय उपकरणे, कार्यानुभवाचे साहित्य, प्रयोगशाळा आहे. तासगांव पंचक्रोशीत या कन्याशाळेने चांगलाच नावलौकिक मिळवला आहे.तासगांव नगरपालिका व ग्रामस्थ यांनी वेळोवेळी उदार देणग्या देऊन ही कन्याशाळा जोपासली आहे. शिक्षण अधिका–यांनीही 'एक आदर्श कन्याशाळा' म्हणून हिचा गौरव केला आहे !
सध्याचे विद्यमान मुख्याध्यापक सौ. आ. बा. गुरव कार्यभार सांभाळत आहेत.

## 4.3.11 श्रीमती पुतळाबेन शाह कॉलेज ऑफ एज्युकेशन
## स्थापना 12 जून 1961 (स्वातंत्र्योत्तर महाविद्यालय)

प्रशिक्षित शिक्षकांची गरज ओळखून 1961 साली स्थापना केली. सांगलीचे विद्याप्रेमी राजेसाहेब हिज हायनेस चिंतामणराव पटवर्धन यांनी कॉलेजच्या स्थापनेसाठी 50,000 रूपये उदार बुद्धीने डिपॉझिट म्हणून ठेवले होते. सुरूवातीला हे कॉलेज पुणे विद्यापिठाशी संलग्न झाले. पुढे शिवाजी विद्यापीठाची स्थापना झाल्यावर शिवाजी विद्यापीठाशी संलग्न झाली. या कॉलेजचे मूळ नाव 'कॉलेज ऑफ एज्युकेशन' असे होते. पण विटा येथील संस्थेचे माजी विद्यार्थी शिक्षणप्रेमी मा. सुधाकर शाह व मा. विलासशेठ शाह यांनी आपल्या मातोश्री श्रीमती पुतळाबेन शाह यांच्या इच्छेखातर दिलेल्या देणगीची कृतज्ञता म्हणून या कॉलेजचे नाव 'श्रीमती पुतळाबेन शाह कॉलेज ऑफ एज्युकेशन' असे ठेवले.[32] डॉ. सौ. रेखा टोपकर कॉलेजच्या प्राचार्य सांगतात, ''शासन योजनेअंतर्गत 1970 साली

विस्तार सेवा केंद्र ही या कॉलेजला मिळाले. जिल्ह्यात कार्यरत असणा–या शिक्षकांना उपक्रमशील बनविण्याची आणि गुणवत्ता वाढविण्याची जबाबदारीही कॉलेजने घेतली आहे.'' या कॉलेजकडे मोठेसे ग्रंथालय आहे. 22394 इतकी पुस्तके आहेत. 19 नियतकालिके आणि 10 वृत्तपत्रे आहेत. एम. फिल, पी. एच. डी, शिक्षक माजी विद्यार्थी या सर्वांना ग्रंथालयाचा उपयोग होतोय. यु. जी. सी. च्या अनुदानातून 15, 16 ऑक्टोंबर 2011 रोजी एक परिसंवाद आयोजित केला होता. महाविद्यालयाच्या इतिहासात 'राष्ट्रीय परिसंवाद' हा पहिलाच प्रसंग होता. महाविद्यालयाच्या पन्नास वर्षाच्या वाटचालीची माहिती द्यावी म्हणून 'तेजोवलय' नावाची स्मरणिका प्रकाशित केली आहे. दि.03 डिसेंबर, 04 डिसेंबर 2012 या दोन दिवशी नॅक समितीकडून तपासणी झाली. 2.56 गुण मिळून बी. ग्रेड मिळाली आहे.

### 4.3.12 महादेव केशव आठवले, विनय मंदिर (स्थापना 01 एप्रिल 1964)
### 4.3.13 दादूकाका भिडे, शिशुमंदिर, सांगली (स्थापना 16 जून 1965) (स्वातंत्र्योत्तर शाळा)

श्रीमंत पटवर्धन सरकारांची 'लाडकी कन्या' म्हणून या शाळेचा गौरव केला जातो.[33] 09 मार्च 1964 रोजी श्री. महादेव केशव आठवले यांच्या अमृत महोत्सवी वर्षी व त्यांच्या देणगीची चिरंतन आठवण राहावी यासाठी शाळेचे नाव 'म. के. आठवले विनय मंदिर' असे ठेवले गेले. या शाळेचे वैशिष्ट्य म्हणजे सर्वांना आपुलकीने वागविणारी शाळा. ऑफिस झाडणारा, घंटा देणारा आणि शाळेला स्वच्छ ठेवणा–या सर्व सेवकांपैकी ज्येष्ठ सेवकाच्या हस्ते स्वातंत्र्यदिनी झेंडा वंदन केले होते. त्यांनी आपल्या छोट्याशा भाषणातून सांगितले की, ''आज मला माझ्या सेवेबद्दल राष्ट्रपती पदक मिळाले असे वाटते. मी धन्य झालो.'' तो शिपाई जरी असला तरी माणूसपणाची, हक्काची जाणीव करून देण्याचा प्रयत्न या शाळेने केला आहे. श्रीमंताला समाजात सतत मान मिळतो, पण गरिबांना कसा आनंद मिळणार ? म्हणून असे उपक्रम राबविले जात आहेत.[34]

### 4.3.14 श्रीराम रामदयाळ मालू हायस्कूल, सांगली स्थापना 12 जून 1967 (स्वातंत्र्योत्तर शाळा)

या शाळेची स्थापना 08 जून 1967 साली होती. 'शिवाजी नगर हायस्कूल सांगली' असे शाळेचे नाव ठेवले गेले. वसंत कॉलनीतील एका बंगल्यात ही शाळा भरत होती. पहिले मुख्याध्यापक श्री. गो. द. काळे हे काम बघत होते. या शाळेमध्ये विश्रामबाग, गव्हर्नमेंट कॉलनी, धामणी, कुपवाड परिसर, वानलेसवाडी अशा लांबलांबच्या ठिकाणाहून विद्यार्थी येत होते. सांगलीतील प्रतिष्ठित व्यापारी मालू परिवारांकडून मोठी देणगी मिळाल्याने शाळेची स्वतःची इमारत बांधली गेली व शिवाजीनगर हायस्कूलचे 'श्रीराम रामदयाळ मालू हायस्कूल सांगली' असे नामकरण झाले.[35] ऑगस्ट 1976 मध्ये 'वसंत प्राथमिक शाळे' तील इयत्ता 5 वी चे दोन वर्ग आाणि 6 वी, 7 वी असे चार वर्ग तेथील शिक्षकांसह या शाळेमध्ये सामावले. या शाळेचे मुख्याध्यापक फाळके सर होते, त्याचबरोबर पुणे एस. एस. सी. बोर्डाचे सांगली केंद्राचे प्रमुख होते. त्यांनी ही शाळा मुख्य केंद्र करून पहिला उपक्रम राबविला होता. छात्रसैनिक, शाला व शालाबाह्य स्पर्धा, सांस्कृतिक उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांचा विकास केला जातो.

मार्च 1987 साली पुणे बोर्डाच्या एस. एस. सी. परीक्षेत कु. आसावरी गोविंद पाटील हिने बोर्डात 13 वी आल्याने महाराष्ट्रात विद्यार्थिनीसह शाळेचेही नाव चमकले. अभ्यासाबरोबर स्वतंत्र वाचनालय, सुसज्ज प्रयोग शाळा, संगणक कक्ष असे आज शाळेकडे उपलब्ध आहे. आणखी एक वैशिष्ट्य सांगावे लागेल. ही, माजी विद्यार्थी–शिक्षक संघटना! प्रतिवर्षी सर्व माजी विद्यार्थी–मुख्याध्यापक–शिक्षक एक दिवस एकत्र येतात व अल्पोपहार, भोजन, करमणूक यांचा

मनसोक्त अनुभव घेतात. त्यानंतर आपले मनोगत व्यक्त करतात. त्यातून शाळेतील आठवणी सांगतात. आज ते नोकरी व्यवसाय, राजकीय क्षेत्र, सामाजिक कार्य अशा अनेक क्षेत्रात उच्च पदावर असूनही ते येथे विद्यार्थी होतात.

## 4.3.15 सौ. इंदिराबाई भिडे, कन्याप्रशाला, विटा
## स्थापना 13 जून 1967 (स्वांतत्र्योत्तर शाळा)

13 जून 1967 रोजी या कन्या शाळेची स्थापना झाली. सन 1965 ते 1970 या काळात मुलींच्या शिक्षण प्रसारासाठी शासन प्रोत्साहन देत होते. मुलींसाठी काढल्या जाणा–या शाळांना लगेचच परवानगी मिळत होती. जर मुलींसाठी वेगळी शाळा सुरू केल्यास परवानगी मिळेल व मुलींनाही जवळ गावातच शाळेची सोय होईल. या उद्‌देशाने या शाळेची स्थापना झाली.

खानापूर तालुक्यातील 'पहिली कन्या शाळा' म्हणून ही शाळा प्रसिद्ध आहे.[36] ही शाळा दि.01/04/1970 पासून अनुदानास पात्र झाली आहे. सौ. विजया कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झाली. या शाळेला लाभलेले देणगीदार सौ. इंदिराबाई भिडे व डॉ. विष्णू भिडे, सन 1970 मध्ये डॉ. विष्णू भिडे यांच्या पत्नी सौ. इंदिराबाई भिडे यांच्या नावाने कन्या प्रशालेला नाव दिले गेले व तेव्हा पासून ही प्रशाला सौ. इंदिराबाई भिडे कन्या प्रशाला, विटे म्हणून ओळखण्यात येऊ लागली आहे.या शाळेमध्ये विटा पंचक्रोशीतील गार्डी, नागेवाडी, साळशिंगे, भाग्यनगर, सुळेवाडी, कार्वे इ. ठिकाणाच्या मुली प्रवेश घेतात. आजूबाजूच्या परिसरातील मुली प्रवेश घेताना दिसतात.ग्रामीण व नागरी संस्कृतीचा मिलाफ या ठिकाणी दिसतो. विद्यार्थीनींच्या सर्वांगीण विकासासाठी हा विभाग सदैव प्रयत्नशील राहिला आहे. स्वावलंबी शिक्षण देण्यावरती या शाळेचा भर आहे. स्काऊट चळवळ अंतर्गत ''खरी कमाई'' हा उपक्रम राबविला होता. या उपक्रमासाठी भिलवडी येथे मा. आर. आर. पाटील यांच्या हस्ते प्रथम क्रमांकाची ढाल मिळाली.

एकपात्री नाटक, ''व्हयं, मी सावित्री बोलतीय'' हे सायली कुलकर्णी हिचे नाटक सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचवण्याचे काम या विद्यार्थिनीने केले आहे. ''शारदोत्सवाचा शाळेतील कार्यक्रम म्हणजे दिवाळीच असते.'' विट्याच्या तहसील कार्यालयामध्ये स्वातंत्र्यदिन व प्रजासत्ताक दिन साजरा केला जातो. त्यामध्ये या शाळेतील विद्यार्थीनीने राष्ट्रगीत म्हणण्याची परंपरा गेली 26 वर्षापासून आहे. रौप्य महोत्सवी वर्षामध्ये या शाळेने काही सामाजिक उपक्रम हाती घेऊन साजरे केले होते. उदा.– माजी विद्यार्थीनी मेळावे, जागृती, फे–या, वृक्षारोपण, समाजसेवा/स्काऊट गाईड शिबीर इ

### राज्य स्तरीय पुरस्कार –

राष्ट्रीय पुरस्कार व आंतरराष्ट्रीय पुरस्कार दि.16 ते 22 ऑक्टोंबर 2005 साली हरिद्वार (जांबोरी) येथे झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील स्काऊट गाईड मेळाव्यात प्रशालेच्या 5 विद्यार्थिनींना राज्य पुरस्कार व 5 विद्यार्थिंनीनी राष्ट्रीय पुरस्कार राष्ट्रपती मा. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या उपस्थितीत प्राप्त झाला आहे.

### मा. जयंत नारळीकरांच्या हस्ते सन्मान –

कु. अंजली चोथे हिने पायथागोरसच्या सिध्दांताचे सूत्र वेगळ्या प्रकारे विकसित केले होते. कु. नमना कुलकर्णीने काढलेली चित्रे मॉरशिअस येथे पाठविले होते. तिने इतर देशातही आपल्या कलेने आपले व आपल्या शाळेचे नाव उज्ज्वल केले आहे.

**आंतरराष्ट्रीय पुरस्कार –**

सन 2014–2015 या वर्षामध्ये कु. ऐश्वर्या ह. ऐवळे या विद्यार्थीनीची आशियाई लंगडी स्पर्धेसाठी काठमांडू (नेपाळ) येथे होणा–या आंतरराष्ट्रीय सामन्यासाठी निवड होऊन तिने सुवर्णपदक मिळवले व सन 2016 मध्ये मायणीच्या मेडीकल कॉलेजने सन 2016 च्या खेलरत्न पुरस्कार देऊन तिचा सन्मान केला असे तिने आपल्या मुलाखतीत सांगितले[37]

**आजपर्यंत या शाळेला लाभलेले मुख्याध्यापक –**

या शाळेचे मुख्याध्यापक म्हणून सौ. विजयाबाई कुलकर्णी यांना राष्ट्रपतीच्या हस्ते पुरस्कार मिळाला होता. श्री. शं. ना. फाळके, श्री. शि. गो. कोटिभास्कर, श्री. पु. ग. देसाई व श्री. म. ल. पोतदार यांनी काम केले. सध्याचे विद्यमान मुख्याध्यापिका सौ. निता लक्ष्मण जोशी या कार्यभार सांभाळत आहेत.

**इतर उपक्रम –**

विद्यार्थिनींना बचतीची सवय लागावी म्हणून बचत बँकेसारखे उपक्रम राबविले. स्वतः भाजीपाला पिकवायचा व तो विकून बचत करायची. 1979 साली या शाळेस बचत शाळा असे संबोधून शासनाने गौरव केला.

## 4.3.16 कै. गणेश रामकृष्ण पुरोहित कन्या प्रशाला, सांगली.
## स्थापना 01 जून 1971 (स्वातंत्र्योत्तर शाळा)

कै. ग. रा. पुरोहित कन्याप्रशाला ही 'गणेशदुर्ग राजवाडा' या वस्तीत आहे. इतिहास काळात हा परिसर 'अश्वशाळा' म्हणून ओळखला जात होता. इथे वाघाचे बछडे आणि सिंहाचे छावे ही बागडत होते. पूर्वी या विभागाला 'पागा चौक' असे म्हणत होते. 01 जून 1971 मध्ये या शाळेची सुरूवात झाली.[38] 1990 साली या शाळेकडे उच्चमाध्यमिक विभाग सुरू झाला. 1987 साली प्रतिभा खाडिलकर ही एम. डी. परिक्षेत सर्वप्रथम आलेली विद्यार्थीनी आहे. नीता मुतालिक केळकर या सांगली जिल्ह्यातील भाजपा या मोठ्या राजकीय पक्षाच्या महिला आघाडी प्रमुख आहेत. त्या या शाळेच्या माजी विद्यार्थीनी आहेत.

**संगीत आणि नाट्य क्षेत्राप्रमाणेच अनेक विद्यार्थीनी क्रीडाक्षेत्रातही चमकल्या आहेत.**

कबड्डी – राज्य पातळी निवड – सुनिता नलवडे, संगिता डोडिया, ममता पोतदार व शिवछत्रपती पुरस्कार स्वाती खाडीलकर इ.

1. रोप मल्लखांब – प्राची दांडेकर, गीतांजली मगदूम
2. जलतरण – हेमलता खिलारे
3. व्हॉलीबॉल – अपूर्वा झाडबुके
4. क्रिकेट – अश्विनी बिनीवाले – महाराष्ट्र महिला संघ
5. बुद्धिबळ – गोपी जहागिरीदार, अश्विनी व शिल्पा पाच्छापूरकर.

**शाळेला प्राप्त झालेले पुरस्कार –**

1. 1978–79 धडपडणारी शाळा पुरस्कार
2. 1995–96 क्रिडा विभागात पुरस्कार
3. सवित्रीबाई फुले 150 वी जयंती नाट्य पुरस्कार
4. आचार्य अत्रे जन्मशताब्दी नाट्य पुरस्कार
5. राज्यस्तरावरील शालेय नाट्यस्पर्धा वैयक्तिक अभिनय
6. झी मराठी वरील अल्फा स्कॉलर उपविजेता
7. केंद्र सरकार सांस्कृतिक शिष्यवृत्तीधारक विद्यार्थिनी पुरस्कार : चित्रा भावे, शर्मिला आपटे, अनघा, कुलकर्णी, सुमेधा कुलकर्णी,
8. अपर्णा आपटे 2012 साली राज्य नाट्य स्पर्धेत वैयक्तिक अभिनयाचा पुरस्कार प्राप्त.
9. शर्वरी सोवनी संगीत शिक्षण जितेंद्र अभिषेकी शिष्यवृत्ती.
10. सारेगम फेम स्वरदा गोखले
11. चित्रा कुलकर्णी ई. टीव्हीवर निवेदन आणि अभिनय
12. मंजिरी असनारे केळकर बिस्मिल्ला खॉ पुरस्कार

**साहित्य क्षेत्रातील अनेक मान्यवर व्यक्ती शाळेला भेट –**

स्वामीकार – रणजित देसाई, एक होता कार्व्हरच्या लेखिका वीणा गवाणकर, कवयित्री शांता शेळके,लेखक व गीतकार प्रवीण दवणे, शिक्षण तज्ज्ञ ललिता गुप्ता इ.या शाळेची जबाबदारी महिला वर्गांच्या हातात आल्यानेही विकासाची चढती कमान दिसते. विद्यार्थिंनीच्या आयुष्याच्या वाटेत दिपस्तंभाप्रमाणे त्यांना प्रकाशमान करत आहे. अभ्यासांबरोबर खेळ वक्तृत्व व नाटय या विषयाच्या स्पर्धामधूनही या शाळेतील विद्यार्थीनी भाग घेत आहेत व अनेक पारितोषिकेही मिळवीत आहेत.[39]

## 4.3.17 वसंत विद्या मंडळ, सांगली मार्केट यार्ड सांगली.
## स्थापना 01 जून 1975, स्वातंत्र्योत्तर प्राथमिक शाळा

सांगली शहरातील पूर्वीचा वखारभाग हा व्यापारी पेठेचा भाग होता. मालाची आवक आणि वाहतूक–रहदारी वाढल्यामुळे व्यापाराच्या सोयीसाठी सांगलीतील मार्केटयार्ड 1955 साली उभे करण्यात आले. 1968 साली ब्रॉडगेजचे नवे रेल्वे स्टेशनही आले. त्या परिसरातील लोकवस्ती वाढली म्हणून सिटी हायस्कूलचे शिक्षक श्री. के. आ. रसाळ 'हीरक महोत्सवी सांगली शिक्षण संस्था' या लेखात मनोगत व्यक्त करतात. ''सिटी हायस्कूलचे एक माजी विद्यार्थी शेठ शेवंतीभाई गांधी व त्यांचे सहकारी यांनी 1968 पासून वसंत विद्यामंडळ या नावाची संस्था स्थापून सांगलीच्या मार्केट यार्डमध्ये पूर्वप्राथमिक पासून सातवीपर्यंतची वसंत प्राथमिक शाळा त्या संस्थेकरवी त्यांनी घेतली.'' या घडामोडीत कानेटकरबाई शाळेतून बाहेर पडल्या. काही काळ गेल्यानंतर शेवंतीबाई गांधी व त्यांचे व्यापारक्षेत्रातील सहकारी यांना दैनंदिन कामाचा व्याप आणि अन्य काही अडचणींमुळे ही शाळा चालविणे त्यांना जिकिरीचे होते म्हणून सांगली शिक्षण संस्थेकडे ही शाळा देण्याचा दि.10/02/1975 च्या पत्रातील प्रस्ताव त्यांच्याकडून आला. त्यानुसार 01.06.1975 पासून सर्व बाबी विनामूल्य हस्तांतरीत सांगली शिक्षण संस्थेकडे केल्या.

### 4.3.18 वसंत बाल मंदिर, प्राथमिक शाळा, सांगली .

### स्थापना 01 जून 1975

दत्तकवारस म्हणून ही शाळा सांगली शिक्षण संस्थेकडे आली. या शाळेचा जन्म शिशुवर्गातून झाला. त्यावेळी शिल्पकार श्रीमती निर्मला कानिटकर शिक्षिका होत्या. वसंत प्राथमिक शाळा या नावाची बिरूदावली मा. वसंतदादा पाटील यांची पुण्याई दर्शवित असतानाच शाळेचे नाव पुन्हा एकदा कपबुलबुलच्या यशामुळे श्री. संजीव चौगुले सरांच्या कुशल नेतृत्वाने बालवीरांनी पंचमढी येथे आपल्या राज्याचे नेतृत्व केले. या पथकाने 2006 पासून प्रत्येक वर्षी शाळा चैतन्यमय करून सोडले आहे. मुख्याध्यापिका सौ. रो. र. पांडे यांच्या प्रोत्साहनातून 39 विद्यार्थ्यांनी स्काऊटमधील 'सुवर्णबाण पुरस्कार' प्राप्त केला.[40] पर्यावरण शिक्षण केंद्राच्या सहकार्यातून 'एक दिवस पायी जाऊ' हा इंधनबचतीचा निसर्ग संरक्षक कार्यक्रम पालक ,शिक्षिक – विद्यार्थ्यांनी पार पाडला. स्वच्छता व वृक्षारोपणाचे धडे शिकवले जातात. सन 2013 साली इयत्ता 4 थी शिष्यवृत्ती वर्गातून 15 विद्यार्थ्यांनी जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत आपले नाव झळकवले होते. चि. कुणाल इंगळे या विद्यार्थ्याने जिल्ह्यातील 3 रा क्रमांक मिळवला. आज या शाळेने पंच्याहत्तरावी वर्ष पूर्ण करून यशाची उज्ज्वल परंपरा सुरू ठेवली आहे.

### 4.3.19 राधा गोविंद मराठे बालशाळा, तासगांव

### स्थापना 01 जानेवारी 1935

सांगली बाह्य 'पहिली प्राथमिक शाळा' बालशाळा म्हणून ओळखली जाते. 01 जानेवारी 1935 रोजी या शाळेची स्थापना झाली आहे. आदर्श व सुसंस्कारित विद्यार्थी निर्माण करणे हे ध्येय. 1 ली ते 4 थी चे वर्ग या शाळेत भरतात. महाराष्ट्र राज्य स्तरावर भारत स्काऊट गाईडमध्ये बालशाळा तासगांव येथील सात विद्यार्थिनींना 'हीरक पंख' प्रदान करण्यात आला.

30 जानेवारी 1949 या दिवशी बाल विद्यार्थ्यांनी 12 तास अखंड सूतकताईने साजरा केला होता. सूतकताईच्या उपक्रमामध्ये 13 चरख्यांची भेट मिळाली.[41] 26 जानेवारी 1951 या वर्षी राष्ट्रीय समारंभात स्वामी रामानंद भारतींचे चरणस्पर्श लागून त्यांच्या हस्ते मुलांना खादीचे कपडे देण्यात आले होते.[42] या शाळेमध्ये सतत नवनवीन उपक्रम राबविले जातात. 1999 नंतर शाळेच्या भौतिक सुविधा, शालेय शिस्त, शैक्षणिक गुणवत्ता, बाहय स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, गायन स्पर्धा, कबबुलबुल, शैक्षणिक बालविकास शिबीरे, आनंदबाल मेळावे, बालकांना मार्गदर्शन व्यायामशाळा, शिष्यवृत्तीसाठी विशेष मार्गदर्शन वर्ग, प्रभावी स्नेहसंमेलन इत्यादी उपक्रम पार पाडले आहेत. 2009–10 सालात या शाळेने रौप्य महोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. रौप्य महोत्सवी साजरा करत असताना हळदी–कुंकू, आजी–आजोबा मेळावा, बाल संस्कार मेळावे व सौ. सिंधूताई सपकाळ यांचे व्याख्यान अशा जबरदस्त कार्यक्रमाने रौप्य महोत्सवी वर्ष पार पडले. याच काळात 26 कपबुलबुलांनी राष्ट्रीय पुरस्कार 'सुवर्ण बाण' मिळवला. 04 डिसेंबर 2011 पासून श्री. अनिल गोविंद मराठे (पुणे) यांच्या योगदानातून या शाळेला राधा–गोविंद मराठे 'बालशाळा' या नावाने ओळखण्यास सुरूवात झाली.

### 4.3.20 सौ. रेखा राजाराम काळे, बालमंदिर, तासगांव

### स्थापना 01 जुलै 1983

तासगांव तालुक्यातील पहिली शाळा म्हणजे तासगाव हायस्कूल, तासगाव व या शाळेला जोडून प्राथमिक शिक्षण देण्याचे कार्य बालशाळा तासगांव या नावाने केले. 1954 साली या शाळेचे काम थांबले. रा. वा. काळे सर यांचे प्रयत्नाने पुन्हा या शाळेचे 1983 साली कामकाज सुरू झाले. रा. वा. काळे सरांच्या कुटूंबियांनी रू.1.51 लाखाची देणगी दिली. त्याबद्दल कृतज्ञता म्हणून तासगांवच्या बालक मंदिरास दि.01/06/2001 पासून सौ. रेखा राजाराम काळे यांचे नाव देण्यात आले. या वेळेस बालक मंदिरचे प्रभारी मुख्याध्यापक श्री. चंद्रकांत बेडगे, अधीक्षक रा. वा. काळे होते. अनेक गुणवान शिक्षक या बालमंदिरास लाभले. 2006–07 या शैक्षणिक वर्षात बालविहार तासगांव नवीन वर्ग सुरू केला तसेच शिस्त व संस्कार व देशभक्तीसाठी स्काऊट गाईड या योजनेतील वयोगट 3 ते 6 साठी असलेला बनीटमटोला गट ही सुरू केला. हा गट नियमित तासिकाद्वारे व स्वतंत्र युनिफॉर्म असणारा गट आहे. याचे कौतुक जिल्हा स्काऊट गाईड ऑफिसरने देखील घेतली होती. या गटाचे दरवर्षी शिबीर होते. 2007 साली आम्ही बालशक्ति या नावाने अंक प्रसिध्द करून 1000 विद्यार्थ्यांना तो मोफत दिला.[43] कारण शाळेतील कार्यक्रम, उपक्रमांची माहिती पालकांपर्यंत पोहोचावी म्हणून हा प्रयोग केला होता.

मुलासाठी मेजवानी, दीपपूजा, नागपंचमी, बैलपोळा, रक्षाबंधन, अशा सणसभारंभाचे कार्यक्रम केले जातात. बालदिन, गांधीजयंती, शिवाजी महाराज जन्मदिन, टपाल दिन अशा विविध दिनांनिमित्त माहिती देणारे कार्यक्रम वृक्षदिंडी, आषाढी एकादशी दिंडी, पर्यावरण जागृतीपर कार्यक्रम, बाहुला–बाहुलीचे लग्न समारंभ, हळदी–कुंकू, हादगा अशा कार्यक्रमांची रेलचेल असते.[44]

**मान्यवरांची भेट –**

गृहमंत्री आर. आर. पाटील (आबा), संजय काका पाटील, सामाजिक कार्यकर्त्या सौ. सिंधुताई सपकाळ इत्यादींच्याद्वारे पालक–बालक मेळावे ही आयोजित केले होते.

### 4.3.21 सौ. लिलाताई देशचौगुले, प्राथमिक विद्यामंदिर, विटे.

### स्थापना 20 जून 1985 (स्वातंत्र्योत्तर शाळा)

जून 1985 ला सांगली शिक्षण संस्थेच्या परवानगीने विनाअनुदानित तत्वावर श्री. अ. रा. वाकणकर यांच्याकडे या शाळेचे अधिक्षक पद दिले होते. माध्यमिक शाळांना पूरक अशी आदर्श प्राथमिक शाळा व बालवाडी असावी. या हेतूने या शाळेची स्थापना केलेली दिसते. या विचाराच्या पूर्तीसाठी तत्कालीन संचालक मा. डॉ. श्री. म. देशचौगुले यांनी बुध्दी, श्रम, पैसा खर्च करून शाळा स्थापन करण्याचा निश्चय करून या शाळेत 20 जून 1985 पासून 1 ली हा वर्ग भाड्याच्या इमारतीत भरवला होता. दि.24 ऑगस्ट 1987 रोजी शासन दरबारी नोंद झाली. 1 ली ते 4 थीच्या प्रत्येकी दोन तुकड्या सुरू करण्याचा अभिनव उपक्रम संस्थेने हाती घेतला. मा. डॉक्टरांनी एक लाख नव्वद हजार एक रू. आर्थिक मदत शाळेसाठी केली. या देणगीचा विचार करून संस्थेने या शाळेचे नामकरण ''सौ. लीलाताई देशचौगुले, प्राथमिक विद्यामंदिर'' असे केले.[45]

1987 साली संस्थेचे माजी संचालक मा. श्री. ज.बा.बर्वे यांनी उदारहस्ते 1000/– रूपये देणगी दिली आणि शिशुमंदिराचे मातोश्री कमलाबाई दादासो बर्वे शिशुमंदिर असे नामकरण करण्यात आले. नामकरण सोहळा दि. 20/02/1989 रोजी झाला. श्री. ना. व्यं. कानडे, सौ. लीलाताई देशचौगुले, प्राथमिक विद्यामंदिर, विटे या शाळेचे पर्यवेक्षक सांगतात. या शाळेचा ''गणेशोत्सव हा आकर्षणाचा विषय आहे. कारण या एका शिक्षिकेच्या शिट्टीच्या

तालावर लेझीम खेळणारी लहान चिमुकली पाहून पारंपारिक खेळाची जपणूक आणि शारिरीक विकास हा हेतू साध्य करण्याचा प्रयत्न लक्षात येतो. शाळेच्या स्काऊट, कब–बुलबुल पथकाला महाराष्ट्राचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली. राष्ट्रीय स्तरावरचा 'सुवर्णबाण' पुरस्कार प्राप्त झाला"[46] अनेक शालाबाह्य उपक्रमांमध्ये, परिक्षांमध्ये नाव उंचावण्याचा प्रयत्न येथील शिक्षक व गुणवान विद्यार्थी करताना दिसतात. श्री. प्री. दि. जोशी, शिक्षक, पटवर्धन हायस्कूल, सांगली हे पहिला टप्पा शताब्दिचा या लेखात मनोगत व्यक्त करतात की, सौ. लीलाताई देशचौगुले, प्राथमिक विद्यामंदिर, विटा या शाळांमध्ये बालविहार (नर्सरी) चे वर्ग सुरू करण्यात आले.

### 4.3.22 मातोश्री कमलाबाई दादासो बर्वे शिशुमंदिर, विटा.
### स्थापना 01 जुलै 1987 (स्वातंत्र्योत्तर शाळा)

प्राथमिक शिक्षणाचा टप्पा सुरू होण्यापूर्वी पाल्यावर संस्कार व्हावेत व त्यानां शाळेचे वळण लागावे, यादृष्टीने बालवाडीचे वर्ग सुरू करण्याची विनंती पालकांनी संस्थेला केल्याचे जाणवते व संस्थेने पालकांच्या विनंतीच्या आग्रहाचा विचार करून 01 जुलै 1987 रोजी महात्मा गांधी विद्यामंदिराच्या शाखा शाळेच्या वर्गात कामकाज सुरू झाले. श्री. स. तोरो, माजी अधीक्षक आपल्या मातोश्री कमलाबाई दादासाो बर्वे शिशुमंदिर विटाचे मनोगत व्यक्त करताना म्हणतात की, "विटे नगरीतील शिक्षणप्रेमी व संस्थेचे माजी विद्यार्थी श्री. जयंत वामन बर्वे यांनी रू.50,000/– ची देणगी देऊ केली. त्या उदार देणगीचा स्वीकार करून कृतज्ञता म्हणून मातोश्री कमलाबाई दादासो बर्वे शिशुमंदिर असे नामकरण केले"[47] या शाळेचे कामकाज सकाळी 08:30 ते 11:30 पर्यंत सुरू असते. बालवयापासून राष्ट्रभक्तीचे संस्कार करण्याचे प्रयत्न या शाळेचा दिसतो. "समाधानी पालक हीच आपली ठेव आहे," याची जाणीव ठेवून जबाबदारीने व काळजीपूर्वक कामकाज चालू असते. बालवयात आपल्या संस्कृतीची ओळख व्हावी व त्यांच्यावर चांगले संस्कार व्हावेत, या उद्देशाने गोकुळाष्टमी, दही हंडी, हादगा, गणेशोत्सव, रक्षाबंधन, गुढी पाडवा यासारखे सण साजरे केले जातात. सांस्कृतिक कायक्रमाबरोबर गीत गायन, कथाकथन, लंगडी, चेंडू फेक, संगीत खुर्ची इ. बौध्दिक व क्रीडा स्पर्धेचे आयोजन ही केले जाते. स्नेहसंमेलनाची तयारी दोन महिने अगोदर पासूनच सुरू असते. हा कार्यक्रम पाहण्यासाठी विट्यातील स्त्री–पुरूष पालकांची उपस्थिती लक्षणीय असते. बालचमूना आणखी चांगलं शिकता यावं म्हणून "पुणे येथील बालभवनच्या संचालिका श्रीमती शोभाताई भागवत यांच्या मार्गदर्शनाखाली शिबीर आयोजित करण्यात आले होते."[48] या शिबीराच्या आयोजनात सौ. सुनिता देशचौगुले व तुषार देशचौगुले या दाम्पत्याचा वाटा मोठा आहे.

### 4.3.23 कै. श्रीमती मोहिनी दत्तात्रय बर्वे, प्राथमिक शाळा व
### 4.3.24 सौ. कमल जोशी बाल मंदिर अभयनगर, सांगली.
### स्थापना 12 जून 1996 व 01 ऑगस्ट 1995

स्थापना 01 ऑगस्ट 1995 मध्ये इयत्ता पहिलीचा वर्ग सुरू झाला. 'पूर्वप्राथमिक शाळा' म्हणजे कै. सौ. कमल जोशी बाल मंदिर अभयनगर, सांगली ते पालकांच्या आग्रहाखातर संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक मंडळ व पदाधिका–यांच्या सहकार्यातून गुरू शिष्य परंपरेचा वारसा जपणारे असे बाल मंदिर सुरू झाले. सुरूवातीला लहान गट व मोठा गट असे वर्ग सुरू झाले. पालकांनी वाढीव वर्गाची मागणी केल्याने शासनाच्या मान्यतेने लहान गटाचे दोन व मोठया गटाचे दोन वर्ग असे दि.01 सप्टेंबर 2008 पासून सुरू करण्यात आले आहे. हे वर्ग सकाळी व दुपारी असे दुबार सत्रात भरतात. या शाळेला स्वतःची इमारत उभी राहण्यासाठी उदार मनाचे देणगीदार मा. कै. श्रीराम दत्तात्रय बर्वे यांनी साडेसात लाखाची देणगी इमारतीसाठी दिली आणि कै. श्रीमती मोहिनी दत्तात्रय बर्वे प्राथमिक

शाळा, कै. सौ. कमल जोशी, बाल मंदिर, अभयनगर, सांगली असे नामकरण झाले. दि.22 नोव्हेंबर 2004 रोजी पासून इयत्ता पहिली ते चौथी वर्ग सुरू झाले.[49]

### 4.3.25 डॉ. राजाभाऊ परचुरे शिशुमंदिर, तासगांव

### स्थापना 12 जून 1996

खेळातून शिक्षण आणि सोबतीला संस्करांची जोड लहान मुलांच्यात स्वच्छता, टापटीप, नीटनेटकेपणा या गुणांचा विकास करणे. बडबड गीते, गाणी, गोष्टी, श्लोक, प्रार्थना, पसायदान, पाठांतर याद्वारे स्मरणशक्ती वाढविण्याचे काम केले जाते.[50] श्री. चं. द. बेडगे आपल्या 'डॉ. राजाभाऊ परचुरे शिशुमंदिर' या लेखातील मनोगतात सांगतात की, ''नाविन्याचा ध्यास उपक्रमशील शाळा'' अशी या शिशुमंदिराची ओळख आहे.

कै. डॉ. राजाभाऊ परचुरे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ श्रीमती शैलजाताई परचुरे यांनी आर्थिकरूपी मदतीचा हात इमारत बांधकामासाठी दिला. त्यांच्या कृतज्ञतेपोटी 23 मार्च 2008 रोजी नामकरण करण्यात आले. 24 जुलै 2012 रोजी 'बालविहार' हा वर्ग जोडण्यात आला. सध्या बालविहार, लहान गट, मोठा गट असे तीन वर्ग असून 150 इतका बालचमू येथे बागडताना दिसतो.

### 4.3.26 बापुसाहेब रामचंद्र खवाटे हायस्कूल, अंकली.

### स्थापना 12 जून 1996, स्वातंत्र्योत्तर शाळा

कृष्णा नदीच्या काठी वसलेले मिरज तालुक्यातील शेतीने समृध्द असे अंकली गाव ! गाव लहानच तीन हजार लोकवस्ती असलेले सांगलीपासून सहा किमी. अंतरावर दक्षिण दिशेला कोल्हापूर रस्त्यानजीक हे गाव आहे. रेल्वे क्रॉसिंग पार करून गावात जावे लागते. पाण्याची मुबलकता असल्याने संपन्न शेती आहे. वीट भट्टीचा व्यवसाय ही इथे चालतो. सांगली शिक्षण संस्थेने प्रथमच जिल्ह्याबाहेर पाऊल टाकले आहे.

'भारत सरकारच्या राष्ट्रीय हरितसेना योजनेअंतर्गत उत्कृष्ट इको क्लब स्पर्धेत या हायस्कूलला तृतीय क्रमांक मिळाला[51] श्री. म. अ. पाठक आपल्या मनोगतात सांगतात की, ''व्यवहारज्ञान आणि बदलणा–या जगाचं गणित समजावून घेण्यासाठी ज्ञान संपन्नतेची गरज किती आहे हे कुठंतरी संस्थेच्या व काही अंकलीतील माजी विद्यार्थ्यांच्या लक्षात आलं आणि त्यातून या शाळेची स्थापना झाली.'' अविनाश पाटील यांच्या जुन्या वाडयात दि.12 जून 1996 रोजी श्री. गुंडाप्पा कांते व श्री. बापूसाहेब खवाटे या मान्यवरांच्या हस्ते पार पडला. सुरूवातीला या शाळेचे नाव नूतन विद्यामंदिर असे ठेवण्यात आले होते. परंतु या शाळेचे श्री. बापूसाहेब रामचंद्र खवाटे यांनी संस्थेला उदार हस्ते सात लाख रूपयांची देणगी दिल्यामुळे त्यांचे नाव देण्यात आले.

सांगली शिक्षण संस्थेसारख्या उपक्रमशील व सदैव अग्रेसर असणा–या संस्थेने गुरूकुल पद्धतीच्या धर्तीवर बा. रा. खवाटे हायस्कूल अंकलीमध्ये विशेष मार्गदर्शन वर्ग सुरू केला आहे. सन 2007–2008 या शैक्षणिक वर्षापासून या वर्गांचे कार्य सुरू आहे. विशेष मार्गदर्शन वर्ग प्रमुख श्री. विजय जंगम ''सांगली शिक्षण संस्थेचा अभिनव उपक्रम' या लेखात सांगतात की, ''या शाळेतील विद्यार्थी तबला–वादन, हार्मोनियम वादन शिकता शिकता तालासुरात, राट्रगीत देशभक्तीपर गीते, स्फूर्तीगीते गाण्याचे धडे गिरवत आहेत.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी तज्ञ शिक्षकांची नेमणूक केली आहे.''[52]

### 4.3.27 श्री. वा. गोखले, प्राथमिक शाळा दत्तनगर.

### स्थापना 12 जून 1996 ,स्वातंत्र्योत्तर स्थापना

स्थापना – 12 जून 1996, बालसंस्कार शिक्षण व गरज जाणून परिसरातील नागरिकांच्या बोलण्यातून व्यक्त झाले व त्यातून या शाळेची स्थापना झाली. या शाळेतून बालसंस्कार केंद्रातून गोकुळाष्टमी, रक्षाबंधन, सरस्वतीपूजन, हळदीकुंकू समारंभ, क्रीडा स्पर्धा, बौध्दिक स्पर्धा, शैक्षणिक सहली, वार्षिक स्नेहसंमेलन, माता–पालक मेळावे असे विविध कार्यक्रम या शाळेत होतात.

### 4.3.28 गुरूवर्य दादोजी कोंडदेव सैनिक शाळा, तासगांव .

### स्थापना 10 जुलै 1997 स्वातंत्र्योत्तर स्थापना

सांगली जिल्हयाची सैनिक शाळा,ही ओळख सांगली शिक्षण संस्थेला मिळाली. (मुलाखत श्री. मुकुंद चिंतामणी जोग)[53] स्वतंत्र भारताचे लष्करी सामर्थ्य अधिक बलशाली व्हावे, अधिकाधिक तरूण सैन्यात जावेत म्हणून कॅप्टन मधुकर आपटे आणि मेजर आनंदराव गेळेची अनेक व्याख्याने संस्थेच्या विविध शाळांत आयोजित केली होती. याच विचारधनाचे मूर्तरूप म्हणजे आजची तासगांव येथील सैनिकी शाळा आहे. पटवर्धन हायस्कूल व पुरोहित कन्याप्रशाला व बी. एड. कॉलेजच्या सहकार्याने सैनिक शाळेची सुरूवात झाली. सुरूवातीस सांगली या ठिकाणी सैनिक शाळा होती. त्यानंतर स्वतःच्या मालकीच्या जागेमध्ये या शाळेला तासगावला स्थलांतर केले.

राज्यात भाजप–सेना युतीच्या शासन काळात प्रत्येक जिल्ह्यास एक सैनिक शाळा देण्याचा निर्णय झाला होता. सांगली शिक्षण संस्थेने ही शाळा मिळावी हा हेतू मनात ठेवून शासनाकडे मागणी केल्याचे दिसते. त्यावेळचे सांगली जिल्ह्याचे जिल्हाधिकारी श्री. नितिन करीर यांनी शासनाची जागा 27 एकर 30 गुंठे होती. पण या आष्टेच्या जागेत अडचणी असल्याचे लक्षात आल्याने संस्थेची तासगांवला 30 एकराची जागा होती ती जागा सैनिक शाळेचा प्रकल्प सुरू करण्यासाठी दिली. संस्थेच्या शाळांची उद्दिष्टे उत्तम नागरिक बनवणे, सौनिक शाळेतून चांगले नागरिक, चांगले सैनिक व सैन्यातील चांगले अधिकारी बनवणे व देशाच्या संरक्षणाची जबाबदारी घेऊन नाव उंचावण्याचे काम ही शाळा व संस्था करत आहे.

सांगली शिक्षण संस्थेचे माजी कार्यवाह श्री. अरविंद माधव परचुरे व श्रीमती सु. दि. लेले यांची संस्था शताब्दि महोत्सवी वर्षानिमित्त श्री. उत्तम द. पोतदार व बी. एड. कॉलेजच्या प्राध्यापिका डॉ. नीला पाथरे यांनी प्रकट मुलाखत घेतली. त्या मुलाखतीत श्री. पोतदार सर म्हणतात की, सैनिक शाळेला ''गुरूवर्य दादोजी कोंडदेव'' यांचे नाव देण्यामागे कोणता हेतू होता? शिक्षण संचालक श्री. पाटील यांनी संस्थेच्या सर्व कार्यवाहांना बोलावून कोणत्या विचाराने शाळा चालवायची तसेच शाळेचे नाव कोणते असावे याबद्दल 15 ते 20 दिवसात नावे द्यावेत यावर संस्थेने विचारमंथनातून सैनिक शाळेचे 'गुरूवर्य दादोजी कोंडदेव सैनिक शाळा' हे नाव निश्चित करण्यात आले.[54]

समाजाला शिवाजी महाराजांसारखी व्यक्तिमत्व असणारे नागरिक पाहिजेत आणि शिवाजी घडविण्यासाठी दादोजीसारखे गुरू पाहिजेत म्हणून शिवरायासारखा विद्यार्थी घडविण्यासाठी सैनिक शाळा पाहिजे व हे नाव संस्थेच्या उद्दिष्टानुसार असल्याचे दिसते. तासगांव हाय. तासगांव या शाळेला 60 वर्षे पूर्ण झाल्यामुळे शाळेचा हीरक महोत्सवाचे निमित्ताने तासगांव हायस्कूलचे नामवंत माजी विद्यार्थी व धडाडीचे व्यापारी श्री. रसिकभाई वाडीलाल शहा, कोल्हापूर यांनी दोन लक्ष रूपयांची देणगी दिली. ही देणगी प्रत्यक्ष संस्थेने तासगांव हायस्कूलला '''चंपाबेन वाडीलाल ज्ञानमंदिर तासगांव'' असे नाव दिले. दि.23, 24, 25, 26 जानेवारी 1981 चार दिवस हीरक महोत्सव कार्यक्रम झाला.

## 4.3.29 उद्योगरत्न धनी वेलणकर पूर्व प्राथमिक शाळा, माधवनगर

## 4.3.30 श्री. गजानन मिल्स शताब्दि विद्यालय, माधवनगर

### स्थापना 24 जुलै 2002 व 12 जून 2003 , स्वातंत्र्योत्तर शाळा

स्थापना इ. स.2000 ते 2001 च्या दरम्यान सांगलीचे उपनगर म्हणून ओळखले जाणारे माधवनगर ! श्री. शि. वा. गोसावी सर आपल्या मनोगतात सांगतात की, 'माधवनगर येथील सन्माननीय नागरिक, पालक, उद्योजक यांनी असा आग्रह केला की, माध्यमिक शाळेला जोडूनच एक प्राथमिक आणि पूर्वप्राथमिक शाळा असावी'[55] आणि गुरूपौर्णिमेचा मुहूर्त साधून 24 जुलै 2002 रोजी स्थापना झाली. सोळा विद्यार्थ्यांच्या संख्येवर लहान गट व मोठा गट असे दोन वर्ग सुरू झाले. हळुहळु प्राथमिक शाळाही काढण्याचे ठरले आणि दि.09 मार्च 2006 रोजी कायम विनाअनुदानित तत्वावर नोंद झाली. 2009 साली वेलणकर यांचे कुटूंबिय श्री. रामसाहेब वेलणकर यांनी उदार हस्ते देणगी देऊ केली आणि त्यांच्याच इच्छेने ''उद्योगरत्न धनी वेलणकर पूर्व प्राथमिक शाळा आणि श्री गजानन मिल्स शताब्दि विद्यालय, माधवनगर'' असे नामकरण केले. या शाळेमध्ये बुधगाव, कवलापूर, माधवनगर, सांगली येथील मुले शिकण्यासाठी येतात. 2011 मध्ये कायम विनाअनुदानित तत्वातील 'कायम' हा शब्द शासनाने वगळला. शासनाकडून मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन झाले.

## 4.3.31 सौ. सुंदरबाई शंकरलाल मालू इंग्लिश मिडीयम स्कूल, हरीपूर.

### स्थापना 17 मार्च 2003, 12 जून 2005, जून 2009 ,स्वातंत्र्योत्तर शाळा

स्थापना 17 जून 2003 रोजी सांगली नगरीच्या गावभागातील सिटी हायस्कूलच्या ड्रॉईंग हॉलमध्ये झाला. श्री. दि. क. कुलकर्णी, शिक्षक, सिटी हायस्कूल, सांगली मनोगत व्यक्त करताना सांगतात की, सांगलीमधील निष्णात स्त्रीरोग व प्रसुतीतज्ज्ञ डॉ. सौ. शोभाताई काळे या सांगली शिक्षण संस्थेच्या संचालक मंडळावर 1997 साली सदस्य म्हणून आल्या.

मराठी माध्यमाच्या शिक्षणामध्ये नावाजल्या जाणा–या संस्थेची एखादी इंग्रजी माध्यमाची शाळा असणे कालसुसंगत होईल असा त्यांचा आग्रह होता.[56]फेब्रुवारी 2003 मध्ये अध्यक्ष श्री. घारपुरे सरांनी आपले विचार पत्रकार परिषदेत बोलून दाखविले की, माजी विद्यार्थ्यांच्या आग्रहातून संस्थेची पहिली इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू केली आहे. सांगलीतील प्रथितयश हळद व्यापारी श्री. सतिश मालू यांनी सन 2009 मध्ये रू. पंचवीस लाखाची देणगी सुपूर्त केली आणि कृतज्ञता म्हणून सौ. सुंदरबाई शंकरलाल मालू इंग्लिश मिडीयम स्कूल, हरीपूर असे नामकरण करण्यात आले.

## 4.3.32 सौ. छाया नेमिचंद मालू प्रि. प्रायमरी इंग्लिश स्कूल, माधवनगर.

## 4.3.33 शेठ मूळचंद गोपीलाल मालू इंग्लिश स्कूल, माधवनगर माधवनगर मधील इंग्रजी शाळा.

### स्थापना 14 जून 2010

सन 2007–08 पासून माधवनगर येथील अनेक प्रतिष्ठित नागरिक, उद्योजक, जाणकार, तज्ज्ञमंडळी, माजी विद्यार्थी, पालक यांनी इंग्रजी माध्यमातील शिक्षण केंद्र सुरू करावे असा आग्रह धरला होता.[57] अखेरीस 2009 साली कायम विनाअनुदान तत्वावर इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू करण्याचा प्रस्ताव शासनाने मंजूर केला. 14 जून 2010 रोजी इयत्ता 1 ली नर्सरी, के. जी 1 व के. जी. 2 अशा चार वर्गासोबत 'न्यू इंग्लिश स्कूल' अशा नावाने

ही शाळा सुरू झाली. 2012 साली माधवनगरातील प्रसिध्द व यशस्वी उद्योजक मा. नेमिचंदशेठ मालू व मा. सतिश मालू यांच्या कुटूंबियांकडून 25 लाखाची भरघोस देणगी मिळाली.

याचे स्मरण म्हणून या शाळेचे मुख्याध्यापक सांगतात की, ''न्यू इंग्लिश स्कूल हे नाव बदलून सौ. छाया नेमिचंद मालू प्रि. प्रायमरी इंग्लिश स्कूल आणि शेठ मूलचंद गोपीलाल मालू इंग्लिश स्कूल असे केले.''

### 4.3.34 सेकंड होम इंग्लिश मिडीयम स्कूल पुणे शाखा.

### स्थापना 11 एप्रिल 2014

सिटी हायस्कूलचे माजी विद्यार्थी प्रसाद श्रीकृष्ण वनपाल हे उतारवयात पुणे येथे 'सर्वोदय शिक्षण संस्था' चालवित होते. या संस्थेमार्फत 'सेकंड होम इंग्लिश मिडीयम स्कूल' या नावाची शाळा चालवली जात होती.[58] या शाळेत पहिली ते पाचवीच्या प्रत्येकी दोन तुकड्या व सहावी ते दहावीची प्रत्येकी एक तुकडी आणि एकूण विद्यार्थी संख्या 616 होती. शाळा शासनमान्य पण विनाअनुदानित होती.

श्री. वनपाल हे वैयक्तिक कारणास्तव अमेरिकेत कायमस्वरूपी वास्तव्याला गेल्याने त्यांनी दि. 15/09/2013 ला सांगली शिक्षण संस्थेला पत्र पाठवून या शाळेचे व्यवस्थापन बघावे असे सुचविले होते. त्यानुसार 2.5 कोटी इतका खर्च करून ही शाखा संस्थेच्या ताब्यात आली.

### 4.3.35 कॉलेज ऑफ एज्युकेशन, (बी. एड. कॉलेज) सांगली.

### स्थापना जून 1961

पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक शिक्षण क्षेत्रात 46 वर्षे सांगली जिल्ह्यात मोलाची सेवा केल्यानंतर सांगली शिक्षण संस्थने उच्च शिक्षण क्षेत्रात पदार्पण करावयाचे ठरविले या भागातील पदवीधर शिक्षकांच्या प्रशिक्षणाच्या गरजा लक्षात घेऊन सांगली येथे जून 1961 मध्ये कॉलेज ऑफ एज्युकेशन, (बी. एड. कॉलेज) हे येथील राजवाड्यातील पागा चौकात सुरू करण्यात आले.[59]

पुणे विद्यापीठाची मान्यता मिळून कॉलेजचे काम प्राचार्य ग. श्री. देशपांडे (कोल्हापूरच्या बी. टी. कॉलेजमधील सेवानिवृत्त प्राध्यापक) यांच्या अनुभवी मार्गदर्शनाखाली उत्साहाने व सुसूत्रपणे सुरू झाले. प्रा. भावे, प्रा. काळे, प्रा. परांजपे, प्रा. ठाणेदार, प्रा. वा. आ. कुलकर्णी हे कॉलेजच्या सुरूवातीपासून स्टाफ सभासद होते. कॉलेजसाठी त्यांनी अविरत काम केले. जून 1964 पासून प्राचार्य ना. वा. भावे यांच्या कुशल व समर्थ मार्गदर्शनाखाली कॉलेजची झपाट्याने सर्वांगीण प्रगती झाली. विस्ताराबरोबर गुणवत्ता ही वाढीस लागली आहे.

बी. एड्. वर्गाबरोबर टी. डी. व एम. एड्. हे वर्ग ही सुरू झाले. कु. सुशिला लेले (1967) श्री. दिलीप देशपांडे (1968) कु. सुधा दळवी (1969) यांनी शिवाजी विद्यापीठात बी. एड. परिक्षेत प्रथम श्रेणीत प्रथम क्रमांक मिळवून उज्ज्वल परंपरा निर्माण केली. इंग्रजी, मराठी, हिंदी वक्तृत्व स्पर्धातही शिवाजी विद्यापीठातील व इतर अनेक बक्षिसे या कॉलेजने मिळविली आहेत. 1972 साली दिलीप देशपांडे व मधुकर परब यांनी एम. एड. परिक्षेत पहिला वर्ग मिळवला. वैयक्तिक परिसंवाद, शिबिरे, मूल्यामापन कृतिसत्रे, प्रकल्प व्याख्याने इत्यादी विविध तंत्राचा उपयोग करून कॉलेजमधील अध्यापन अद्यावत ठेवण्यासाठी कॉलेजमधील प्राध्यापक प्रयत्नशील असतात.

दि.11 जानेवारी 1970 रोजी कॉलेजच्या नवीन इमारतीचे उद्घाटन नामदार यशवंतरावजी चव्हाण, गृहमंत्री भारत सरकार यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. प्राचार्य भावे यांच्या कारकिर्दीत (1964–1974) महाराष्ट्र शासनाच्या सहाय्याने 'विस्तार सेवा केंद्र' सुरू झाले.[60] विद्यापीठ अनुदान मंडळाने मानसशास्त्र–प्रयोगशाळा, ग्रंथालय,

उद्योगशाळा, दृकश्राव्य शिक्षण विभाग, समुध्द करण्यासाठी खास अनुदान दिले. कॉलेजने आजपर्यंत या विभागात एक उत्तम शैक्षणिक संशोधन केंद्र निर्माण केले आहे.

## सांगली शिक्षण संस्था सेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादित, सांगली.

सांगली शिक्षण संस्थेच्या सेवकांची एक स्वतंत्र सहकारी पतसंस्था असावी या विचाराने सांगली शिक्षण संस्थेच्या सेवकांची पतसंस्था नोव्हेंबर 1988 ला स्थापनेचा विचार झाला व 1989 ला त्याला मूर्त रूप प्राप्त झाले. सुरूवातीला पतसंस्थेत एकूण 157 सभासद होते. आज ही संख्या 403 इतकी आहे.

पतसंस्थेविषयी श्री. श. स. देशपांडे, कार्यवाह, सांगली शिक्षण संस्था आपल्या लेखात सांगतात की, पतसंस्थेच्या सभासदांच्या पाल्यासाठी सभासद मुले उत्तेजनार्थ बक्षीस योजना सन 1997 पासून सुरू करण्यात आली. पतसंस्थेचे सभासद नोकरीमध्ये असताना मयत झाल्यास त्यांच्या वारसास 5 लाख 40 हजार पर्यंत सुरक्षा फंडातून मदत करण्याचा प्रयत्न असतो. सन 2013–14 हे वर्ष पतसंस्थेचे रौप्यमहोत्सवी वर्ष म्हणून साजरे झाले त्या निमित्ताने[61]

1. सांगली शिक्षण संस्थेच्या सर्व सेवकांना सभासद करून घेणे.
2. पतसंस्थेचे कामकाज संपूर्ण संगणकीकरण करणे.
3. सभासदांना शैक्षणिक, आर्थिक व कौटुंबिक सोयी, सुविधा देणे.
4. पतसंस्थेची वेबसाईट तयार करणे – वेबसाईट असलेली महाराष्ट्रातील सांगली शिक्षण सेवकांची ही पहिली पतसंस्था आहे.

थोडक्यात पतसंस्थेवर सभासदांचा दृढ विश्वास व संस्था वृध्दिंगत झाल्याचे हे लक्षण दिसते.

## संदर्भ साधने

1. वसंत आपटे, संकलक व लेखक – सांगली शिक्षण संस्था, सिटी हायस्कूल 1914 ते 2014 इतिहास, प्रकाशक – नितिन खाडिलकर, अध्यक्ष सांगली शिक्षण संस्था पृष्ठ क्र.. 540

2. श्री. अ. इ. कडलास्कर, माजी शिक्षक, सिटी हायस्कूलचे मनोगत या लेखात, शतपदी, 1914–1923, खंड 1पृष्ठ क्र.. 31

3. वसंत आपटे, संकलक व लेखक उपरनिर्दिष्ट पृष्ठ क्र.. 25/9

4. वसंत आपटे, संकलक व लेखक उपरनिर्दिष्ट पृष्ठ क्र... 50

5 श्री.नितिन जोशी, शिक्षक, चंपाबेन वाडीलाल, ज्ञानमंदिर, तासगांव, 'असे रूजले बीज' या लेखात शतपदी–1914–1923, खंड–1, पृष्ठ क्र.. .17

6. कित्ता पृष्ठ क्र.. 18

7. कित्ता पृष्ठ क्र.. 19

8. कित्ता पृष्ठ क्र... 23

9. कित्ता

10. श्री. डॉ. श्रीपाद जोशी कार्यवाह 'शिक्षणाचा मानदंड', सांगली शिक्षण संस्था या लेखात, शतपदी 2004–2013, खंड–10, पृष्ठ क्र 49

11. श्री. नितिन जोशी, शिक्षक, उपरनिर्दिष्ट, पृष्ठ क्र.. .23 ते 29

12. कित्ता पृष्ठ क्र.. 61

13. वसंत आपटे, संकलक, उपरनिर्दिष्ट पृष्ठ क्र.. 149, 150

14. श्री. मु. चि. जोग, शिक्षक, चं. वा. ज्ञानमंदिर, तासगांव, तासगांव हायस्कूलचे मनोगत, या लेखात, शतपदी, 1914–1923, खंड–1 पृष्ठ क्र.. 37, 46

15. श्री. गिरीश जोशी, शिक्षक बापट बालमंदिर शिक्षण मंदिर, सांगली डॉ. बापट बाल शिक्षण मंदिराचे मनोगत', या लेखात शतपदी 1924–1933,खंड–3, पृष्ठ क्र.. 9 ते 14

16. सौ. मनिषा किंकर, शिक्षक कै. ग. रा. पुरोहित, कन्या प्रशाला, सांगली
10 वर्षाचा आढावा, भक्कम पाया, स्थिर इमारत या लेखात शतपदी 1934–43, खंड–3, पृष्ठ क्र.. 5

17. श्री. स. तोरो, माजी शिक्षक, 'महात्मा गांधी विद्यामंदिरचे मनोगत' या लेखात शतपदी 1934–1943, खंड–3, पृष्ठ क्र. 17

18. कित्ता पृष्ठ क्र.. 19

19. श्री. पोपट शिरतोडे सर, माजी मुख्याध्यापक, महात्मा गांधी विद्यामंदिर विटा यांच्या चर्चेतून

20. श्री. अरविंद महादेव गोसावी, माजी शिक्षक, बुधगाव हायस्कूल मनोगत या लेखात, शतपदी 1944–1953,खंड–4, पृष्ठ क्र. 12

21. कित्ता पृष्ठ क्र. 13

22. कित्ता पृष्ठ क्र. 12

23. श्री. भ. रा. नाईक, माजी मुख्याध्यापक, 'माधवनगर हायस्कूल' या लेखात शतपदी, 1944–1953, खंड–4, पृष्ठ क्र. 15

24. कित्ता पृष्ठ क्र. 16

25. सौ. निला राजाराम लिमये, माजी शिक्षिका, 'सरला बापट शिशुविकास मंदिर' या लेखात शतपदी 1954–1963, खंड–5, पृष्ठ क्र.. 37 ते 46

26. श्री. उत्तम द. पोतदार, शिक्षक, पटवर्धन हायस्कूल, सांगली, शतपदी 1954–63, खंड–5, पृष्ठ क्र.. 13, 14

27. कित्ता पृष्ठ क्र.. 15 ते 24

28. श्री. अ. तु. पितांबरे, माजी मुख्याध्यापक 'शहा विद्यामंदिर लेंगरे' या लेखात शतपदी 1954–1963, खंड–5,पृष्ठ क्र.. 25 ते 28

29. श्री. संजय ज्ञा. पवार, 'माजी विद्यार्थी मज आठवण येते.....'. या लेखात, शतपदी 1983, खंड–7,पृष्ठ क्र. 84

30.संतोष शंकर जोशी, माजी शिक्षक, पटवर्धन कन्याप्रशाला तासगांव या लेखात शतपदी 1954–1963, प्रकाशक–कार्यवाह सांगली शिक्षण संस्था खंड–5 पृष्ठ क्रकृ33ं

31.कित्ता पृष्ठ क्र.. 34

32.डॉ. प्रा. सौ. रेखा टोपकर, प्राचार्य श्रीमती पुतळाबेन शाळ कॉलेज ऑफ एज्युकेशन सांगली, शतपदी 1954–1963, प्रकाशक–कार्यवाह, सांगली शिक्षण संस्था खंड–5 पृष्ठ क्र.. 29 ते 32

33. सौ. रेखा विनायक साठे, माजी शिक्षिका, शतपदी 1964–1973, प्रकाशक–कार्यवाह, खंड–6, पृष्ठ क्र.. 29 ते 30

34. किता'पृष्ठ क्र.29 ते 30

35. श्री. ग. स. जोशी, मालू हायस्कूल सांगलीचे मनोगत, शतपदी 1964–73, प्रकाशक–कार्यवाह सांगली शिक्षण संस्था खंड–6 पृष्ठ क्र.. 13 ते 16

36.श्री. गजानन जोशी, शिक्षक, भिडे कन्याप्रशाला, विटे, शतपदी 1964–73 प्रकाशक–कार्यवाह सांगली शिक्षण संस्था खंड–6 पृष्ठ क्र.. 23 ते 28

37. ऐश्वर्या –ह. ऐवळे, विद्यार्थिनी, सौ. इंदिराबाई भिडे, कन्या प्रशाला विटा तुषार सन 2016–17, सांगली शिक्षण संस्था प्रकाश–कार्यवाह, सांगली शिक्षण संस्था पृष्ठ क्र.. 57, 58

38. सौ.मनिष विद्याधर बर्वे,माजी पर्यवेक्षिका, शतपदी 1964–73 प्रकाशक–कार्यवाह,खंड–6 पृष्ठ क्र.. 17, 18, 19

39. कित्ता पृष्ठ क्र.. 20, 21, 22

40. श्री. बा. अ. हसबनीस, माजी मुख्याध्यापक शतपदी 1974–1983, प्रकाशक–कार्यवाह, सांगली शिक्षण संस्था खंड–7 पृष्ठ क्र.. 25 ते 28

41. श्री. कि. ग. शितोळे, माजी शिक्षक, शतपदी 1974–1983, खंड–7 पृष्ठ क्र.. 19 ते 23

42. कित्ता पृष्ठ क्र.. 21

43. श्री. मुकुंद चिंतामणी जोग, शिक्षक, चंपाबेन वा.ज्ञानमंदिर,तासगांव शतपदी 1974–1983 प्रकाशक–कार्यवाह सांगली शिक्षण संस्था खंड–7 पृष्ठ क्र.. 15 ते 18

44. श्री. चं. द. बेडगे, शिक्षक, मालू हायस्कुल, सांगली, शतपदी 1994–2003, प्रकाशक–कार्यवाह सांगली शिक्षण संस्था खंड–9 पृष्ठ क्र.. 17 ते 18

45. श्री. ना. व्यं. कानडे, माजी पर्यवेक्षक, शतपदी 1984–1993, प्रकाशक–कार्यवाह सांगली शिक्षण संस्था खंड–8 पृष्ठ क्र.. 9

46. कित्ता पृष्ठ क्र.. 12

47. श्री. स. तोरो, शिक्षक, महात्मा गांधी विद्यामंदिर, विटे, शतपदी 1984–93 प्रकाशक–कार्यवाह सांगली शिक्षण संस्था खंड–8पृष्ठ क्र.. 13

48. कित्ता पृष्ठ क्र.. 14, 15

49. श्री. भा. गो. घाडगे, उपमुख्याध्यापक,पुरोहित कन्याशाळा, सांगली शतपदी, 1994–2003, प्रकाशक–कार्यवाह सांगली शिक्षण संस्था खंड–9 पृष्ठ क्र.. 25 ते 28

50. श्री. चं. द. बेडगे, शिक्षक, उपरनिर्दिष्ट पृष्ठ क्र.. 13 ते 16

51.श्री. म. अ. पाठक, शिक्षक, बा. रा. खवाटे हायस्कूल, अंकली, शतपदी 1994–2003, प्रकाशक–कार्यवाह, सांगली शिक्षण संस्था खंड–9 पृष्ठ क्र.. 19

52 .श्री. विजय जंगम, तुषार, सन 2016–17 सांगली शिक्षण संस्था प्रकाशक–कार्यवाह,सांगली शिक्षण संस्था खंड–9 पृष्ठ क्र. 71

53. श्री. विवेकानंद पाटील, शिक्षक, गुरूवर्य दादोजी कोंडदेव सैनिक शाळा, तासगांव शतपदी 1994–2003, प्रकाशक–कार्यवाह, सांगली शिक्षण संस्था खंड–9 पृष्ठ क्र.. .12

54. कित्ता पृष्ठ क्र.. 11

55 .श्री. शि. वा. गोसावी, मुख्याध्यापक, बा. रा. खवाटे, हायस्कूल, अंकाली शतपदी 1994–2003, प्रकाशक–कार्यवाह, सांगली शिक्षण संस्था खंड–9 पृष्ठ क्र.. 29, 30

56. श्री. दि. क. कुलकर्णी, शिक्षक, सिटी हायस्कूल, सांगली शतपदी 1994–2003, प्रकाशक–कार्यवाह, सांगली शिक्षण संस्था खंड–9 पृष्ठ क्र.. 31, 32

57. श्री. शि. वा. गोसावी, मुख्याध्यापक उपरनिर्दिष्ट पृष्ठ क्र.. 11, 12

58. वसंत आपटे, संकलक व लेखक, उपरनिर्दिष्ट पृष्ठ क्र.. 512

59. क. श्री. काळे, प्राचार्य, हीरक महोत्सवी स्मरणिका, डिसेंबर 1974 पृष्ठ क्र.. 93

60. कित्ता पृष्ठ क्र.. 94

61. श्री. श. स. देशपांडे, सांगली शिक्षण संस्था, सांगली 2013–14 30प पृष्ठ क्र. 117

## 4.4 सांगली शिक्षण संस्थेचे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक, सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान

शिक्षक हा प्रगतीशील समाजाचा घटक आहे. समाजाला प्रगतीकडे नेण्यासाठी येणा–या पिढ्यांना घडविण्याचे काम करावे लागते. सांगली शिक्षण संस्थेने यामध्ये आघाडी घेतलेली दिसते. विद्यार्थ्यांच्यावरती राजकीय, सामाजिक, आर्थिकतेची जाणिव जागृती करण्याचे काम संस्था करत आहे. मूळातच राष्ट्रप्रेमाने भारावलेल्या लोकांनी ही संस्था स्थापन केल्याने शिक्षकांनी अभ्यासक्रमाबरोबर सामाजिक बांधिलकी जपलेली आहे हे काही पुढील घटनांच्यावरून लक्षात येते.

### 4.4.1 सामाजिक योगदान

#### रक्तदान शिबीराचे आयोजन

संस्था, वर्धापन दिनाचे औचित्य साधून संस्थेमध्ये कार्यरत असणा–या संचालक मंडळ, मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, समन्वयक, माजी विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्याबरोबरच त्या त्या गावातील पालक वर्गांनाही 'रक्तदान' करण्यासंदर्भात आव्हान केले जाते. ज्या शाळा, रौप्य, हिरक, अमृत सुवर्ण महोत्सवी पूर्ण केले आहे. त्यासर्व शाळांनी रक्तदान शिबीराचे आयोजन केले आहे. 'सांगलीच्या सिव्हिल हॉस्पिटल' च्या मदतीने हा कार्यक्रम पार पाडला जातो.

#### माजी विद्यार्थी संघटना उपक्रम

शाळेत असताना विद्यार्थ्यांच्या वेगवेगळया तुकड्या असतात आणि तुकड्यांवरून भरपूर भांडणे चालतात. आपली तुकडी हा प्रेस्टीजचा विषय असतो. त्यावेळी हिरीरीने भांडणारे आता मात्र उत्साहाने आपल्या मित्रांची कधी भेट होते या आतुरतेमध्ये वाट बघत असतात. वाढतं वय माणसाला शिकवतं आणि अनुभव जीवन समृध्द करतो. याचा प्रत्यय या कामात दिसतो. प्रत्यक्ष भेटीगाठी, पत्ते शोधणे, संपर्क करणे, मुलींचे माहेर–सासरचे पत्ते शोधणे, मोबाईल नंबर शोधणे इ. शोधाच्या पाठीमागची कल्पना सिटी हायस्कूलची, संस्थेच्या 21 व्या वाढदिवस समारंभात 1935 साली माजी विद्यार्थी एकत्र आले होते.माजी विद्यार्थ्यांच्या एकत्रीकरणासाठी त्यांच्याकडून शाळेला योग्य ते सहकार्य व निधी जमवण्यासाठी, 'माजी विद्यार्थी संघ' स्थापन करण्याबाबत निर्णय झाला. आजपर्यंत शाळेतून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांची माहिती काढणे त्यांचे सध्याचे वास्तव्य स्थान शोधून संपर्क करणे हे माजी विद्यार्थ्यांच्या एकत्रीकरणातील शाळेची ओढ ही दिसते. ना. ग. गाडगीळ व दि. र. निरगुंदीकर यांनी दि.19/12/1938 रोजी छोटेसे निवेदन माजी विद्यार्थ्यांना उद्देशून केले होते. (शाळेशी सहकार्य व हितसंबंध वाढवावे, शाळेच्या विविध प्रकरच्या चळवळी व कार्यक्रमात त्यांना भाग घेता यावा व संस्थेच्या लौकिकात शक्य ती भर घालता यावी या हेतूने माजी विद्यार्थ्यांची समिती स्थापन केली आहे[1] याच धर्तीवर आज सांगली शिक्षण संस्थेच्या सर्वच शाळातून दहावी, बारावी पास होऊन बाहेर पडणा–या विद्यार्थ्यांशी संपर्क ठेवण्याचे काम सुरू आहे.

त्याचबरोबर 'सिटी हायस्कूलचे नामवंत माजी विद्यार्थी डॉ. वामन श्रीपाद दिवाण हे अमेरिकेत वास्तव्य करतात. त्यांनी परदेशातील माजी विद्यार्थ्यांशी संपर्क साधण्याची जबाबदारी घेऊन सात व्यक्तिंची, अमेरिकेतील स्थानिक भारतीयांची एक समिती स्थापन केली व त्यास संस्थेने मान्यताही दिलेली आहे[2] कोणत्याही शाळेचे माजी विद्यार्थी ही त्या शाळेची शान असते. त्या शाळेचे आधारस्तंभ असतात. शाळेशी असलेले भावनिक नाते यामुळे दृढ करता येते.

## आर्थिक योगदान –

1. सप्टेंबर 1993 मध्ये अनंत चतुर्दशीला लातूर भागात भूकंपाचा मोठा धक्का बसला होता. प्राणहानी व मोठीच वित्तहानी झाली. त्यास भूकंपग्रस्तांसाठी निधी म्हणून शिक्षकांनी दोन दिवसाच्या पगाराची रक्कम दिली होती.[3] संस्थेमध्ये सर्वच कर्मचा–यांना एका कुटूंबपद्धतीने वागविले जाते, त्यांच्या अडचणीच्यावेळी संस्थेने मदत केलेली दिसते.
2. बुधगाव हायस्कूलमधील एक सहाय्यक शिक्षिका गंभीर दुखण्याने आजारी होत्या. त्याच्या शल्यक्रियेसाठी मोठा खर्च असल्यामुळे सर्व शाळातून निधी गोळा करून देण्यात आले होते.
3. विद्यार्थ्यांना राष्ट्रीय प्रश्नाविषयी, देशाच्या जवानांविषयी आत्मीयता कळावी. देशाच्या संरक्षणाविषयी सजग व कृतिशील व्हावे या उद्देशाने सन 1998–99 या वर्षात कारगिल प्रदेशात जे युध्द झाले होते त्याला मदत म्हणून संचालक मंडळ व विद्यार्थ्यांच्या मदतीने निधी संकलीत करून जिल्हाधिका–याकडे सुपुर्द केले होते.
4. जागतिक बॅंकेच्या अर्थसाहाय्याने जलविज्ञान प्रकल्पांतर्गत सांगली जिल्ह्यात विविध अंगानी भुजलाचे शास्त्रीय अध्ययन करण्यासाठी बावीस ठिकाणी पिझोमीटर उभी करण्याची योजना होती. पिझोमीटर हे साधन द्रवपदार्थ किंवा वायुचा दाब मोजण्यासाठी वापरण्यात येते. भूगर्भातील पाण्याचा दाब मोजण्यासाठी किंवा खोली दर्शविण्यासाठी हे साधन कूपनलिकेच्या अंतर्गत बसविण्यात येते तेव्हा संस्थेने पटवर्धन कन्या प्रशालेच्या आवारात पिझोमीटर बसवण्यासाठी आवश्यक जागा देण्यास संस्थेने दि.21/10/1997 ला सभेत मान्यता दिली.[4]
5. संस्थेची प्रगती ही देणगीदारांच्या मदतीने होत असते. तेव्हा संस्थेकडे जमा होणा–या एण्डाऊमेंट देणग्यांत बौध्दिक व शारीरिक असे दोन भाग असतात. गरीब होतकरू विद्यार्थ्यांसाठी वेगळ्या देणग्या देण्यात येतात. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक ती साधनसामुग्री आपल्या खर्चाने विकत घेता येत नाही. तेव्हा एण्डाऊमेंट देणगीच्या व्याजाच्या रूपाने येणारी रक्कम पारितोषिकांची छोटी रक्कम पुष्कळदा पुस्तकरूपाने दिली जाते. कोणतीही देणगी स्विकारताना ती शाळेच्या नावे न स्विकारता संस्था पातळीवर स्विकारली जाते व शाळेने गरीब व होतकरू विद्यार्थ्यांच्या नावे संस्थेला कळविल्यानंतर संस्थेकडून पैसे दिले जातात. मदत देताना कोणत्याही प्रकारची जात–पात धर्म न बघता त्या विद्यार्थ्यांला मदत केली जाते.[5]
6. विद्यार्थ्यांच्यामध्ये जाती–भेद विसरून, ऐक्याची भावना निर्माण व्हावी. कृतीतून घेतलेले शिक्षण जन्मभर लक्षात राहाते. व्यवहार ज्ञानाची शिदोरी शालेय जीवनातूनच विद्यार्थ्यांना मिळावी. म्हणून 1919 पासून सिटी हायस्कूलमध्ये 'विद्यार्थी सहकारी भांडार' सुरू केले होते.[6] त्याच्यातून खर्च वजा जाता विद्यार्थ्यांच्यामध्ये तो फायदा वाटून दिला जात होता.' विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये व त्याला फी भरता येत नसेल तरीसुध्दा ती फी भरण्याची सोय 'गुरूवर्य गुंडो आण्णा दासो कंपली व माजी विद्यार्थी प्रतिष्ठान' मार्फत भरली जाते यांचे कार्याध्यक्ष श्रीयुत बंडोपंत राजापाध्ये काम पहातात. गरीब विद्यार्थ्यांना सहलीचा आनंद मिळत नाही म्हणून महात्मा गांधी विद्यामंदिर, विटा या शाळेतील व कॉलेजच्या विद्यार्थ्यांची मोफत सहल काढली जाते. महाराष्ट्र राज्यातील हा एक या शाळेने चालविलेला नवा उपक्रम व महाराष्ट्रातील विशेष बाब म्हणून बघावे लागेल.
7. '**एक मूठ धान्य समाजासाठी**' अशा स्वरूपाचे सामाजिक कार्यक्रम सिटी हायस्कूलमधील विद्यार्थ्यांनी राबविले आहेत ते धान्य मिरजेच्या 'पाठक अनाथ आश्रमाला' भेट म्हणून दिले आहे.[7] याच्यामधून विद्यार्थ्यांची सामाजिक बांधिलकी दिसते. राष्ट्राविषयी विद्यार्थ्यांना आदर, प्रेम, राष्ट्रभावना जागृत व्हावी म्हणून 'विद्यार्थी

दशेतूनच स्कॉलरशीप मिळालेल्या विद्यार्थ्यांनी 4151 रू. तत्कालीन जिल्हाधिकारी श्री. नितिन करीर 17 ऑगस्ट 1999 यांना राष्ट्रीय सैनिक कल्याण निधी दिला.''[8]

## 4.4.2 शैक्षणीक योगदान

### शिक्षकांच्यासाठी उद्बोधन वर्ग उपक्रम

उद्बोधन वर्गासंबंधी संस्थेची भूमिका अशी दिसते की, संस्थेत नव्याने येणारे शिक्षक व सेवक यांना आपण ज्या संस्थेत काम करत आहोत ती कोणत्या विचाराने प्रेरित आहे. त्या विचारधारेची, परंपरेची ओळख व्हावी. शिक्षण संस्थेत होणारा विचार हा भारतीय संस्कृती, राष्ट्रीय अखंडता, बंधुभाव, राष्ट्रप्रेम इ. जाणीव होऊन आपल्या वर्तनातून, विद्यार्थ्यासमोर, समाजासमोर आदर्श निर्माण व्हावा. त्यासाठी उद्बोधन, चर्चा यांची गरज ओळखून संस्थेच्या उद्दिष्टानुसार कार्य घडण्यासाठी व शासनाकडून येणा–या शिक्षणविषयक बदलांचे अध्ययन व्हावे. तसेच अध्यापनास होणारे अथवा करावे लागणारे बदल, मुल्यमापनातील बदल, लक्षात यावेत यासाठीही उद्बोधन वर्गाची घेऊन अनेक विविध विषयावरील, विविध स्तरावरील शिक्षकांसाठी, सेवकांसाठी, पदाधिका–यांसाठी व विशेष म्हणजे संस्थाचालकांसाठी देखील प्रशिक्षणाची योजना केली जाते.

श्री. मुकुंद चिंतामणी जोग, 'उद्बोधन वर्ग एक आढावा' या लेखात सांगतात की, ''डी. एड. शिक्षकांना इंग्रजी विषयाच्या अध्यापनात येणा–या अडचणी लक्षात घेऊन या विषयाचे मार्गदर्शन करण्यासाठी संस्थेतील तज्ञ शिक्षकांनी मार्गदर्शन केले.''[9] दुसरे शिक्षक संजीवनी शिबीर हे अनिवासी घेण्यात आले यात स्पर्धा परिक्षा, टी.एस.ई. शिष्यवृत्ती, एन.टी.एस., एन.एम.एम.एस. परिक्षांसाठी प्रश्न तयार करणे. तिसरे संजीवनी शिबीर पूर्वप्राथमिक व प्राथमिक शिक्षकांसाठी घेण्यात आले होते. त्याचप्रमाणे घटक चाचणी, मुल्यमापन, कृतिसत्र व अभ्यासक्रम नियोजन यावरदेखील उद्बोधन वर्ग घेण्यात आले. अन्य शैक्षणिक विषयावर ही उद्बोधन वर्ग घेण्यात आलेले दिसते. माजी शिक्षण संचालक श्री. वि. वि. चिपळूणकर यांनी 'आजच्या शिक्षणाची दशा व दिशा,' श्री. श. ना. नवलगुंदकर यांनी 'संस्कारातून शिक्षण' तसेच 'माध्यमिक शिक्षण एक चिंतेचा वा चिंतनाचा विषय' यावर मार्गदर्शन केले. वा. ना. अभ्यंकर यांनी शालेय कार्यक्रम व नियोजन यावर शिक्षकांचे गट करून व गटप्रमुखांचे मार्गदर्शनाखाली आदर्श शालेय नियोजन यांची रूपरेषा निश्चितीसाठीही उद्बोधन वर्ग घेतले जाते.

संजीवनी शिबिराचेही आयोजन केले जाते. ''पहिले शिक्षक संजीवनी शिबीर'' हे संस्थेत रूजू होऊन 10 वर्षे पूर्ण न झालेल्या शिक्षकांसाठी निवासी शिबीर घेण्यात आले होते.[10] संस्थेने आयोजित केलेल्या उद्बोधन वर्गाची माहिती घेताना असे लक्षात येते की, शिक्षक घडविण्यासाठी संस्था नेहमी प्रयत्न करत आहे. सक्षमपणे कार्य व्हावे त्यासाठी काही उद्बोधन वर्ग हे ज्ञान समृध्दीसाठी आहे. काही वर्ग शालेय कामकाज नियोजन, विषयज्ञान वृध्दी यासाठी घेतले जातात. त्याचा पाठपुरावा करून त्यातील कमतरता हेरून त्यावर भर देऊन पुन्हा त्यासाठी वर्गाचे आयोजन करून न समजलेल्या बाबी समजून देणे, कामकाज पूर्ण होईपर्यंत पाठपुरावा करणे त्यादृष्टीने उद्बोधन वर्ग सुरू केले गेलेले आहे.''संस्थेच्या या उपक्रमानुसार पहिला 'उद्बोधन वर्ग' दि.13/07/1980 रोजी म. के. आठवले, विनय मंदिर, सांगली येथे झाला.'' असे माजी शिक्षिका सौ. निला राजाराम लिमये उद्बोधन वर्ग या लेखात सांगतात.

**उपक्रम –सायकल सहलीचे आयोजन**

विद्यार्थ्यांसाठी काही उपक्रमशील शिक्षक सायकल सहली आयोजित करतात. सिटी हायस्कूलच्या दीपक लेले या विद्यार्थ्यांने एकचाकी सायकल चालविण्याचा विश्वविक्रम केला आहे.[11] पूर्वी शाळेत स्लो सायकलिंगचे पहिले बक्षीस कल्याण गणेश अभ्यंकर या विद्यार्थ्यास मिळाले होते. सायकल सहल आयोजित करण्याचा हेतू असा दिसतो की, 'सायकल हे सहज उपलब्ध होणारे कुणालाही चालविता येणारे व स्वावलंबन शिकविणारे असे साधन आहे. सायकल सहलीमध्ये स्वतः चे ओझे स्वतः नेणे, स्वतः हवा मारणे. सायकलची किरकोळ दुरूस्ती यामुळे विद्यार्थ्यांची मानसिक सबलता, शारिरीक क्षमता, सायकल चालवताना निसर्गाशी परिचय, सायकलीमुळे प्रदुषण रोखणे, इंधनाची बचत म्हणून सायकल चालविण्याचे हे महत्व ओळखून पूर्वीपासूनच सायकल सहलीची परंपरा सुरू आहे.

सायकल सहल ही शक्यतो हिवाळयात/दिवाळीच्या सुट्टीनंतरच आयोजन केले जाते. लांबच्या सहलीचेही नियोजन केले जाते. या सहली मुक्कामाच्या असे. सायकल सहलीत पंक्चर काढून देण्याची जबाबदारी श्री. ग. मा. माळी यांची होती. शास्त्र विषयाच्या शिक्षकांनी विज्ञान विषयाचा उपक्रम म्हणून औद्योगिक क्षेत्रास भेट देण्यासाठी सायकल सहलीचा पर्याय निवडला होता. यामध्ये सांगली साखर कारखाना, दूध डेअरी, वनीकरण कार्यालय, एम. आय.डी.सी. कुपवाड येथील ॲल्युमिनियमचा कारखाना, औषधांचा कारखाना, कोल्ड स्टोअरेज अशा विविध ठिकाणी भेटी दिल्या आहेत.

सायकल सहलीत सर्वच जाती–धर्माची मुले भाग घेत. यामध्ये शांत व हुशार मुलांपेक्षा दंगेखोर व वात्रटपणा करणारी मुले संख्येने जास्त असल्याने मध्येच ब्रेक लावून सायकल थांबविणे, दुस–याला आडवी सायकल मारणे अशा खोड्या करत, वाटेमध्ये झाडावरच्या चिंचा दगड मारून न पाडता त्या झाडावर चढून काढायची परवानगी दिली जात. सायकलीच्या गतीला ही ओव्हरटेक करायला शिक्षक शिकवतात. 'सायकल व सायकल सहल' यांचे शालेय जीवनातील महत्त्व पटवून देण्यासाठी सांगली शिक्षण संस्थेने शताब्दी वर्षात सांगली ते तासगांव अशी सायकल रॅली आयोजित केली होती.[12] त्यामध्ये संस्थेच्या सर्वच शाळांतील जवळपास 1000 विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले होते.' असे श्री. विवेक कान्हेरे प्रयोगशाळा सहाय्यक सांगतात.

**सांगली शिक्षण संस्थेतील बालनाट्य चळवळ**

सांगली ही तर नाट्यपंढरी असल्यामुळे सांगली शिक्षण संस्थेने सुरूवातीपासूनच नाट्य परंपरा सुरू ठेवली आहे. आजची बालनाट्याची संकल्पना रूजायची होती, तेव्हाच सांगली शिक्षण संस्थेने बालकांच्या सुप्त गुणांना लहान वयातच आकार मिळण्यासाठी बालनाट्य चळवळीचे प्रणेते श्री. शिंदगी सर यांच्या नेतृत्वाने बालनाट्य चळवळीचे बी रूजवले. काही खास गीते शाळेने तत्कालीन राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या भेटीच्या वेळी सादर केली होती.संस्थेच्या शाळातून विशेषतः सिटी हायस्कूलमधून स्नेहसंमेलनातून शाळेतील कलावंत शिक्षक, विद्यार्थ्यांकडून नाटक बसवून ते सादर करीत. पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक विषयावरती नाटक सादर केले जात होते.

विशेष म्हणजे या नाटकामध्ये काही वेळा पदाधिकारी, शिक्षकही विद्यार्थ्यां समवभूमिका सादर करीत. (जिथे कमी तिथे आम्ही या उक्तीप्रमाणे) बालनाट्य चळवळीतील विद्यार्थी स्वतः ला साजेसे नाट्य प्रवेश निवडून आपली कला सादर करीत होते.

**ऐतिहासिक नाट्यप्रवेशामध्ये –**

रोहिडेश्वराची शपथ, बाल शिवाजी, श्रीकृष्ण, ध्रुव, प्रल्हाद यांच्या बालजीवनातील नाट्य प्रसंग, नृत्ये, नकला अशी ही बालनाट्य सादर करून भविष्यातील वाटचालीला वळण देत होती. 'आजी–आजोबांचे भांडण' आणि 'फुगेवाला' ही गीतं तर सौ. वर्षा भावेनी (खाडिलकर) आकाशवाणीवरून गायली होती.[13]

**सांगली शिक्षण संस्थेने बालनाट्य सर्वप्रथम भरवले –**

या बालनाट्य संमेलनात या संस्थेने सुखी माणसाचा सदरा, विठ्ठल तो आला आला, वयम् मोठ्ठम, खोटम, शेपटीचा शाप, भटक्याचे भविष्य, बोलका आरसा, बाहुली इ. गोकुळचे राजे, 'सई सुट्टयो' नाताळ बाबा, कमलिनी, शुभदंगल सावधान अशा नृत्य–नाट्य–संगीतमधून शैक्षणिक मूल्याधिष्ठित वाङ्मय अभिरूची निर्माण करण्याचा प्रयत्न ही संस्था करत आहे. मुलाखत श्री. निवास शिंदगी सर, माजी शिक्षक

**सांगली शिक्षण संस्थेने निधी उपलब्धीसाठी – नाटकाचे प्रयोग सादर केलेले दिसतात. उदाहरण–**

"मिठाईचे घर" बालनाटकाचे दोन प्रयोग जाहीर केले होते त्यासाठी तिकीट विक्री सुरू केली होती.'1955 मध्ये स्थापन केलेली 'बाल कलारंजन' या आद्य बालनाट्य संस्थेचा–सांगली शिक्षण संस्थेचे सध्याचे कामकाज सध्या सौ. प्राची गोडबोले, शशिकांत देशपांडे, सं. गो. कुलकर्णी आदी शिक्षक चालवित आहेत. जेष्ठ बालसाहित्यिक व अध्यक्ष मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली पाच बालनाट्ये श्री. निवास शिंदगी सरांनी बालनाट्य बापट संस्थेच्या हीरक महोत्सवात सादर केली होती.[14]

**श्री. निवास शिंदगी सर व प्राची गोडबोले मॅडम एक चर्चा –**

महाराष्ट्रातील आद्य बालरंगभूमीचे ब्रीद वाक्य "बाल ब्रह्म जयते" हे आहे. शताब्दि महोत्सवाच्या निमित्ताने विद्यार्थीकेंद्री उपक्रम व बालनाट्य परंपरा जपणा–या राज्यस्तरीय स्पर्धेविषयी राज्यस्तरीय बालनाटय स्पर्धा घेण्यात आली. त्या स्पर्धेसाठी 35 बालनाट्ये सादर झाली. त्यापैकी 8 बालनाट्ये ग्रामीण तर 27 नाटके शहरी भागासाठी होती असे सौ. प्राची गोडबोले आपल्या मुलाखतीत देतात. "बालांनी बालांचे मनोरंजन करावे. या हेतूने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. निवड झालेल्या सर्व स्पर्धक संघाना रू.3,000/– निर्मीतीखर्च, मानचिन्ह, रोख रक्कम व प्रशस्तिपत्रक स्वरूपात बक्षिसे देण्यात आले होते."[15] संस्थेच्या बालनाट्यातला शाहीर देवानंद माळी देश, विदेशांत शाहिरी कलेतून प्रबोधन साधत आहे.

**सांगली शिक्षण संस्था–संगीत कलेचा पायाभूत आधार**

विद्यार्थ्यांच्या कला–गुणांचा शोध घेऊन त्याला प्रोत्साहन करण्याचे काम शिक्षकांना करावेच लागते व त्यांचे ते कर्तव्य आहे. पुरोहित कन्याशाळेची माजी विद्यार्थीनी सौ. शर्वरी अरगडे सांगते की, 'आमच्या वर्गातील सात जणींनी आकाशवाणी सांगलीतर्फे समूहगीत सादर केले होते.'[16] त्यानंतर 'किलबिल' कार्यक्रमात एक साभिनय नाट्यगीत सादर केले. शास्त्रीय संगीत, नाट्यसंगीत, भावगीत, अभंग, बालचित्रवाणी, दूरदर्शन यावरून आणि मुंबई, पुणे आकाशवाणी केंद्रावरून प्रसारण केले जाते. हे सर्व आज प्रोफेशनल कार्यक्रम करतांना शाळेच्या शिक्षकांच्या प्रोत्साहनामुळेच घडले.

**सुंदर हस्ताक्षरासाठीचे योगदान**

बालक बाळबोध अक्षर। करावे घडसुनि सुंदर ।।
जे देखताचि चतुर। समाधान पावती ।।

या समर्थ रामदासांच्या ओवीस अनुसरून मा. श्री. वा. शि. तु. भालबा करमरकर यांच्या पुढाकाराने संस्थेने माध्यमिक विद्यार्थ्यांसाठी संस्था पातळीवर हस्ताक्षर स्पर्धा सुरू केली.[17] सुंदर हस्ताक्षर ही विद्यार्थ्यांची ओळख, स्वभाव सांगते असे म्हणतात. विद्यार्थ्यांच्या हस्ताक्षरात सुधारणा व्हावी या हेतूने सांगली शिक्षण संस्थेच्या स्थापनेपासून अनेक

नामवंत शिक्षकांनी अतोनात कष्ट घेतलेले आहे. **'गुणवत्तेचा ध्यास हाच आमचा श्वास'** या उक्तीप्रमाणे संस्थेची वाटचाल सुरू आहे. आज संगणकाच्या युगात विद्यार्थ्यांच्या हस्ताक्षराबाबत दुरवस्था निर्माण झाली आहे. अक्षराकडे फारसे कोणी लक्ष देत नाही. शताब्दी वर्षातही व व्दिशताब्दी वर्षात पदार्पण केल्यानंतरही हा उपक्रम सुरूच ठेवला आहे. विद्यार्थ्यांत सुंदर हस्ताक्षरांची जोपासना व्हावी, यासाठी संस्थेच्या सर्व शाळेत जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातात. सुंदर हस्ताक्षराबाबत प्रयत्न, सुंदर हस्तांक्षराचे महत्व, हस्ताक्षरातील दोष, हस्ताक्षर सुधार उपक्रम, सुंदर हस्ताक्षराचे सर्वसाधारण कोणते नियम असावेत? संस्था स्तरावरील हस्ताक्षर स्पर्धा, स्वरूप व पारदर्शक कार्यवाही अशा सर्व निकषावरती आधारित हा उपक्रम राबविला जातो.

'सुंदर हस्ताक्षर' याबाबत श्री. ब. नि. कुंभार मनोगत व्यक्त करताना म्हणतात की, 'आंतरशालेय हस्ताक्षर स्पर्धा' घेणारी महाराष्ट्रातील 'सांगली शिक्षण संस्था' सांगली ही एकमेव संस्था आहे.[18] विद्यार्थ्याच्या हस्ताक्षरातील दोष दूर करण्यासाठी प्रथम 'शिक्षकांचे हस्ताक्षर सुधारले पाहिजे' म्हणून प्रत्येक शनिवारी शाळा सुटल्यानंतर शिक्षकांच्यासाठी हस्तांक्षर सुधार उपक्रमाचे आयोजन केले होते. जुलै 2016 मध्ये एक तरी ओवी अनुभवावी हा उपक्रम ही सुंदर हस्ताक्षरासाठीचाही उपक्रम आहे.

## सांगली शिक्षण संस्थेच्या क्रीडा स्पर्धा–योगदान

खेळ–व्यायाम यातील प्रकारात मुलामुलींनी पुढे यावे हे पालकांना अजूनही पटत नाही. पाल्याच्या बौध्दिक गुणांची टक्केवारी व वर्गातील क्रमांक हेच त्यांचे ध्येय असते. पण ''शरीर माद्यं खलु धर्मसाधनम्'' हेच ते विसरतात. संस्थेचे मात्र बौध्दिक विकासाबरोबर क्रीडाप्रकारांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न करत असलेली दिसते. विद्यार्थ्यांचा शारीरिक विकास होण्यासाठी व्यायाम खेळ, कवायत, लेझीम, विविध खेळांची माहिती व ज्ञान विद्यार्थ्यांना दिले जाते व त्यातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, खिलाडूवृत्ती, संघभावना, नेतृत्व गुण, सहकार्य, चुरस इ. गुणाचा विकासाने तालुका, जिल्हा, विभाग, राज्य, राष्ट्रीय अशा विविध स्तरावर स्पर्धामध्ये विद्यार्थी भाग घेऊ लागले आहेत. त्यातूनच पुढील काही उदाहरणे आपल्याला दिसतील.

1. कु. मधुरा भगवान कुलकर्णी या विद्यार्थीनीने बेसबॉलमधील राष्ट्रीय कास्यपदक पटकवले आहे. ''प्रिन्स ऑफ योगा'' पुरस्कारांनी सन्मानित योगपटू जयेश सुनिल केतकर याने 13 ते 14 ऑक्टोंबर 2012 रोजी सिंगापूर येथे झालेल्या ''सेकंड कॉटिनेंटल ॲड टायटल चॅम्पियनशिप'' या आंतरराष्ट्रीय योगसन स्पर्धेत 4 सुवर्ण, 1 रौप्य व 'प्रिन्स ऑफ योगा' हा पुरस्कार मिळवून शाळेचे व संस्थेचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकविले आहे असे श्री. उ. द. पोतदार पटवर्धन हायस्कुलचे शिक्षक ''घेताच नाव ज्याचे ही हो उन्नत हा माथा विश्वात पसरते आहे. जयेशची यशोगाथा!'' या लेखात सांगतात.[19] श्री. दिपक लेले हे माजी विद्यार्थी 1984 च्या ऑलंपिकच्या एकचाकी सायकलवरून न्यूयॉर्क ते लॉस एंजिल्स सुमारे **8,000** कि.मी. प्रवास करून गिनीज बुकमध्ये विश्वविक्रमवीर ठरलेला विद्यार्थी.[20]

## राष्ट्रीय छात्र सेना उपक्रम

विद्यार्थी शिस्तप्रिय आणि सक्षम बनावा यासाठी सांगली शिक्षण संस्था सतत आघाडीवर असते. त्यासाठी विविध उपक्रम ती राबवते. त्यापैकीच एक उपक्रम म्हणजे शासनाच्या एन. सी. सी. अभियानातील सक्रीय सहभाग होय. 'सन 1936 मध्ये भारत सेवक समाज, हिंदुस्थानचे अध्यक्ष पंडित हृदयनाथ कुंजरू यांनी सिटी हायस्कूलला भेट देवून त्यावेळेचा अभ्यासक्रम, व्यायाम, शारीरिक शिक्षणाला संस्थेने दिलेले महत्त्व हे त्यांनी प्रत्यक्ष बघून ते भारावून गेले होते.' पंडित हृदयनाथ कुंजरू यांच्या अध्यक्षतेखाली भारत सरकार, संरक्षण मंत्रालयाने कमिटी नेमून 16 जुलै

1948 रोजी एन. सी. सी. (राष्ट्रीय छात्र सेना) ची स्थापना केली. महाराष्ट्र राज्याची स्थापना होण्याच्या अगोदर ''श्री. केशव जिवाची काळे हे सैनिक तळावरील शार्पर्स माईन्स युनिटचे पहिले लेफ्टनंट झाले.'' असे श्री. नवनाथ राजाराम लाड शिक्षक मालू हायस्कूल, सांगलीचे सांगतात.[21] सन 1949 मध्ये राष्ट्राच्या संरक्षणासाठी हिंदुस्थान सरकारने दोन नवीन योजना हाती घेतल्या होत्या. 1) प्रादेशिक सैन्य विभाग 2. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी–विद्यार्थिनी यांना लष्करी शिक्षण देण्याची, तिलाच 'नॅशनल कॅडेट कोर 'असे म्हणतात. परंतु जुन्या मुंबई राज्यात 1953 च्या नोव्हेंबर अखेरीस एन. सी. सी. बंद करण्यात आली. नव्या महाराष्ट्र बटालियन एन. सी. सी. आर्मिविंग सुरू झाले. सांगली शिक्षण संस्थेच्या एक काळातील मिरज हायस्कूलला एन. सी. सी. विभाग स्थापन करण्याचा बहुमान मिळाला (आत्ता ही संस्था सांगली शिक्षण संस्थेशी जोडून नाही.) सन 1964 रोजी शासनाने मिरज हायस्कूलला मुलींची एन. सी. सी. सुरू करण्याची शिफारस केली होती. त्याच धर्तीवर सन 1965 च्या अखेरीस सिटी हायस्कूलच्या मुलीचे एन. सी. सी. पथक सुरू झाले होते. आज सर्वच माध्यमिक शाळातून एन. सी. सी. चे पथक चालू आहेत. त्यापैकी 19 महाराष्ट्र बटालियन, क–हाड यांच्यामार्फत महात्मा गांधी विद्यामंदीर येथे ज्युनिअर एन. सी. सी. चे कामकाज श्रीयुत गंगातीरकर सर पहात आहेत. 26 जानेवारी 1980 च्या दिल्लीत होणा–या प्रजासत्ताक दिन संचलनात भाग घेण्यासाठी महात्मा गांधी विद्यामंदिर, विटेच्या पाच कॅडेटसची मल्लखांब प्रत्यक्षिक दाखविण्यासाठी निवड झाली होती. त्याचबरोबर संस्थेचे माजी विद्यार्थी लेफ्टनंट कर्नल श्री. जगदिश पुरूषोत्तम खाडिलकर यांची 1989 साली भारत सरकारने दक्षिण अंटार्टिका संशोधन पथकात निवड झाली होती.

महात्मा गांधी विद्यामंदिर विटा येथील मुख्याध्यापक एन. सी. सी. चे अनुभव सांगतात की, सन 1996 मध्ये चं. वा. ज्ञानमंदिरचे एन. सी. सी. ऑफिसर व सध्याचे महात्मा गांधी विद्यामंदीर मधील मुख्याध्यापक श्री. दिपक देशपांडे सर यांचेवर महाराष्ट्र डायरेक्टोरेटने ऑल इंडिया ट्रेकिंग कॅम्प शिलॉग ते चेरापुंजी कॅम्पची जबाबदारी सोपविली होती.[22] 30 दिवसांचा कॅम्प कॅडेट मल्लीकार्जुन कराडे व सुधीर नंदकुमार देशपांडे यांच्या समवेत कॅम्प पूर्ण केला असे सांगतात. संस्थेच्या विविध शाळांतील एन. सी. सी. ऑफिसर अतिशय कष्टाने व जिद्दीने विद्यार्थी घडवित आहेत.

## संस्थेचे बाह्य परिक्षा विभाग

आजच्या परिस्थितीत 'विद्यार्थ्यांना ताण नको म्हणून परिक्षाच नकोत, – परिक्षा सोप्या करा.' अपयशाने विद्यार्थी खचतील म्हणून गुण न देता श्रेणी द्या विद्यार्थीच्या मनावर परिणाम होईल म्हणून गुणवत्ता यादी रद्द करा. या गोष्टींमुळे विद्यार्थ्यांची स्पर्धेला सामोरे जाण्याची मानसिकता तयार होणारच नाही. त्यासाठी शालेय वयातच अपयशाची सवय झाली नाही तर पुढच्या आयुष्यात येणा–या अपयशाला तो पचवू शकणार नाही. शिक्षण व्यवस्थेचा केंद्रबिंदू म्हणजे विद्यार्थी, तो वैज्ञानिक व्हावा, संशोधक व्हावा, साहित्यक व्हावा, चित्रकार व्हावा, संगीतकार व्हावा ही अपेक्षा असते. तो सुसंस्कृत व्हावा ही समाजाची अपेक्षा असते या सर्व अपेक्षा पूर्ण व्हाव्यात या संस्थेच्या अपेक्षा असतात व तो विद्यार्थी आर्थिक दृष्ट्या तो सुसंपन्न व्हावा ही पालकांचीही अपेक्षा असते. 'शासकीय धोरणानुसार सर्व विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परिक्षेस बसावे म्हणून संस्थेने बाह्य परिक्षा विभागाची सुरूवात केली. या विभागाची सुरूवात डॉ. बापट बालशिक्षण मंदिर या शाळेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने केली.[23] परिक्षेस सामोरे जाताना त्यांच्यावर येणारे मानसिक दडपण दूर व्हावे म्हणून सराव परीक्षा घेण्याचा उपक्रम सन 2000 पासून राबविला जात आहे. शिष्यवृत्ती परिक्षेस मार्गदर्शन करणा–या शिक्षकांच्या अध्यापनाचा लाभ इतर शाळांतील विद्यार्थ्यांना व्हावा म्हणून संस्थेने इयत्ता 4 थीच्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परिक्षेसाठी जिजामाता शिष्यवृत्ती सराव परिक्षेचे आयोजन सन 2004–2005 या शैक्षणिक वर्षापासून सुरू केले आहे. त्याचबरोबर 3 री व 6 वी च्या विद्यार्थ्यांसाठी 'गुणवत्ता शोध

परीक्षेची' (टी. एस. ई.) सुरूवात केली. या परिक्षेसाठी शालेय पाठ्यक्रमावर आधारित स्वतः ची पुस्तके संस्थेने तयार केली त्यातील लिखाण संस्थेतील शिक्षकांनीच केले आहे. सर्वप्रथम सांगली जिल्ह्यामध्ये सुरू झालेली ही परिक्षा सन 2013–14 या शैक्षणिक वर्षामध्ये सांगली, कोल्हापूर, सोलापूर, सातारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे या जिल्ह्यात सुरू झाली आहे. संपूर्ण महाराष्ट्रभर या संस्थेने नाव कमावलेले आहे.[24]

### राष्ट्रीय प्रज्ञा परीक्षा केंद्र (एन. टी. एस.)

संस्थेतील विद्यार्थी एस. एस. सी. गुणवत्ता यादीत येतात. आपल्या या विद्यार्थ्यांबरोबर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परिक्षांच्या मार्गदर्शनाची व्यवस्था असावी असे संस्थेचे माजी अध्यक्ष प्रा. अशोकराव घारपुरे यांनी संस्थेतील आजी–माजी तज्ञ शिक्षकांची बैठक घेतली त साल होते 1995 ''स्पर्धा परिक्षांची तयारी करण्यासाठी सिटी हायस्कूलमध्ये सुट्टीतील वर्गाचे आयोजन शनिवार व रविवार दोन्ही दिवशी साधारण 10 तासिकांचे नियोजन, सरावासाठी चाचण्यांचे नियोजन, चाचणीनंतर विद्यार्थ्यांना चुका समजून देऊन पुढच्या पेपरमध्ये सुधारणा केल्या जाव्यात. पेपर संच स्वतः संस्थेमार्फत तयार करून ते सोडविण्यासाठी ग्रंथालयात एकत्र यायचे'' असे श्री. विजय बक्षी, माजी ग्रंथपाल, सिटी हायस्कूल, सांगलीचे सांगतात.[25]

1995 साली मंदार प्रभूघाटे हा मालू हायस्कूलचा विद्यार्थी एन. टी. एस. साठी निवडला गेला. तिथून दरवर्षी किमान एक विद्यार्थी राष्ट्रीय स्तरावर निवडला जातो. विद्यार्थी मुलाखतीसाठी पुण्याला गेल्यानंतर त्याच्यामध्ये मागे पडतात म्हणून त्यांची मुलाखतीची तयारी, मुलाखत मंडळ नेमणूक करून घेतली जाते व त्याच्यातून 2012 पर्यंत 32 विद्यार्थी राष्ट्रीय स्तरावर निवडून आले आहेत.

### शताब्दी चित्रकला महोत्सव उपक्रम

बाल मन हे संस्कारक्षम असते या मनावर वेळीच कला संस्कार झालेतर भविष्यात निश्चितच कला संस्कृती जपली जाते. त्यादृष्टीने या स्पर्धेचे योगदान महत्वाचे वाटते. श्री. सागर स. सगरे आपल्या शताब्दी चित्रकला महोत्सव या लेखात सांगतात की, नारळी पौर्णिमेचा सुमुहूर्त साधून रविवार दि.10 ऑगस्ट 2014 रोजी खुल्या चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या.[26] भावना हया नेहमी शब्द आणि विचारांच्या माध्यमातून व्यक्त होताना दिसतात. पण शब्दही रेषेतूनच निर्माण होत असलेने बिंदूच्या असंख्य समूच्याने निर्माण होणा–या या रेषेच्या व रंगाच्या साहाय्याने अनेक भावबंध कागदावर उतरविण्याचे काम हे विद्यार्थी करतात.

### शिक्षक, पालक व माता पालक संघ उपक्रम

साधारणपणे 2005–2006 सालापासून प्रत्येक शाळेत पालक संघ असावेत असे शासनाने अनिवार्य केले. त्यानुसार संस्थेच्या सर्व शाळांमध्ये 'शिक्षक पालक संघ' व 'मातापालक संघ' अशा संघाची स्थापना केली आहे. शिक्षक – पालक संघात प्रत्येक शाळेतील शिक्षक व पुरूष वा महिला पालक यांचे प्रतिनिधी असतात. शाळेचे मुख्याध्यापक या संघाचे पदसिध्द अध्यक्ष, तर एक पालक उपाध्यक्ष असतात. शालीय कामकाज, व्यवस्थापन, समस्या, उपक्रम यासंबंधी माहिती देणे समस्यावर उपाय शोधण्यासाठी चर्चा केली जाते. पालकांच्या संपर्कातून त्यांच्या क्षमतांचा वापर शाळेसाठी व्हावा अशी धारणा आहे. पालकांच्या मनातील शंकाचे निरसन होण्यासाठी पालक प्रतिनिधींचा उपयोग होतो.

प्रत्येक तुकडीतील एक माता–पालक प्रतिनिधी अशाच मिळून, प्रत्येक शाळेत माता–पालक संघ तयार होतो. या संघाच्या अध्यक्ष माता पालक काम करतात. उपाध्यक्ष शाळेचे पर्यवेक्षक असतात. विद्यार्थी व माता यांच्या

आरोग्यविषयक वा अन्य कार्यक्रमाचे आयोजन केले जाते असे महात्मा गांधी विद्यामंदिरच्या पर्यवेक्षिका सौ. कवठेकर मॅडम यांनी माहिती दिली.[27]

## 4.4.3 सांस्कृतिक योगदान

### शारदोत्सव

कन्या प्रशालेमध्ये शारदोत्सव हा सर्वांचा आवडता उत्सव कारण या उत्सवात आपल्या कलागुणांना वाव मिळतो. मुलामुलींच्या शाळेत गणेशोत्सव हा उपक्रम असतो व कन्या प्रशालेत शारदोत्सव हा उपक्रम असतो. अश्विनी शुध्द प्रतिपदेला नवरात्र उत्सव असतो तोच शारदोत्सव ! या दिवशी शारदा देवीची प्रतिष्ठापना केली जाते. पूजा, आरती, मंत्र उच्चार, देवी स्त्रोत गायली जातात.

प्रत्येक दिवशी वेगवेगळी कार्यक्रम ठेवली जातात. निरनिराळ्या वक्त्यांची व्याख्याने संगीत स्पर्धा, गीत गायन, हळदी कुंकू, हादगा (भोंडला) इ. कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.खंडेनवमीला उद्यापन केल जाते.[28]

### गणेशोत्सव

भारतीय संस्कृतीत मूर्तिपूजा ही एक फार थोर व मधूर अशी कल्पना आहे. मानवाला उत्तरोत्तर स्वतःचा विकास करून घेता यावा म्हणून जी अनेक साधने संस्कृतीने निर्माण केली त्यातील एक साधन म्हणून मूर्तिपूजेकडे पाहिले जाते. सन 1921 साली सिटी हायस्कूलमध्ये सुरू झालेला हा गणेशोत्सव आज 2017 मध्येही थाटामाटात साजरा होत आहे.[29] गेली. सन 1985 वर्षे चालू असलेला हा गणपती उत्सव म्हणजे सांगली शिक्षण संस्थेच्या शिरपेचातील मानाचा तुरा आहे. गणपतीची पूजा ही विद्येची, कलेच, ज्ञानाची पूजा आहे.

महात्मा गांधी विद्यामंदिर शाळेचा गणपती मानाचा प्रथम गणपती असे अलिखीत ठरूनच गेले आहे. शालेय सुवर्ण महोत्सवाचे निमित्ताने त्यावेळी बाळू बापट साहेबांच्या डोक्यात एक कल्पना आली. 2500 विद्यार्थ्यांचा संयुक्तपणे एकत्रित गणेशोत्सव साजरा करावा असा विचार त्यांनी मांडला. त्यासाठी त्यांनी आर्थिक तरतुदही केली. 2007 पासून रोखीने आणि शालेय अमृत महोत्सवापासून 'गुरूदेव आण्णासो कंपली' व माजी विद्यार्थी प्रतिष्ठान आणि माजी विद्यार्थी संघ' अशा संयुक्त जबाबदारीतून हा गणेशोत्सव साजरा होतो. टिपरी, लेझीम, झांज, घोष पथक, मंगळागौर, पथनाट्य द्वारे मिरवणूक वाजत गाजत निघते.

श्री गणेश म्हणजे बुध्दिदाता, कोणत्याही शुभ कार्याची सुरूवात गणेश पूजनानेच केली जाते. गणपती पूजनाला लोकमान्यांनी सार्वजनिक रूप प्राप्त करून दिले. गणपतीची भक्ती करण्याइतपत धार्मिक सण न राहाता शालेय स्तरावर, सर्व जाती धर्मातील मुलांच्यात लहानपणापासून एकता, बंधूता, समता निर्माण व्हावी. तसेच श्रमप्रतिष्ठा, सर्वधर्मसमभाव, सहनशीलता, स्वावलंबन, सहिष्णुता या मुल्यांचा संस्कार व्हावा यासाठी अशा प्रकारच्या उत्सवांचे आयोजन केले जाते. संस्थेच्या विविध शाळांतून गणेश उत्सव साजरा केला जातो. सन 1920–30 या दशकाच्या काळात मेळे असायचे याचा उद्देश केवळ मनोरंजन करणे हा नसून समाजातील प्रश्नांना वाचा फोडणे. नृत्य, नाट्य, नकला, गायन अशा विविध अंगानी सोहळा पार पाडला जातो. हल्ली गणेशोत्सवामध्ये भरगच्च असे कार्यक्रम घेतले जातात.

**गोकुळाष्टमी**

सांगली सिटी हायस्कूलची इमारत पूर्वीच्या फडणीस वाड्याच्या जागी बांधली असल्याने पूर्वीपासून त्या वास्तूत गोकुळाष्टमी ही चालत आलेली परंपरा आहे.[30] त्यामुळे आजही सिटी हायस्कूलच्या शाळेत गोकुळाष्टमीचा उत्सव लहानप्रमाणात का होईना पण सुरू आहे.

## 4.4.4 साहित्यिक योगदान

## सांगली शिक्षण संस्थेची साहित्यिक परंपरा

विद्यार्थ्यांच्या बौध्दिक क्षमतेचा विकास व्हावा महणून पूरक उपक्रम म्हणून विद्यार्थी शिक्षक संमेलन सुरू झाले. 1998 साली सरकारी खण बंगल्यात सिटी हायस्कूलचे पहिले संमेलन झाले होते. सिटी हायस्कूलचा विद्यार्थी आखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन 2003 साली कराड येथे भरले होते. त्याचे अध्यक्ष–प्रा. सुभाष भेंडे होते. त्यांचा जन्म 14 ऑक्टोंबर 1936 रोजी गोव्यातील बोरी येथे वयाच्या पाचव्या वर्षी आपले मूळगाव केटे सोडून ते सांगलीत शिक्षणासाठी आले. प्राथमिक शिक्षण डॉ. बापट बाल मंदिर नंतर सिटी हायस्कूलमध्ये झाले ते सिटी हायस्कूलचे माजी विद्यार्थी आहेत.

लोकप्रिय कवयित्री संजीवनी मराठे या सिटी हायस्कूलमध्ये शिक्षिका होत्या. त्यांची गाणी रेडिओवर वारंवार प्रसारित होतात. काव्य संजीवनी, राका, संसार, चित्रा, छाया, भावपुष्प, परीमल हे काव्यसंग्रह खूप गाजले.
'श्यामची आई' नंतर सुवर्ण कमळ मिळविणा–या 'श्वास' चित्रपटाच्या लेखिका सौ. माधवी घारपुरे व सुवर्णकमळ मिळविणारी कथा लेखिका ही सिटी हायस्कूलची विद्यार्थीनी, आदर्श शिक्षिका म्हणून त्यांचा सन्मान करण्यात आला. अ. भा. चित्रपट महामंडळाचा भटकळ पुरस्कार मिळविण्याचा मान ही त्यांचा आहे.[31]

सांगलीच्या बालसाहित्य, रंजनातील नाव 'श्रीनिवास शिंदगी' वयाच्या 13 व्या वर्षी, 'वुई आर सेव्हन' या इंग्रजी कवितेचा छंदोबध्द भाषांतर केले. वि. स. खांडेकर, वि. वा. शिरवाडकर यांच्यानंतर ज्ञानपीठ पारितोषिक मिळवणारे म्हणून वि. दा. करंदीकरांची निवड झाली. त्यांच्या सेवाकाळात तासगांवच्या ए. व्ही. हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून कार्यरत होते. ए. व्ही. हायस्कूल आज चंपाबेन वाडीलाल ज्ञानमंदिर नावाने सुरू आहे. भागानगरच्या सत्याग्रहातही ते सहभागी होते. हैद्राबाद मुक्ती संग्रमासाठी त्यांना तुरूंगवासही झाला जनस्थान, कर्णाक, केशवसुत पुरस्कारापासून ज्ञानपीठपर्यंतचा प्रवास करणारे विंदा करंदीकर सेवाकाळात तासगांवच्या ए. व्ही. हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून कार्यरत होते.

न. म. जोशी सिटी हायस्कुलचे माजी विद्यार्थी, कथाकार– जगणारी माणसं तीन, एकांकिका, निश्चयाचा महामेरू, बिनखात्याचा मंत्री, डॉक्टर रोगी, यम, हल्लकल्लोळ, एकांकिका, दत्तक राजपुत्र इ. (मुलाखत–श्री. विजय बक्षी, माजी ग्रंथपाल, सिटी हायस्कुल, सांगली.) महाराष्ट्र कुमार साहित्य संमेलनात 'ज्योति' या विट्याच्या हस्तलिखीतला दुसरा क्रमांक मिळाला .सानेगुरूजीच्या व्याख्यानाच्या प्रभावाने पुढील आयुष्यात डॉ. आंबडेकरांच्या चरित्रकार आणि उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीबद्दल महाराष्ट्र शासनाच्या पुरस्कराचा मानकरी ठरलेला विद्यार्थी म्हणजे आजचे ख्यातनाम लेखक डॉ. न. म. नामजोशी होय.

**संस्थेचे नियतकालिकांचे योगदान**

सिटी स्कुलच्या प्रारंभापासून हस्तकला प्रदर्शन, संमेलन, क्रीडास्पर्धा, सहली अशा निमित्ताने मुलांना उत्तेजन देण्यात येते. त्याचाच एक भाग म्हणजे विद्यार्थी व शिक्षक यांच्या लेखन रूपातील अभिव्यक्तीचे माध्यम म्हणून हस्तलिखिते सुरू करण्यात आली.[32]

1. सिटी स्कुलचे पहिले हस्तलिखित 'मोहन' या नावाने प्रकाशित झाले. यांचे संपादक बी. ए. पोटे (कवी भानुदास) होते. याची मूळ कल्पना आर. आर. चिकोडीकर यांची होती.महाराष्ट्रातील कित्येक गावांत या सुमारास शाळांतून हस्तलिखिताची कल्पना पोहोचली होती. पुण्यातील अनाथ विद्यार्थी गृहाच्या वतीने, महाराष्ट्रातील शाळांमधून अंक गोळा करून त्यांचे परिक्षण करण्यात आले. त्यात सिटी स्कुलच्या 'मोहन' ला दुस–या क्रमांकाचे रौप्य पदक मिळाले.
2. 'प्रबोध' नावाचे दुसरे एक हस्तलिखित मासिक वि. गो. पाटील, कृ. वा. ओगले व गो. ब. आपटे यांनी काढले. या मासिकालाही पुण्याच्या प्रदर्शनात गौरव होऊन बक्षिसादाखल कपपुस्तके व ब्रॉझ मेडल मिळाले.
3. सुबोध , प्रताप, शार्दुल, बाल अरूणोदय इ. मासिक आपापल्या शाळांतून चालू होती.
4. नंदादीप, निर्झर, उद्यान, ज्योती, दिवाकर, आकाश, निरंजन, प्रतिबिंब विहार असे अंक हस्तलिखित स्वरूपात प्रकाशित झाले.
5. 'नगारा' हे हस्तलिखित अंक तर काही कालावधीने साप्ताहिक प्रकाशित झाले.
6. किर्लोस्करवाडीच्या शाळेतून 'कोहिनूर', मंगल, दिप, जागृती, उत्क्रांती
7. तासगावच्या शाळेतून–विद्यार्थी, बालप्रकाश, वर्गबंधू, राजहंस, करामत
8. विटयाच्या शाळेतून नंदादिप, बालसुमन, 1945 साली 'विकास' नावाचे साप्ताहिक सुरू झाले. हे साप्ताहिक दर मंगळवारी निघे.
9. सांगली एज्युकेशन सोसायटीने परस्पर संवाद आणि संस्थेचे वृत्तांकन करण्याच्या, तसेच विद्यार्थ्यांच्या लेखनगुणास वाव देण्याच्या उद्देशाने त्रैमासिकाचा उपक्रम सुरू झाला. 'सांगली एज्युकेशन सोसायटीचे त्रैमासिक' हेच त्याचे नाव. भाद्रपद शु. 4 शके 1853 (गणेश चतुर्थी) म्हणजे दि.15 सप्टेंबर 1931 नियतकालीकाचा प्रथम अंक प्रकाशित झाला.
10. बुद्धिबळपटु तमण्णाचार्य पडसलगीकर हे सिटी हायस्कूलात शिक्षक होते. त्यांनी 'बुध्दिबळाचा खेळ' हे पुस्तक लिहिले. त्यापुढे त्रैमासिक म्हणून 1944 पर्यंत प्रकाशन झाले.
11. दि.28/08/1948 च्या आजीव बोर्डाच्या ठराव क्र.4 नुसार संपादक त्रैमासिक यांचेकडून त्रैमासिकाचे नाव 'तुषार' असे ठेवण्यात आले.
12. 2 ऑक्टोंबर 1948 या दिवशी 'तुषार' या नावाने हा अंक नव्या रूपात प्रसिद्ध झाला. 1952 पासून नियतकालीक षण्मासिक झाले. 1955–56 वर्षाच्या दुस–या सत्रात ते वार्षिक म्हणून प्रसिद्ध झाले. त्यापुढच्या 12 वर्षात अंक व्यवस्थित निघाला, पण त्यापुढे बंद पडला. 1968 नंतर 40 वर्षांनी–म्हणजे 2008–09 साली त्याचे पुनरूज्जीवन करून तुषार वार्षिकांक पुन्हा प्रकाशित झाला.

### नियतकालिकासाठी देणगी मिळवण्याच्या क्लुप्त्या –

1) 1922–23 साली सांगलीकर श्रीमंत आप्पासाहेब यांच्या मुलीचा विवाह झाला. त्यानिमित्त राजवाडयामध्ये प्रत्येक भिक्षुकाला 1 रूपये दक्षिणा दिली होती. सिटी स्कूलच्या दहाबारा मुलांनी या भोजनात भिक्षुक म्हणून दक्षिणा स्विकारली व ती हस्तलिखितासाठी खर्च केली.[33]
2) संस्थेची परंपरा व सर्व शाळांच्या प्रमुख घडामोडी, वाचनीय लेख तुषार या नियतकालिकाचा एकच अंक काढण्यास 1956 पासून सुरूवात झाली पूर्वी ते त्रैमासिक होते. आता त्याचे वार्षिकात रूपांतर झाले. सांगली शिक्षण संस्थेच्या वर्धापन दिनी म्हणजे 04 डिसेंबर ला त्याचे प्रत्येक वर्षी उद्घाटन केले जाते.

### साहित्य संमेलन

4 फेब्रुवारी 1934 रोजी बालशाळेचे व्दितीय संमेलन संस्थानचे सेकंड कौन्सिलर रा. सा. ठोंबरे यांच्या अध्यक्षतेखाली शालेय पाठयपुस्तकातील लेखक व कवी यांचे साहित्य संमेलन दि.28 व 29 डिसेंबर 2013 रोजी आयोजित करून पाठयपुस्तकातील धडे व कवितामागच्या प्रेरणा प्रत्यक्ष त्या त्या लेखक व कवीकडून ऐकण्याचे भाग्य

विद्यार्थ्यांना व पालकांना व शिक्षकांना मिळाले. या संमेलनास नागनाथ कोतापल्ले, विठ्ठल वाघ, प्रा. द. बा. बोधे, महावीर जोंधळे, प्रकाश किनगावकर, लक्ष्मीकांत तांबोळी, सौ. इंदुमती जोधळे, श्री. द. ता. भोसले, श्री. उत्तम कोळगावकर, प्रवीण बांदेकर, इंद्रजीत भालेराव, सौ. संगिता बर्वे असे लेखक व कवी यांनी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष भेटीतून संवाद साधला.[34]

'महात्मा गांधी, विद्यामंदिर, विटा' या शाळेमध्ये अमृत महोत्सवी निमित्ताने माजी विद्यार्थी संघटनेचे कार्याध्यक्ष श्री. देवदत्त राजोपाध्ये व सध्याचे शाळेचे समन्वयक यांच्या पुढाकाराने विनोदी साहित्य लेखिका सौ. मंगला गोडबोले यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले होते. त्याद्वारे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना, पालकांना साहित्य संमेलन म्हणजे काय असते याची माहिती झाली.

### 4.4.5 विशेष उल्लेखनीय कार्य

### घुमवा – गिनिज बुक ऑफ वर्ल्ड

2014 हे सांगली शिक्षण संस्थेचे जन्मशताब्दि वर्ष होते. या शताब्दी वर्षात 'विश्वविक्रम लेझीम' या खेळाची गणना झाल्याने 'सांगली शिक्षण संस्था – शिक्षणाचा मानदंड' असा गौरव श्री. डॉ. श्रीपाद जोशी सर माजी कार्यवाह करतात. 26 जानेवारी 2014 भारताच्या प्रजासत्ताक दिनी सांगली शिक्षण संस्थेतील मुले, मुली शिक्षक व संस्थासंचालकाच्या मदतीने शिवाजी स्टेडिअममध्ये ठीक साडे आठ वाजता, 7338 मुला–मुलींनी एकाच वेळी लेझीम खेळ सादर करून विश्वविक्रम केला, गिनिज बुक ऑफ रेकॉर्डचे मान्यवर अधिकारी याप्रसंगी उपस्थित राहून विश्वविक्रमाचे प्रमाणपत्र अपर्ण केले.[35]

संस्थेच्या आजपर्यंतच्या यशातील मानाचा तुरा म्हणजे 'महालेझीम' या नावाने नोंदविलेला जागतिक विक्रम आहे. सलग वर्षभर सराव करून 7 मिनिटांचा सलग 10 डावांचा लेझीमचा खेळ घुमक्याचा आणि हलगीच्या ठोक्यावर एकसंधपणे तालात संपन्न झालेला आहे. श्री. प्री. दि. जोशी, शिक्षक, पटवर्धन हायस्कूल, सांगली 'पहिला टप्पा शताब्दिचा' या लेखात आपले मनोगत व्यक्त केले आहे.[36] शहरापासून ग्रामीण भागापर्यंत सर्व विद्यार्थ्यांचा यामध्ये सहभाग घेतलेला दिसतो. आधुनिक खेळाबरोबर हळुहळु नामशेष होणा–या खेळांना पुन्हा एकदा समाजाच्या समोर आणण्याचे काम केले आहे. एकाच ठोक्यात सर्वांच्या लेझीम बंद झाल्या, लेझीम, हलगी व घुमक्याची सात मिनिटे टिपलेला आवाज बंद झाला. त्याच क्षणी प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. ''हम करे राष्ट्र आराधन'' या समूहगीताने या महालेझीमची सांगता झाली.

### ऐतिहासिक उपक्रम – सांगली शिक्षण संस्था इतिहास संकलनाचा उपक्रम

कोणत्याही घटनेचा, वास्तूचा त्या काळातील परिस्थितीचा सामाजिक ,आर्थिक, धार्मिक, राजकीय इतिहास जाणून घेणे ही व्यक्तीची किंवा मनुष्य प्राण्याची जिज्ञासा असते व या जिज्ञासेपोटी सांगली शिक्षण संस्थेला 100 वर्ष पूर्ण झाली. या शताब्दी निमित्ताने संस्था कशी घडत गेली. संस्थेच्या स्थापनेमागची उद्दिष्टे व तत्कालीन परिस्थिती कशी होती. या सर्व गोष्टीची माहिती आजच्या व उद्याच्या विद्यार्थी, शिक्षकांना व नागरिकांना व्हावी हा हेतू लक्षात घेऊन त्यासाठी समिती नेमून 'पहिला टप्पा शताब्दिचा' या लेखात श्री. प्री. दि. जोशी सांगतात की, ''गुरूवार दि. 11/04/2013 रोजी गुढी पाडव्याच्या शुभ मुहुर्तावर सांगली शिक्षण संस्थेचा व सिटी हायस्कूलचा इतिहास संकलनाचा आणि लेखनास शुभारंभ करण्यात आला.''[37] इतिहास हा पुरावा असेल तरच तो ग्राह्य धरला जातो.
संस्थेच्या स्थापनेच्या अगोदरच्या घटनाचा आढावा घेऊन तो 2013 पर्यंतची संस्थेची होणारी प्रगती, आलेल्या समस्या त्या परिसरातील देणगीदाराने सढळ हाताने केलेली मदत संस्था चालकांना कोर्टामध्ये सुध्दा जावे लागले. याची ही

माहिती प्रांजळपणाने त्यांनी दिलेली आहे. संचालकांची निवडणूक दर पाच वर्षांनी घेतली जाते. 'कोणतीही व्यक्ती संस्थेपेक्षा मोठी नाही.' या नियमाप्रमाणे पदावर येणा–या प्रत्येक संस्थाचालकांने स्वार्थ, भ्रष्टाचार या गोष्टी बाजूला ठेवून त्याग, संयम, निर्णय, संस्थेची प्रगती, विद्यार्थी, शिक्षक व संस्थेच्या हिताचेचे निर्णय घेतलेले दिसून आले.

**'शतपदी'**

या स्मरणिकेच्या दहा भागांचेही प्रकाशन करण्यात आले. शतपदीमध्ये एकूण 10 खंड तयार केले आहेत. त्यामध्ये संस्थेच्या संस्थापकांची माहिती, त्याचे शिक्षण, वेगवेगळ्या टप्प्यांवर शाळांचा झालेला विस्तार, संस्थेला लाभलेले मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, शिक्षकवृंद, संचालक,माजी विद्यार्थ्याच्या शाळेतील आठवणी यांनी लिहिलेल्या लेखांचा अभ्यास करता आला.

## विशेष योगदान

### संस्थेला मिळालेले प्रतिष्ठित पुरस्कार

सांगली शिक्षण संस्था द्विशताब्दी वर्षात पदार्पण करत असताना संस्थेच्या कार्याची व गुणाची पारख करून नाशिक रोड येथील 'साने गुरूजी शिक्षण प्रसारक मंडळ' या संस्थेच्या वतीने महाराष्ट्रात उत्कृष्ट शैक्षणिक कार्य करणा–या संस्थेला दरवर्षी पुरस्कार देण्यात येतो. हा 'भालचंद्र पुरस्कार' 2014 मध्ये सांगली शिक्षण संस्थेला मिळाला आहे.[38] या निमित्ताने सांगली शिक्षण संस्थेला साने गुरूजी शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेने भेट दिली. 6 एप्रिल 2014 रोजी बापट बालशिक्षण मंदिराच्या सभागृहात टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू दिपक टिळक यांच्या हस्ते व भालचंद्र विश्वनाथ जोशी याच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम झाला.

### गुरूवर्यांना पुरस्काराने सन्मानित करणारी सांगली शिक्षण संस्था

1. दामू आण्णांच्या आदर्श व्यक्तिमत्वाचा व शिक्षकी पेशाचा सन्मान म्हणून सांगली शिक्षण संस्थेत एक **''आचार्य पुरस्कार''** नावाचा पुरस्कार दरवर्षी संस्थेतील उत्कृष्ट शिक्षकांना दिला जातो.

   सिटी स्कूलच्या सुरूवातीच्या काळात ज्या शिक्षकांचे योगदान महत्त्वाचे ठरले, त्या शिक्षकांपैकी एक म्हणजे दा. धो. तथा दामूआण्णा केळकर, ध्येयवाद व निष्ठा केळकर यांच्या अंगी होता. शरीरसंपदा व विद्याव्यासंग अशा दोन्ही गोष्टी ते विद्यार्थ्यांना करायला लावत होते. लहान, मोठा, गरीब, श्रीमंत असा भेदभाव ते करत नव्हते. खेळत, शास्त्र, गणित, इंग्रजी हे अभ्यासाचे विषय वा तालमीचे धडे ते चांगल्या पद्धतीने शिकवित होते. चित्रकला, हस्तव्यवसाय, नीट, रेखीव लेखन, प्रसन्न, मनमोकळे हास्य व प्रेमळ स्वभाव यामुळे विद्यार्थी वर्गातही प्रिय शिक्षक होते. त्यांच्या निर्वाणानंतर 'भालबा केळकर' यांनी फेब्रुवारी 1988 मध्ये एक योजना सुचविली. त्यानुसार संस्थेच्या सुरूवातीच्या काळात शिक्षकांना त्यांच्या नावाचा पुरस्कार द्यावा अशी कल्पना सुचवली.

   संस्थेच्या निवृत्त शिक्षकांच्या यादीमधून चाचणी पद्धतीने 3 किंवा 5 मुख्याध्यापक वा शिक्षक यांची नावे निवडावीत व त्यांना प्रत्येकी एक हजार रूपये रोख व ताम्रपट देण्यात यावे अशी त्यांच्या कुटुंबियांची योजना होती. दि.04/03/1988 रोजी 'आचार्य पुरस्कार' जाहीर करण्यात आला. पुढे 01 मे 1989 मध्ये या योजनेत काही बदल करून केळकर कुटुंबियाने अकरा हजार रूपये एण्डाऊमेंट स्वरूपात देणगी दिली. त्याच्या व्याजातून दर वर्षी 4 डिसेंबरला हा पुरस्कार कै. दा. धों. केळकर स्मृती आचार्य पुरस्कार असे नाव देण्यात आले. या पुरस्काराची अमंलबजावणी 04 डिसेंबर 1989 पासून करण्यात आले आहे.

2. सांगलीतील राष्ट्रीय विचारांचे ध्येयनिष्ठ सामाजिक कार्यकर्ते कै. बाबासाहेब पोतदार यांच्या स्मरणार्थ **'शिक्षणसेवा गौरव पुरस्कार'** सांगली शिक्षण संस्थेच्या वर्धापन दिन प्रदान केले जातात. या पुरस्काराची सुरूवात सन 1987–88 पासून झाली. हा पुरस्कार संस्थेमधील शिक्षक किंवा मुख्याध्यापक यांना सेवामधील कार्याबद्दल दिला जातो. सन 2016 चा पुरस्कार श्रीमती अपर्णा प्रभाकर जोशी या सेवानिवृत्त मुख्याध्यापिका यांना प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार सन 1989–90 पासून सुरू
3. **कै. दा. धों. केळकर यांचे स्मृतीप्रीत्यर्थ आचार्य पुरस्कार** संस्थेमधील सेवानिवृत्त शिक्षक व मुख्याध्यापक यांना त्याच्या सेवेमधील कार्याबद्दल हा पुरस्कार दिला जातो. सन 2016 चा पुरस्कार श्री. रामचंद्र गणपती शिंत्रे यांना मिळाला.
4. **कै. सौ. हेमलता हेरंब सहस्त्रबुध्दे, आदर्श शिक्षिका पुरस्कार** यासाठी कै. हेरंब गणेश सहस्त्रबुध्दे, पुणे यांच्याकडून देणगी मिळाली आहे. सन 1995–96 पासून हा पुरस्कार दिला जातो. हा पुरस्कार संस्थेमधील प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक व महाविद्यालयातील शिक्षिकास त्यांच्या सेवेमधील कार्याबद्दल दिला जातो. सन 2016 चा पुरस्कार सौ. जयश्री राजेंद्र कवठेकर यांना दिला गेला.
5. **गुरूवर्य मामा महाराज केळकर समाजसेवा पुरस्कारा**साठी कै. प्रा. क. श्री. काळे यांनी देणगी दिली आहे. ही योजना सन 1998–99 पासून सुरू झाली हा पुरस्कार संस्थेमधील सेवेबरोबरच सामाजिक कार्य करणा–या शिक्षक वा मुख्याध्यापक यांना दिला जातो. आत्तापर्यंत अठरा जणांना हा पुरस्कार मिळाला आहे. सन 2016 चा श्री. विष्णू अनंत म्हसकर यांना प्राप्त झाला.
6. **कै. भाऊराव रामचंद्र कुलकर्णी यांचे स्मृतीप्रीत्यर्थ गुणवंत शिक्षक पुरस्कार** सन 2001–02 पासून सुरू झाला या पुरस्कारासाठी कै. ग. भी. कुलकर्णी यांनी देणगी दिली. संस्थेमधील प्राथमिक व माध्यमिक शिक्षिकास त्यांच्या सेवेमधील कार्याबद्दल पुरस्कार दिला. सन 2016 चा पुरस्कार श्री. संजीव पांडुरंग चौगुले यांना प्रदान करण्यात आला.
7. **डॉ. गोविंद व सुलोचना जोशी बालमित्र पुरस्कार,** देणगी डॉ. गोविंद शंकर जोशी, सांगली यांनी दिला आहे. हा पुरस्कार सन 2002–03 पासून सुरू करण्यात आला. हा पुरस्कार संस्थेमधील पूर्व प्राथमिक शाळेतील शिक्षिकास हा पुरस्कार दिला जातो. सन 2016 च्या पुरस्कार सौ. मनिषा नरेंद्र बसगडेकर यांना दिला गेला.
8. **कै. पी. ए. जोशी यांचे स्मरणार्थ विज्ञान शिक्षक पुरस्कार**साठी श्री. अ. प्र. जोशी, सांगली यांनी देणगी दिली होती. ही योजना सन 2004–05 पासून सुरू करण्यात आली. संस्थेमधील माध्यमिक शाळामध्ये शास्त्र विषयाचे अद्यापन करण्या–या शिक्षिकास त्यांच्या सेवेमधील कार्याबद्दल दिला जातो. सन 2016 चा पुरस्कार सौ. विद्या श्रीपाद जाधव यांना दिला गेला.
9. **प्राचार्य श्री. क. श्री. काळे पारितोषिक**, सन 1999–2000 पासून सुरू करण्यात आले. हा पुरस्कार संस्थेमधील सेवानिवृत्त शिक्षकेत्तर, सेवाव्रती, सत्वशिल व निष्ठावंत व्यक्तीस दिला जातो. सन 2016 चा पुरस्कार श्री. चंद्रशेखर दत्तात्रेय ठाकुर यांना प्रदान करण्यात आला.
10. **न. वा. निजसुरे पारितोषिक** यासाठी देणगी म्हणून श्रीमती प्रभा नरहरी निजसुरे, ठाणे यांनी दिली आहे. हा पुरस्कार सन 2009–2010 पासून दिला जातो. संस्थेमधील पूर्वप्राथमिके, प्राथमिक, माध्यमिक शाळांमधील, महाविद्यालयीन जेष्ठ लेखनिकास त्यांच्या सेवेमधील कार्याबद्दल दिला जातो. सन 2016 चा पुरस्कार श्री. यदुप्रसाद विलास जोशी यांना प्रदान करण्यात आला. हाच पुरस्कार चतुर्थश्रेणी म्हणून सेवेत असणा–या व्यक्तींनासुद्धा देण्यात आला. सन 2016 चा पुरस्कार श्री. पोपट लक्ष्मण जोपळे (शिपाई) यांना देण्यात आला.
11. **कै. वि. भा. पटवर्धन यांचे स्मृतीप्रीत्यर्थ इंग्रजी शिक्षक पुरस्कारसाठी** सौ. विद्या रामचंद्र पटवर्धन, बुधगांव यांनी देणगी दिली आहे. सन 2010–11 पासून या पुरस्काराला सुरूवात झाली. संस्थेमधील माध्यमिक शाळेमधून

सेवानिवृत्त झालेल्या इंग्रजी विषयाच्या शिक्षक अक्षरप शिक्षिकेस त्याच्या सेवेमधील कार्याबद्दल दिला जातो. सन 2016 चा पुरस्कार सौ. सुनंदा जयंत देशपांडे यांना दिला गेला.

12. **कै. अनंत सदाशिव म्हसकर, संस्था कार्यालय प्रथम लिपीक यांचे पुण्यस्मरणार्थ पारितोषिक** देणगीदार श्री. विष्णुपंत अनंत म्हसकर, सांगली यांनी दिली. हा पुरस्कार सन 2009–2010 पासून सुरू झाला. सांगली शिक्षण संस्थेच्या कार्यालयातील सेवकास दिला जातो. सन 2016 चा पुरस्कार श्री. नारायण भास्कर फडके यांना दिला.
13. **सदुभाऊ महाबळ शिक्षक पुरस्कारासाठी** श्री. हरी महाबळ, सांगली यांनी देणगी दिली आहे. सन 2013–14 पासून हा पुरस्कार संस्थेमधील माध्यमिक शाळेतील क्रीडा शिक्षक अथवा शिक्षिकेस त्यांच्या सेवेमधील कार्याबद्दल हा पुरस्कार दिला जातो. सन 2016 चा पुरस्कार सौ. इंदिरा आण्णासाहेब माळी यांना दिला गेला.
14. **कै. इंदिराबाई महाबळ बालसंगोपन पुरस्कारासाठी** देणगीदार म्हणून श्रीमती सुनंदा सदानंद भिडे, सांगली यांनी दिली. सन 2013–14 पासून हा पुरस्कार दिला जातो. सन 2016 चा पुरस्कार सौ. रेखा अनिल जोशी यांना दिला गेला.
15. **वसंत पांडुरंग दातार, लेखनिक पारितोषिकासाठी** देणगीदार म्हणून श्रीमती मंगला वसंत दातार यांनी दिली. सन 2014–15 पासून हा पुरस्कार दिला जातो. संस्थेच्या पूर्व प्राथमिक, माध्यमिक शाळांमधील व संस्था कार्यालयातील लेखनिकांना वसंत पांडुरंग दातार यांचे स्मरणार्थ लेखनिक पुरस्कार दिला जातो. सन 2016 चा पुरस्कार श्री. प्रकाश मधुकर कुलकर्णी यांना प्रदान करण्यात आला.
16. **कै. शाम वामन हेर्लेकर आदर्श शिक्षक पुरस्कार** यासाठी श्री. रविंद्र शाम हेर्लेकर यांनी देणगी दिली. सन 2014–15 पासून हा पुरस्कार देण्यात येवू लागला. संस्थेच्या प्राथमिक, माध्यमिक शाळांतील मुख्याध्यापक किंवा शिक्षक, संस्थेचा माजी विद्यार्थी असावा. अध्यापनाबरोबर नाटक, संगीत, कला, क्रिडा, वक्तृत्व तसेच शालाबाह्य उपक्रमासाठी विशेष प्रयत्न करणारास श्री. शा. वा. हेर्लेकर पुरस्कार दिला जातो. सन 2016 चा पुरस्कार श्री. संजीव गोविंद कुलकर्णी यांना प्रदान करण्यात आला.[39]

सांगली शिक्षण संस्था ही गुणांची पारक करणारी खाण आहे. चुकीच्या गोष्टींना माफी नसते व कर्तृत्वान व्यक्तीला शाब्बासकीची थाप देण्यात ही कुचराई करत नाही.

## विशेष यशाची शिखरे पादाक्रांत करणारे विद्यार्थी व विद्यार्थिनी

### 1. श्री. चंद्रकांत कृ. यडूरकर–

1955 ते 1957 या कालावधीत मिरज हायस्कूलमध्ये शिक्षण झाले. ते आज महाराष्ट्र राज्य नाट्य परिषदमध्ये निमंत्रित/सल्लागार सदस्य म्हणून काम करत आहे. नाट्य क्षेत्रात सेवानिवृत्तीने काम केले म्हणून सन 2010 मध्ये शरदराव पवार यांचे हस्ते 'अखिल भारतीय नाट्य परिषदे'च्या वतीने अमेरिकेत गौरव झाला. सन 2014 साली महाराष्ट्र शासनाच्या वतीने गौरव झाला.[40]

### 2. श्री. म. अ. कुलकर्णी –

शालेय जीवनातील पट्टीचे वक्ते म्हणून सर्वज्ञात होते ते पावस जिल्ह्यातील रत्नागिरी येथील स्वामी स्वरूपानंद यांच्या शिष्यपरंपरेने नावारूपास आले. श्री. स्वरूपानंदांचे शिष्य श्री. अमलानंद व त्यांचे शिष्य श्री. प्रज्ञानंद म्हणजे म. अ. कुलकर्णी ! सध्या श्री. स्वामी स्वरूपानंदाचे कार्य ते पुढे चालवित आहेत.[41]

**3. कै. विष्णुपंत सावर्डेकर**

त्यांच्या मल्लविद्येतील कार्याचा यथोचित गौरव म्हणून महाराष्ट्र शासनाने 2004 साली ''दादोजी कोंडदेव'' पुरस्कार प्रदान करून सन्मान केला.

**4. वसंतराव गोरे –**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तळमळीचे कार्यकर्ते, आणीबाणीच्या काळात कारावास सोसूनही त्यांनी कौटुंबिक अडचणीतून मार्ग काढीत संघाचे कार्य केले. मिरजेजवळ बेळंकी गावांत, ओसाड माळरानावर स्टीलचे स्क्रू, नटबोल्ट इ. तयार करण्याचा कारखाना, वनौषधी तयार करण्याचा कारखाना तसेच फलोद्यानाचा व्यवसाय उभा करून स्थानिक पुरूष – महिलांना (मागासवर्गीय संख्या जास्त) उपजिविकेचे साधन निर्माण करून दिले.

**5. श्री. मनोहर मराठे –**

राज्यव्यापी महाराष्ट्र सबॉर्डिनेट इंजिनिअर्स असोसिएशनचे ते बरेच वर्ष अध्यक्ष होते. सबॉर्डिनेट इंजिनिअर्सना त्यांचे हक्क मिळवून देण्यात मराठेंचा सिंहाचा वाटा आहे.

**ऑस्करपर्यंतचा टप्पा –**

1. सिटी हायस्कूलच्या विद्यार्थिनी सौ. माधवी घारपुरे यांच्या 'किमयागार' या कथेवर आधारित 'श्वास' या नावाचा एक मराठी चित्रपट बनविला. या चित्रपटाने राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त केले. शिवाय ऑस्कर पुरस्कारासाठी नामांकनही मिळविली.[42]
2. 1921 साली सिटी हायस्कूलची पहिली तुकडी तत्कालीन मॅट्रिकच्या परिक्षेला बसली. 1926 मध्ये या शाळेच्या एका विद्यार्थ्याने मॅट्रिकच्या परिक्षेत शाळेला पहिली शंकरशेठ शिष्यवृत्ती मिळवून दिली. तो विद्यार्थी म्हणजे प्रख्यात न्यायमूर्ती राम केशव रानडे होते.
3. वसंतराव वैद्य जे. एल. रानडे, गजाननराव वाटवे, मामा पेंडसे, चित्तरंजन कोल्हटकर, अशोक जी परांजपे, आचार्य वि. प्र. लिमये, माधव खाडिलकर, भाग्यश्री ठिपसे, हरी नाना पवार, विष्णू सावर्डे, अक्षरवेडा र. कृ. जोशी, डॉ. सुभाष भेंडे. अशा या शाळेच्या अनेक नामवंत विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात आपले कर्तृत्व सिध्द केलेले आहे.
4. अखिल महिला भारतीय बुध्दिबळ स्पर्धा विजेती व आशियायी विजेती ग्रॅंडमास्तर भाग्यश्री साठे आणि लहान वयात आपल्या नावावर निरनिराळे आंतरराष्ट्रीय पुरस्कार जमा करणारी आंतरराष्ट्रीय मास्टर कु. स्वाती घाटे हिने 19 जुलै 1992 मध्ये जर्मनीतील DVISBURG येथे भारताचे प्रतिनिधित्व वयाच्या 12 व्या वर्षी केले तर त्याच वर्षी कलकत्ता आणि कालिकत येथील जागतिक बुध्दिबळ स्पर्धेत उत्कृष्ट यश संपादन केले.[43] राज्य व राष्ट्रीय पातळीवर 14 स्पर्धेत भाग घेतला तर 1995 या वर्षात ब्राझील येथील आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भाग.
5. अतुल गर्दे हा उत्तम गिटार वादक आहे. 'विश्वास सपकाळ' हा इजिप्तमध्ये उपराजदूत म्हणून रूजू आहे.

निशांत घाटगे – नाट्य व सिने वितरक आहे. आपलं एफ. एम. वरची आर. टी. माहेश्वरी ही सर्व विद्यार्थी 1986 च्या बॅचमधील आहेत.[44]

6. सिटी हायस्कूलचा 1956 सालचा विद्यार्थी म. रा. देवधर हा राष्ट्रभाषा पंडित परिक्षेत उत्तीर्ण झाला. तो पंडित होणारा हा संस्थेतील पहिला विद्यार्थी आहे.[45]
7. च. वा. ज्ञानमंदिर तासगावचा विद्यार्थी शाम सोनवणे याने 10201 जोर काढून जागतिक विक्रम प्रस्थापित केला. राष्ट्रीय जलतरणपटू कु. वैशाली पाटील हिची निवड झाली होती.
8. 1988 साली सिटी हायस्कूलची अबोली वसंत शिरगुप्पे हिने जलतरणात दुसरा क्रमांक मिळविला आहे.
9. सन 2000 मध्ये पुरोहित कन्या शाळेची अश्विनी बिनीवाले हिची महाराष्ट्र महिला (शालीय) क्रिकेट संघाची कर्णधार म्हणून निवड.

## शासकिय उपक्रम पंचायत राज प्रशिक्षण

73 व्या घटना दुरुस्तीद्वारे पंचायत व्यवस्थेत 30 टक्के जागा महिलांना राखीव व मागासवर्गीयांसाठी राखीव ठेवल्याने ग्रामपंचायतीमध्ये निवडून आलेल्या सदस्यांपैकी बहुतांशी सर्व सदस्यांचे ग्रामपंचायतीच्या एकूण कारभाराबद्दल प्रशिक्षण आवश्यक आहे.म्हणून ग्रामीण विकास मंत्रालयाने शासनाद्वारे ग्रामंपंचायत सदस्यानां,ग्रामंपंचायत कारभाराचे मूलभूत ज्ञान व्हावे, त्यांच्यात हक्क व कर्तव्याची जाणीव निर्माण व्हावी व शासकीय योजनांचा लाभ घेता यावा.समाजाच्या सहकार्याने गावाचा सर्वांगीन विकास घडवून आणावा या उद्देशाने 'पंचायतराज प्रशिक्षण' हा महाराष्ट शासनाने,यशदा पुणे याद्वारे प्रशिक्षण दिले होते..सागंली जिल्हयातील ग्रामपंचायत सदस्याची प्रशिक्षणची जबाबदारी ग्रामविकास मंत्री आण्णा डांगे व रामभाउ म्हाळगी प्रबोधिनी मुंबई यांनी सांगली शिक्षण संस्थेकडे सोपविली प्रमुख म्हणून म.आ.माळी यांची निवड केली होती.[46]

## संदर्भ साधने

1. वसंत आपटे, संकलक व लेखक ,सांगली शिक्षण संस्था, सिटी हायस्कूल 1914–2014 इतिहास ग्रंथ पृष्ठ क. 169
2. कित्ता पृष्ठ क.445,
3. वसंत आपटे, संकलक व लेखक – सांगली शिक्षण संस्था, सिटी हायस्कूल 1914 ते 2014 इतिहास ग्रंथ,पृष्ठ क्र.. 419
4 कित्ता पृष्ठ क्र. 435
5 कित्ता पृष्ठ क. 436
6. डॉ. न. म. जोशी, माजी विद्यार्थी, शपदी 1914–1923, खंड–1 प पृष्ठ क्र. 46
7.स्मरणिका–शतपदी 2004–2013, प्रकाशक–कार्यवाह सांगली शिक्षण संस्था खड,10 पृष्ठ क्र क्र .130
8. कित्ता पृष्ठ क. 132
9. श्री.मुकुंद चिंतामणी जोग, 'उदबोधन एक वर्ग आढावा'या लेखात शतपदी–1994–2003, प्रकाशक–कार्यवाहसांगली शिक्षण संस्था, खंड–9 पृष्ठ क्र.. 83
10. कित्ता पृष्ठ क्र.. 83
11. श्री. विवके कान्हेरे, प्रयोगशाळा, सहाय्यक, शतपदी 1974–1983 प्रकाशक–कार्यवाह सांगली शिक्षण संस्था खंड–7 पृष्ठ क्र.. 43
12. कित्ता पृष्ठ क्र.. 43, 44
13. कित्ता पृष्ठ क्र.. 46
14. कित्ता पृष्ठ क्र.. 46
15. सौ. प्राची गोडबोले, शिक्षक पटवर्धन हायस्कूल, शतपदी 2004–2013 खंड–10, पृष्ठ क्र. 95 ते 97
16. सौ. शर्वरी अरगडे, शतपदी 1994–2003, प्रकाशक कार्यवाह खंड–9, पृष्ठ क्र. .87
17. श्री. ब. नि. कुंभार, शिक्षक चं. वा. ज्ञानमंदिर, तासगांव, शतपदी 1984–1993, प्रकाशक कार्यवाह सांगली शिक्षण संस्था, खंड 8,पृष्ठ क्र. 71 ते 76
18. कित्ता पृष्ठ क्र .71 ते 76
19. श्री. उ. द. पोतदार, शिक्षक, पटवर्धन हायस्कूल, सांगली शतपदी 2004–13 पृष्ट क. 109
20 श्री. दीपक लेले, माजी शिक्षक, शतपदी 2004–13, खंड–10, पृष्ठ क्र.. 113
21 .श्री. नवनाथ राजाराम लाड, शिक्षक, मालू हायस्कुल, सांगली शतपदी 1924–1933, प्रकाशक– कार्यवाह सांगली शिक्षण संस्था खंड–2 पृष्ठ क्र.. 117 ते 121
22. कित्ता पृष्ठ क्र.. 120
23. वसंत आपटे, संकलक व लेखक, उपरनिर्दिष्ट पृष्ठ क्र.. 567
24. कित्ता पृष्ठ क्र.. 567
25. श्री. विजय बक्षी, माजी ग्रंथपाल, सिटी हायस्कुल सांगली, शतपदी 1994–2003, प्रकाशक–कार्यवाह,सांगली शिक्षण संस्था खंड–9 पृष्ठ क्र... 113, 13
26 श्री. सागर स. सगरे, शिक्षक, शतपदी 2004–2013, प्रकाशक–कार्यवाह सांगली शिक्षण संस्था खंड–1 ,पृष्ठ क्र.87

27. जयश्री कवठेकर ,म.गांधी विद्यामंदीर विटा, पर्यवेक्षिका एक चर्चा.
28. श्रीमती शमा कुलकर्णी, माजी मुख्याध्यापिका, शतपदी 1914–1923, प्रकाशक–कार्यवाह, सांगली शिक्षण संस्था खंड–1 पृष्ठ क्र.. 69, 70
29. सौ. सु. श. देशपांडे, माजी शिक्षिका, 'गणेशोत्सव–काल आणि आज', पर्व चौथे, शतपदी 1944–1953, प्रकाशक–कार्यवाह, सांगली शिक्षण संस्था खंड–4 पृष्ठ क्र.. 64, 46
30. श्री. नितिन जोशी, शिक्षक, चं. वा. ज्ञानमंदिर, तासगांव 'असे रूजले बीज,' शतपदी 1944–1953, प्रकाशक–कार्यवाह,सांगली शिक्षण संस्था खंड–4 पृष्ठ क्र.. 28
31. श्री. विजय बक्षी, माजी ग्रंथपाल, शतपदी 1924–1933, प्रकाशक–कार्यवाह सांगली शिक्षण संस्था, खंड–2, पृष्ठ क्र. 29 ते 34
32. श्री वसंत आपटे,लेखक व संकलक,उपरनिर्दिष्ट पृ. क. 568–571.
33 कित्ता पृ.क्र 568
34. श्री. प्री. दि. जोशी, उपरनिर्दिष्ट पृष्ठ क्र.. 9
35. श्री. ह. ल. तथा विजय भिडे, संचालक, सांगली शिक्षण संस्था, शतपदी 2003–2014, प्रकाशक–कार्यवाह, सांगली शिक्षण संस्था, खंड–10, पृष्ठ क्र.. 81
36. श्री. प्री. दि. जोशी, उपरनिर्दिष्ट, शतपदी 2004–2013, खंड–10 पृष्ठ क्र.. .9
37. कित्ता पृ.क. 9
38. श्री. वसंत आपटे, लेखक व संकलक, उपरनिर्दिष्ट, पृष्ठ क्र.. .539, 540
39. शिक्षक गौरव पूरस्कार 2016–2017 या अंकातून
40 श्री चंद्रकात यड्रूकर माजी विद्यार्थी स्मरणिका शतपदी 1944–1953 पृष्ट क.113
41. श्री रामनाथ बेलवलकर"आठवणीतील गुरुजन'' या लेखातून शतपदी 1944–1953, खंड 4 पृष्ठ क.112
42. प्री.द.जोशी उपरनिर्दिष्ट शतपदी 2004–2013 खंड 1पृष्ठ.क.4
43. अमृत महोत्सव स्मरणिका पुनमर्द्रण, शतपदी 1914–1923, खंड 1 पृष्ठ क.114
44. शारदा कुलकर्णी केळकर ''क्षण स्मृतींचे मधूकण आनंदाचे'', या लेखात शतपदी 1984–1993 खंड 8 पृष्ठ क.43
45 श्री शि.वा.पुजारी यांच्या"नव हिदवी युगाचे आम्हीच शिल्पकार."शतपदी1954–63 खंड 5 पृष्ट क5
46. श्री विजय बक्षी,माजी ग्रंथपाल ,उपरनिर्दिष्ट शतपदी 1924–33 ,खंड 2,पृष्ठ क.101

# प्रकरण 5 वे
# उपसंहार

**प्रकरण 1 मध्ये**

सांगली शिक्षण संस्थेचा अभ्यास करताना सांगली जिल्ह्याचा प्राचीन, मध्ययुगीन, अर्वाचीन इतिहास जाणून घेण्याचा प्रयत्न पहिल्या प्रकरणाने केला आहे. सांगलीचा इतिहास फक्त 200 वर्षाचा आहे. पण प्राचीन सांगली न म्हणता मिरींच प्रांतामध्ये कोणत्या घराण्याची सत्ता होती. कुठेपर्यंत हा प्रांत जोडून होता व सांगली जिल्ह्याशी पटवर्धन घराण्याचा संबंध कसा निर्माण झाला. पेशव्यांचा व पटवर्धन घराण्यांचा संबंध कसा निर्माण झाला. या घराण्यामध्ये पटवर्धनांनी संस्थानिकांचा कारभार कशा प्रकारे सांभाळला, पेशव्यांच्या समवेत मोहिमेत ते कसे सामील झाले. सांगली संस्थानाचे क्षेत्रफळ, सांगलीचा भौगोलिक इतिहास, इंग्रज व पटवर्धन यांची कारकीर्द व पेशव्यांची कारकीर्द याचाही आढावा घेतला आहे. इंग्रजांचे संस्थानिक खालसा धोरण व पटवर्धन घराणे याचा आढावा घेता आला. त्याचबरोबर सांगली स्वतंत्र संस्थान, सांगली जिल्ह्याची निर्मिती कशी झाली आहे.इंग्रजांच्या कारकिर्दीमध्ये, पेशवे व पटवर्धन घराण्याची सत्ता खालसा झाली. इथंपर्यंतचा आढावा घेतला आहे.

**प्रकरण 2 मध्ये**

1910 चा काळ हा जहालांच्या उदयाचा काळ, राष्ट्रीय आंदोलनाचा काळ होता. छत्रपती शिवाजी महाराज, समर्थ रामदास, लोकमान्य टिळक, आगरकर, स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रभावी राष्ट्रीय विचारांनी काही तरूणांची मने भारून गेली होती. राष्ट्रीय विचार, खंबीर मने, खंबीर शरीर व देशासाठी त्याग करण्याची वृत्ती असलेली माणसेच भविष्यकाळाची आशा निर्माण करू शकतात. स्वातंत्र्य चळवळीत भाग घेण्यासाठी प्रत्येकाचे मार्ग भिन्न होते परंतु देशहित हेच त्यापाठीमागचे ध्येय होते. ज्यांना जमेल त्या मार्गाने राष्ट्रीय जागृतीचे कार्य करण्याचा प्रयत्न त्या काळामध्ये केला. हा काळ अत्यंत बिकट–हालअपेष्टांचा होता. राष्ट्रीय आंदोलनाच्या काळात देशात हेच घडत होते.

**प्रकरण 3 मध्ये**

सांगली हे शिक्षणाचे केंद्र. सरकारी हायस्कूलमध्ये शिक्षण घेण्यासाठी लांबलांबचे विद्यार्थी येत. माधुकरी मागून, काबाडकष्ट करून, उदरनिर्वाह करून शिक्षण पूर्ण करणारी गरीब मुलेही या शाळेत येत होती. आसपासच्या गावात फक्त प्राथमिक शाळा होत्या. सरकारी हायस्कूलमध्ये नामवंत, गुणी व विद्वान शिक्षक होते. आपणही राष्ट्रीय शिक्षण देणारी संस्था निर्माण करावी असे या चार संस्थापकांना वाटले. त्या स्वप्नांना मूर्त स्वरूप देण्याचे काम कै धाडा दि. 4 डिसेंबर 1914 रोजी संस्थापकांनी केले. केवळ पुस्तकी ज्ञान घेतलेला, दुबळा विद्यार्थी त्यांना आपल्या शाळेत तयार करायचा नव्हता. चारित्र्यसंपन्न, देशाभिमानी, शरीरश्रमाची आवड असलेला सेवाभावी, स्वावलंबी विद्यार्थी त्यांना आपल्या शाळेत घडवायचा होता. यासाठी जुन्या चाको–या सोडून देऊन, व्यायाम, खेळ, नैतिक शिक्षण, हस्तव्यवसाय, विद्यार्थी–सहकारी–भांडार, चरख्यावरती सूत विणणे, खडू बनविणे, समाजसेवा, संगीत इ. विविध पूरक गोष्टींची जोड देऊन विद्यार्थीजीवन समृध्द व समाजाच्या दृष्टीने उपयुक्त करण्याचा संस्थापकांनी प्रयत्न केला आहे. 'आधी केले मग सांगितले' अशा पद्धतीने त्यांचे कार्य होते. संस्थापक हे 'पैशाने 'गरीब' असलेली माणसे होती, पण विचाराने 'श्रीमंत' होती. त्यांची जिद्द व झेप मोठी होती. त्यामुळे जागेच्या अभावी आणि आर्थिक अडचणीमुळे हातातील उपक्रम त्यांना बंद करावे लागले. त्यापैकीच विणकाम शिकविण्याचा वर्ग 1921 नंतर बंद करण्यात आला. वसतिगृह चालविण्याचा 1923 व 1928 मध्ये दोनदा प्रयत्न झाला. पण प्रतिसाद न मिळाल्याने व आर्थिक अडचणीमुळे हा प्रयोग

सोडून द्यावा लागला. आजच्या बदलत्या काळात वस्तीगृहाची नितांत गरज आहे. अत्यंत अडचणीच्या काळात संस्थापकांनी आपल्या स्नेहबंधाकडून त्या जागा भाडे तत्त्वावर घेऊन व काही हिंतचिंतकांकडून वापरण्यास घेऊन तालमीची व क्रीडांगणाची सोय केली. आज सांगली शिक्षण संस्थेकडे पूर्व प्राथमिकच्या 8 शाळा, प्राथमिकच्या 8 शाळा, माध्यमिकच्या 12 शाळा, इंग्रजी माध्यमच्या 2 शाळा, उच्चमाध्यमिकची 3 शाखा आणि 1 महाविद्यालय कॉलेज असा विस्तार झाला आहे. या शाळांसाठी उदार हस्ते ज्या ज्या व्यक्तींनी देणगी दिली त्यांची नावे शाळा कॉलेज, वर्गखोल्या इत्यादींना दिली आहेत. याचा आढावा घेतला. द्विशताब्दि वर्षात पदार्पण करत असताना सर्व शाळांकडे व्यायामशाळा, देशी–विदेशी खेळ, मुलांना खेळता येईल असे क्रीडांगण, खेळाचे साहित्य शाळेकडे उपलब्ध आहे. लेखन, संगीत, वक्तृत्व, नाट्य यातील स्पर्धात मुलांना तज्ज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन मिळते. शाळेत व क्रीडांगणावर तयार झालेला शिस्तबध्द विद्यार्थी समाजात उठून दिसतो. यासाठी ध्येयनिष्ठ, चारित्र्यसंपन्न, निर्व्यसनी, शिस्तबध्द शिक्षकच विद्यार्थी जीवनावर योग्य प्रभाव पाडू शकतात हे या सांगली शिक्षण संस्थेचा अभ्यास करताना दिसून येते. सांगली शिक्षण संस्थेची पहिली शाळा 4 डिसेंबर 1914 रोजी स्थापन झाली. आज ती द्विशताब्दी वर्षात पदार्पण करत असताना गेल्या 100 वर्षांतील तिची जडणघडण, तिचा विस्तार तिला आलेले अनुभव, समस्या त्यावरील उपाय, संस्थेचा विस्तार होत असताना फी वाढ, शाळेच्या इमारतीचे नूतनीकरण, शिक्षकाच्या नेमणूका, बदल्या, संस्थेला नुकसानीत /संकटात टाकणा–यांच्यावरती कठोर कारवाई असे निर्णय संस्थेला वेळोवेळी घ्यावे लागले.त्याचबरोबर संस्थेने शहरांपासून ग्रामीण भागापर्यंत सांगली जिल्ह्यात विस्ताराचे कार्य केले आहे. त्याचबरोबर संस्थेने पुण्यातील एक शाळा हेही आपल्या विस्तारामध्ये घेतले आहे. समाजाच्या आजच्या गरजा ओळखून शालेय शिक्षणाबरोबर व्यापार, उद्योग, शेती, तांत्रिक शिक्षण इत्यादींची जोड देण्याचा प्रयत्न संस्थेने केला आहे. व्यावहारिक जगात विद्यार्थ्यांची झेप गरुडा सारखी असावी.

सांगली शिक्षण संस्थेची पहिली शाळा 04 डिसेंबर 1914 रोजी स्थापन झाली. आज ती द्विशताब्दी वर्षात पदार्पण करत असताना गेल्या शंभर वर्षातील तिची जडण–घडण, तिचा विस्तार, तिला आलेले अनुभव, समस्या, त्यावरील उपाय यासर्व बाबींची माहिती दिलेली आहे. 1914 च्या काळात इंग्रजी, मराठी, फारशी व मोडी या कार्यालयीन भाषा होत्या. या संस्थेची कागदपत्रे मोडी भाषेत आहेत. संस्थेच्या नोंदी, रजिस्टर, हजेरी पत्रक हे इंग्रजी व मोडी भाषेत आहेत.

या शंभर वर्षांत आर्थिक, सामाजिक क्षेत्रात परिवर्तने झाली आणि काळाप्रमाणे संस्थाही बदलू लागली. तरी आपल्या मुलभूत मुल्यांशी, तत्वांशी जोडून आहे. संस्थेचा अभ्यास करत असताना स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर या दोन टप्प्यांवर संस्था कार्य करत आहे व शाळांचाही विस्तार झाला आहे. इंग्रजांच्या काळातील शिक्षण पद्धती, संस्थानिकांनी चालवलेले वर्ग या सर्वांची माहिती दस्ताऐवजांमुळे होते.

**प्रकरण 4 मध्ये**

समाजाच्या आजच्या गरजा ओळखून शालेय शिक्षणाबरोबर व्यापार, उद्योग, शेती, तांत्रिक शिक्षण इत्यादींशी जोड देण्याचा प्रयत्न संस्थेनी केला आहे. सांगली शिक्षण संस्थेचे सामाजिक क्षेत्रातील उपक्रम यामध्ये स्वातंत्र्यानंतर संस्थेची प्रगती, संस्थेने घेतलेले निर्णय हे नक्कीच प्रशंसनीय वाटतात. त्याचबरोबर शिक्षणक्षेत्रात शासनाने सुध्दा खूप लक्ष घातले. संस्थेनेही चळवळी, राजकीय पक्ष यापासून बाजूला राहून विद्यार्थी घडविणा–या शिक्षणाला महत्त्व दिले. राष्ट्रकार्य, समाजकार्य जाणणारा विद्यार्थी तयार व्हावा हाच उद्देश समोर ठेवून ध्येयनिष्ठ संस्थापकांचे स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी संस्थाचालक, शिक्षक, कर्मचारी वर्ग यांनी आपल्यावर आहे हे जाणून विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून त्यांच्या सर्वांगीण विकासाचे प्रयत्न, शारीरिक, बौध्दिक, मानसिक विकासाचे उपक्रम राबविले. उदा. राष्ट्रीय प्रज्ञा शोध परिक्षा, सुंदर हस्ताक्षर स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, शारदोत्सव, गणेशोत्सव, गोकुळाष्टमी, बालनाट्य स्पर्धा, साहित्यक परंपरा साहित्य संमेलन, रक्तदान शिबीर, शिक्षक, पालक व माता–पालक संघ उपक्रम ,माजी विद्यार्थी संघटना

उपक्रम असे उपक्रम घेतले गेले. संस्था द्विशताब्दी वर्षात पदार्पण करीत असताना या सोहळ्याचे प्रमुख अतिथी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरचिटणीस मोहनजी भागवत सर यांच्या हस्ते झाले. यापुढे पुढील 25 वर्षांचा आराखडा मांडण्यात आला. प्रत्येक वर्षी एक वेगळा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी राबवण्याचे संस्थेने ठरविले. त्यापैकी 26 जानेवारी 2014 रोजी 'महालेझीम' हा उपक्रम राबवून गिनीज वर्ल्ड बुकमध्ये या संस्थेने ठसा उमटविला आहे. 2015 मध्ये '1 कोटी सूर्यनमस्कार', '2016 मध्ये 'एकतरी ओवी अनुभवावी' हे उपक्रम राबवून संस्थेने आपली द्विशताब्दीची वाटचाल केली आहे. आज काही शाळांनी पंचवीस वर्षांमध्ये काही शाळांनी छत्तीस संस्थेच्या काही शाळानी पन्नास वर्षे, काहींनी साठ तर काही शाळांनी पंच्याहत्तरी काहीनी शंभर वर्षेही पूर्ण केली आहेत. संस्थेने स्वतःचे विस्तार केंद्र, नियतकालीक, पंचायत राज प्रशिक्षण असे उपक्रम राबविले आहेत. संस्थेचा स्वतंत्र असा मुद्रण साहित्य विभाग आहे. सांगली शिक्षण संस्था सेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादित सांगली हे ही आहे. या 100 वर्षांमध्ये संस्थेला व संस्थेच्या इतर शाखांना राष्ट्रपती, मुख्यमंत्री, शिक्षणमंत्री, स्थानिक खासदार आमदार, भूतपूर्व संस्थानिक चिंतामणराव पटवर्धन, राष्ट्रपती, मुख्यमंत्री तसेच वसंतदादा पाटील, शिवाजीराव भोसले, बाबासाहेब पुरंदरे अशा दिग्गज मंडळींनी संस्थेला भेट दिली आहे. संस्थेने अनेक समाज व विद्यार्थी उपयोगी, राजकीय व सामाजिक उपक्रमामध्ये सहभाग दर्शविला आहे. संस्था शाळेतील शिक्षक वर्ग, कर्मचारी वर्ग या सर्वांना कुटुंबातील सदस्याप्रमाणे मानते, त्यांच्या अडीअडचणी समजून घेऊन सोडविण्याचा प्रयत्न करते. संस्थेच्या संचितामुळे शिक्षकांचे व्यक्तिमत्व बहुआयामी झाल्याने ते विद्यार्थ्यांमध्ये दिसून येते. प्रशासकीय अधिकारी, पदाधिकारी, उद्योगपती व व्यापारी, विधिज्ञ, न्यायमूर्ती, चित्रकार, गायक, कलाकार, दिग्दर्शक आणि कार्यकर्ते, सेनाधिकारी, डॉ. बुद्धिबळपटू, साहित्यिक, कुस्तीगार, शिक्षण क्षेत्र, परदेशात असलेले विद्यार्थी या सर्वांच्या योगदानातून दिसून येते.

## विविध क्षेत्रांतील काही यशस्वी माजी विद्यार्थी

### 1) उद्योगपती व व्यापारी :

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. वसंतराव श्री. वैद्य | पुणे | श्री. ग. शं. कुलकर्णी | बेळगांव |
| श्री. रमणलाल शहा | सांगली | श्री. कांतीभाई शहा | सांगली |
